म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू-प्रवास
सं. क्र. : ७७४

REFBK-0027765

# मॉरिशस . . . एक प्रवास

**उर्मिला पवार**

५ बी, विल्मर अपार्टमेंट,
६०७, **'मंदार'**,
दत्तानी पार्क, बोरीवली (पूर्व),
मुंबई - ४०० ०६६

REFBK 0027765

REFBK-0027765

सुगंधा प्रकाशन
दहिसर (पूर्व) मुंबई

मॉरिशस . . . एक प्रवास Mauritius Ek Prawas

उर्मिला पवार

© हरिश्चंद्र पवार

प्रथमावृत्ती : तिसरी जागतिक मराठी परिषद १९९४, नवी दिल्ली

प्रकाशक : प्रि. आर. एल. तांबे (शिवडांवकर)
सुगंधा प्रकाशन
५/१८६, वृषाली सदन, शैलेंद्रनगर
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८

मुद्रक : श्रीरंग प्रिंटर्स प्रा. लि.
ग. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ३१
फोन : ४१२ ७८ ५२ / ४१३ ६० ३०

मुखपृष्ठ : प्रविण लाडे, (दहिसर)

रेखाटन : कृष्णा वर्देकर, रंगावलीकार

छायाचित्र : मृदुला नाडगौडा

किंमत : साठ रुपये

**मुख्य मंत्री**

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : 18-9-1993

## शुभेच्छा

मॉरिशस येथील दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेसाठी **खास प्रतिनिधी** म्हणून निवड झालेल्या मराठी मधील मान्यवर लेखिका व स्त्रीआंदोलनातील आघाडीची कार्यकर्ती **उर्मिला पवार** यांनी, मॉरिशस येथील आपल्या वास्तव्यात लिहिलेले " **मॉरिशस** " हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत असल्याचे समजून आनंद वाटला.

मॉरिशस बेटावरील मराठी लोकजीवन, त्यांचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या सामाजिक व भावनिक समस्या आणि त्या बेटावरील स्त्रीजीवन **उर्मिला पवार** यांनी नेमकेपणाने टिपलेले आहे.

महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या मनात आणि जाणिवेत आता " **मॉरिशस बेट** वस्तीला आलेले आहे म्हणूनच मराठी रसिक वाचकाला या पुस्तकाच्या वाचनाने मॉरिशसमधील मराठी लोकजीवनाची एक वेगळी अनुभूती होत राहील व त्याची मॉरिशस संबंधी जाणीव समृद्ध होईल.

या पुस्तक लेखनाबद्दल **उर्मिला पवार** यांचे अभिनंदन. त्यांच्या ह्या उपक्रमास माझ्या शुभेच्छा.

( शरद पवार )

## संवेदनाशील लेखिकेचं मनोगत

जागतिक मराठी परिषदेचं दुसरं अधिवेशन १९९१ च्या एप्रिल महिन्यात मॉरिशसला झालं. त्यात मराठीतील विविध स्तरातील लेखक-लेखिकांचा समावेश असावा असा विचार चालू असताना श्री. प्र. श्री. नेरूरकर यांनी उर्मिला पवार यांचं नाव सुचवलं परिषदेनं आपल्यावतीनं त्यांना मॉरिशसला नेलं. या संधीचा उर्मिला पवार यांनी चांगला उपयोग करून घेतला. याची साक्ष म्हणजे हे छोटेसं पुस्तक.

मॉरिशसमध्ये त्या लंडनच्या आशा दामले यांच्याबरोबर राहिल्या, इस्रायलच्या फ्लोरा सॅम्युअल, ऑस्ट्रेलियाच्या अलका शर्मा यांच्याबरोबर वावरल्या आणि त्यामुळे एका वेगळ्या विशाल जगात त्यांचे चार दिवस गेले. हे केवळ महत्वाचं नाही. त्या सर्व क्षणात, वावरण्यात उर्मिला पवार यांना काय वाटलं, त्यांच्या कोणत्या प्रतिक्रिया झाल्या हे त्यांनी मोकळेपणानं लिहिलं आहे. ते महत्त्वाचं आहे. त्यांची मते आणि विचार कोणत्या मुशीतून निर्माण झाले आहेत. त्याचं दर्शन या लेखनात होतं.

उर्मिला पवार यांची मॉरिशसला जाण्यासाठी निवड केली तेव्हा त्यांचा त्यावर विश्वास बसला नाही. भावाची प्रतिक्रिया वेगळी झाली. प्रत्येक गोष्टीकडे सवर्ण दलित मतभेदातून पाहिलं तर सहजपणे घडणाऱ्या घटनेतही उगाच गढूळपणा येतो हे आता लेखिकेलाही पटलं असेल. अनेकांबरोबर तिचं मोकळेपणानं बोलणं झालं. श्री. प्र. श्री. नेरूरकरांनी भूगन यांच्याकडे नेलं. मराठी शिक्षक आपल्या प्रश्नांची चर्चा करत होते तिथं नेलं. मुंबई विद्यापिठात एम. ए.ला असलेली 'रणांगण' कांदबरी तिथं दहावीला होती.

ज्या हॉटेलात त्या रहातात तिथला वेटर रात्री विस्कीची बाटली मागावयास येतो. परदेशातून येणाऱ्या स्त्री पुरुषांकडे दारूच्या बाटल्या असतात अशी चुकीची समजूत. आशा दामले पंजाबी पोषाख घालावयास तयार नसतात व लंडनमध्ये झाडू मारणाऱ्या स्त्रिया हा पोषाख घालतात ही त्यांची प्रतिक्रिया. अशा लहान सहान गोष्टी लेखिकेनं नोंदविल्या आहेत. सेगा या मॉरिशसच्या खास नृत्याचं केलेलं वर्णन चांगलं आहे.

मॉरिशसचा निसर्ग आणि हिरव्या रंगाला असलेला तजेला लेखिकेचा दृष्टीकोण आणि शैली सुधारण्यास मदत करील ही अपेक्षा या पुस्तकानं पूर्ण केली आहे.

परिषदेतील कार्यक्रमांबद्दलही लेखिकेनं चांगल्या नोंदी केल्या आहेत. 'दादरकरच्या वर्मा कशा झाल्यात,' या प्रश्नानं लाजलेल्या माणिक वर्मा, 'विवाह न करता कसे रहाता' या प्रश्नावर 'माझी तिथे एक मैत्रीण आहे' असं मंत्रींनी दिलेलं उत्तर. मिस्कीलपणे लेखिकेनं उचललं आहे. जागतिक मराठी परिषदेच्या मॉरिशस अधिवेशनाचं ललित दर्शन म्हणजे उर्मिला पवारांचं हे पुस्तक आहे.

मॉरीशसमधील नवी मैत्रीण देवयानी, तिच्यासाठी महाराष्ट्रातील नवरा बघ असं नेरूरकर उर्मिला पवारांना सुचवतात. "त्याला मॉरिशसमध्ये येऊन रहावं लागेल" असं उत्तर देवयानी देते कारण विचारताच ती म्हणते, "मी तिकडे आले तर मला सहजपणे नोकरी मिळणार नाही." आपल्याकडील बेकारी, तेथील नोकऱ्यांची उपलब्धता यांचं चित्र या एका प्रश्नोत्तरात मिळतं. मराठी भाषेवरील तेथील लोकांचं प्रेम त्याकडे पहाण्याचा काहींचा दृष्टीकोण हे असं संवादातून प्रकट झालं आहे.

मोटारीतून फिरायला जाण्यासाठी आलेला एक मराठी माणूस "धड मराठी बोलता येत नाही आणि जागतिक परिषद भरवतायत" असा शेरा मारतो. अशा मंडळीकडे असलेला वस्तुनिष्ठ विचारांचा अभाव, एखाद्याला मिळणाऱ्या वागणुकीतून बनलेली मतं ही खरी नसतात याचं भान लेखिकेनं ठेवणं हीच या दौऱ्याची खरी फलश्रृती मानावयास हवी.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही आसपास आहेत. हे सर्व लिहिलं जात असतांना राजकारण्यांनी बनवलेली मतं, पाडलेल्या फळया आपणही स्वीकारल्याच पाहिजेत अशी भूमिका नसावी. दोन्हीकडे काही चुकत असतं. एका पाचूच्या बेटावर जिच्या संवेदना बोथट झालेल्या नाहीत अशी एक लेखिका उतरते. आपल्या प्रतिक्रिया लिहून काढते याबद्दल तिचं अभिनंदन करावयास हवं. आडनावांमुळे तेथे जाती गळून पडल्या आहेत. मॉरिशसमध्ये सवर्ण आणि दलित अशी वाटणी समाजात कुठेही दिसत नाही हे सत्यही ठळकपणानं यायला हवं होतं मॉरिशस भेट उर्मिला पवार यांना नेहमीच स्फूर्ती देणारी ठरेल असं मी मानतो.

**माधव गडकरी**
१५, नवप्रभात सोसायटी, हनुमान रोड
विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

**नेताजी सुभाष जयंती**

**दि. २३ जानेवारी ९४**

## सारं श्रेय यांनाच . . .

**ज्यांनी मॉरिशसला जाण्याची संधी दिली** ते जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्ष-ना. शरदराव पवार, सचिव-माधवराव गडकरी आणि **प्र.श्री.नेरूरकर,**

**ज्यांनी सहकार्य केले** त्या उमा नेरूरकर, जनार्दन जाधव, (पोईपकर), शाहू पवार, सरला दाभोळकर, विद्याधर कांबळे, उत्तम आजगांवकर,

**मॉरिशसच्या वास्तव्यात ज्यांनी साथ सोबत केली** त्या आशा दामले (लंडन), फ्लोरा शॅम्युअल (इस्रायल), अलका शर्मा (ऑस्ट्रेलिया), नरेश मंत्री (जपान), मि. गोखले, वसुधा गोखले (मस्कत); चंद्रकांत पांढरीपांडे (भोपाळ) व मॉरिशियन मित्र मैत्रीणी.

**या लेखनाला ऑगस्ट १९९१ ते मे १९९३ पर्यंत सुगावा (पुणे) मधून क्रमशः प्रकाशित करणारे** सुगावाचे संपादक, प्रकाशक-विलास वाघ, उषा वाघ (पुणे)

**सुगावातून प्रकाशित झालेल्या लेखनाचे मनापासून कौतुक करणारे** शेखर (दिल्ली), कौसल्या बैसंत्री (मद्रास), प्रकाश सोनवणे, श्रीपत कांबळे, प्रकाश बुरटे, अरुणा बुरटे (मुंबई).

**या पुस्तकाचे प्रकाशक व सहाय्यक** - प्रि. आर. एल. तांबे, मुद्रक चंद्रकांत मांजरेकर, अजय चोरगे व त्यांचे सहकारी, प्रविण लाडे, कृष्णा वर्देकर, मृदुला नाडगौडा

**ज्यांनी अमाप उत्साह दिला** त्या माझ्या मुली मालविका, मानिनी आणि पती **हरिश्चंद्र पवार.**

## त्याला अर्पण . . . .

तो अज्ञात प्रवासी . . .
देशाच्या आंधळ्या इतिहासाने
त्याला ना पाहिले होते
ना बहिऱ्या इतिहासाने ऐकल्या होत्या
त्याच्या किंकाळ्या . . .
ज्याच्या घामाचा पहिला थेंब
वाहिला त्या मातीवर
ज्याने होती उगवली खडकातून हिरवळ
तो पहिला भाबडा या मातीचा पुत्र
जो होता माझा अन् तुझाही . . .




बाबूराम महादू (राजदूत लंडन), सरोजनी अनिरुद्ध जगन्नाथ - पंतप्रधानांच्या पत्नी, शीलाबाय बापू - स्त्री हक्क व समाज कल्याण मंत्री मॉरिशस पु. ल. देशपांडे, दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्ष



डावीकडून - कवि ना. धों. महानोर,प्रतिभा पवार
परिषदेचे अध्यक्ष ना. शरद पवार आणि उर्मिला पवार



आनंद मल्लू, विरजानंद मल्लू, माधव गडकरी, शिलाबाय बापू, अरुगम परशुरामन्, प्र. श्री. नेरुरकर, अरुण डहाणूकर




'दशावतार' मॉरिशस मराठी मंडळ



'वॉटरलिली' एक वनस्पती



चीनी 'पॅगोडा', पोर्ट लुईस



'शामारेल', रंगीत माती



चंद्रसेन बापू यांच्या कुटुंबियांसह चंद्रकांत पांढरीपांडे, नरेश मंत्री, उर्मिला पवार, आशा दामले, सुधा गोखले, मि. गोखले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७७४
क्र. २७७६५
२२।७।२९
ग्रंथ शाखा (स्थळ प्र.)

रत्नागिरीत कोकण साहित्य परिषदेची स्थापना होणार होती कोकणातली म्हणून मीही त्या परिषदेला हजर रहाणार होते.

रत्नागिरीच्या पी. डब्ल्यू. डी. च्या गेस्ट हाऊसमध्ये माधवराव गडकरी, मधु मंगेश कर्णिक, शुभा कर्णिक वगैरे मंडळी उतरली होती. मी, माझा भाऊ आणि काही तिथले कार्यकर्ते त्यांना भेटायला गेस्टहाऊसवर गेलो. माधव गडकरी तिघा-चौघांबरोबर गप्पा मारत बसले होते. माझी चार प्रकाशित पुस्तकं त्यांच्यासमोर ठेवून मी माझ्याबद्दल काही बोलणार, तेवढ्यात तेच म्हणाले, 'अहो, मी तुम्हाला ओळखतो. आणि तुम्ही इथं भेटलात ते बरं झालं. नाहीतर मी तुम्हाला कुणाजवळ तरी निरोप पाठवायचं ठरवलंच होतं'

आमचे प्रश्नार्थक चेहरे बघून माधवराव पुढे म्हणाले, 'तुम्ही मॉरिशसला येणार का?'

'मॉरिशसला?'

'हो. आम्ही यावेळी ठरवलंय की दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेला उपस्थित रहाण्याची संधी एखाद्या नवोदित लेखकाला द्यावी. त्यातूनही एखाद्या स्त्रीला ती मिळावी. प्र. श्री. नेरूरकरांनी तुमचं नाव सुचवलंय. मग काय म्हणता?'

मी म्हटलं, 'तुम्ही संधी दिलीत तर जरूर येईन.'

'ठीक. आता मुंबईला गेल्यावर परिषदेचं पत्रच येईल तुम्हाला, या मग.' माधवराव म्हणाले नि बाजूला बसलेल्या सहकाऱ्याकडे वळले. आम्हीही निघालो.

परतताना भावाला म्हटलं, 'काय रे, मला खरंच नेतील ते?' माझा भाऊ त्याच
उच्चवर्णद्वेष्ट्या स्वभावानुसार तोंड वेंगाडत म्हणाला, 'नेतील म्हणजे? त्यांना न्यावं
लागेल. दलितांचा विचार केल्याखेरीज यापुढे त्यांना एक पाऊलही टाकता येणार ना
हे ओळखून आहेत ते.' भावाच्या बोलण्याला इतर कार्यकर्त्यांनीही दुजोरा दिला.

'अरे, पण मला . . मला नेतील का, म्हणते मी ...'

'का, तुला का नेऊ नये? तू लिहीत नाहीस, तुला मराठी येत नाही, की महाराष्ट्रातली नाहीस? का? सांग.'

भावापुढे जास्त बोलण्यासारखं नव्हतं. नाहीतर मग कुणी कुणी जनसंघाची अर्धी च
घातलेली नि कुणी बाबासाहेबांच्या पाठीत कसा खंजीर खुपसलाय हे सुरू झालं अस
मी गप्प बसले. मनात म्हटलं - माधवराव गडकरी थट्टेने बोलले असावे.

पण कोकण परिषदेची स्थापना माधवराव गडकरींच्या हस्ते झाली तेव्हा त्याच समारंभ
जागतिक मराठी परिषदेसाठी माझी निवड केल्याचं माधवरावांनी माझ्या माहेरकरांनी टाळ्यां
प्रचंड कडकडाट करून निवडीचं स्वागत केलं, मनापासून अभिनंदन केलं, आणि म
थोडीशी खात्री वाटू लागली. हिंदी महासागराच्या अथांग निळाईत माझे डोळे मॉरिशस
बेट शोधू लागले. मॉरिशस पाचूचं बेट, स्वप्न नीळं जग, पृथ्वीचं नंदनवन, भारता
छोटी प्रतिकृती असं बरच काही कानावर येऊ लागलं.

मुंबईत आल्यावर नेरुरकरांना भेटले. म्हटलं, 'हे खरं ना?' ते हसले.

मी म्हटलं, 'खरंच मला मॉरिशस बघायचं आहे हो, कारण इथले आमचे तळागळात
लोक तिथे गेले आहेत ना?'

सर म्हणाले. 'माझं मॉरिशस डायरी वाचलंस का?' आणि मग त्यांनीच मॉरिशस
माहिती सांगायला सुरुवात केली.

'सुमारे ७० लक्ष वर्षापूर्वी हिंदी महासागरात मोठा भूकंप झाला नि ज्वालामु
जागृत होऊन ढालीसारखा एक मोठा पृष्ठभाग समुद्रातून वर आला. त्यानंतर ३० ल
वर्षापूर्वी परत एक भूकंप झाला नि त्या ढालीसारख्या पृष्ठभागाचं डोंगर-दऱ्या - स
प्रदेशात रूपांतर झालं. मग आफ्रिकेतून आशियात नि आशियातून आफ्रिकेत स्थलां
करणाऱ्या पशुपक्ष्यांनी या निर्जीव भूमीवर वनस्पतींची बीजं आणून टाकली नि
खडकाळ भूकंपाचा प्रदेश वनस्पतींनी भरून गेला. मग डच लोक इथं येऊ लागले.
फ्रेंच आले.

फ्रेंचांनी इथल्या जमिनीत उसाचं उत्पादन चांगलं होईल हे ओळखलं आणि ते ऊस उत्पादन करू लागले. पाठोपाठ इंग्रजांचं लक्ष या भूमीकडे वळलं आणि फ्रेंच आणि इंग्रजांच्या भागीदारीत उसाचं उत्पादन काढायला सुरुवात झाली. ते आफ्रिकेतून गुलामांना पकडून या इथे मळ्यांत काम करायला आणू लागले. पुढे १८१३ साली गुलामांच्या व्यापारावर बंदी आली आणि मग इंग्रजांनी भारतातून मजूर न्यायला सुरुवात केली. १८३४ सालापासून आपल्याकडचे दुष्काळाला, गरिबीला, रोगराई साथींना कंटाळलेले सर्व जाती धर्मांचे गरीब लोक पोट भरण्याच्या आशेनं मॉरिशसला येऊ लागले. खूप हालअपेष्टा सहन केल्या त्यांनी. . .'

'त्या लोकांमध्ये आमचे महार समाजाचे लोकही होते ना! आता कसे काय आहेत ते लोक?' मी सरांना मध्येच अडवून विचारलं.

'ते तुला काय करायचं आहे?' बोलता बोलता सर एकदम फिस्कारून म्हणाले, 'तू ऊठ, तयारीला लाग. आधी पासपोर्ट काढायचं बघ.'

दुसऱ्या दिवशी परिषदेचं पत्र आलं. माझं बरंचसं शंकासमाधान झालं. पत्रात लिहिलं होतं —

''जागतिक मराठी परिषदेचे दुसरे अधिवेशन मॉरिशस येथे श्री. पु.ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरत आहे. तेथे खास निमंत्रित म्हणून उपस्थित रहाण्यासाठी तुम्हाला विनंती करीत आहोत. दि. २६, २७, २८, एप्रिल १९९१ या तीन दिवसांत ही परिषद मॉरिशस येथे भरणार असून दि. २४ अगर २६ च्या विमानाने निघावे लागेल. मॉरिशससाठी व्हिसाची गरज नाही. जाण्या-येण्याची व रहाण्याची व्यवस्था परिषदेतर्फे केली जाईल. तयारी ठेवावी. कळावे.''

हा मजकूर परिषदेच्या लेटरहेडवर टाईप केला होता. अध्यक्ष म्हणून मा. शरद पवारांचे नाव होते, तर सेक्रेटरी म्हणून माधवराव गडकरींची सही होती.

एखाद्या प्रशस्ति पत्रकासारखं ते पत्र कुणाला दाखवू नि कुणाला नको असं वाटलं. पण म्हटलं, नको. दुसरं एखादं असंच पत्र येईल नि 'काही अपरिहार्य कारणास्तव तुमचं नाव रद्द करण्यात येत आहे' असं म्हणून दिलगिरी व्यक्त करील. म्हणजे बोंबला. पुण्याला निलम गोऱ्हे नि विलासराव वाघांनी बाबासाहेबांचा शताब्दी महोत्सव साजरा केला होता. त्यात मीही भाग घेतला होता. पण तेव्हाही मी काही बोलले नाही. मला खात्री आहे त्यांनी माझा तिथे सत्कारसुद्धा केला असता. एवढ्या मोठ्या परिषदेला तेही भारताबाहेर जाणारी मी एक सामान्य स्त्री होते. माझ्या दृष्टीनं सारी अपूर्वाईच होती.

परतताना भावाला म्हटलं, 'काय रे, मला खरंच नेतील ते?' माझा भाऊ त्याच्या उच्चवर्णद्वेष्ट्या स्वभावानुसार तोंड वेंगाडत म्हणाला, 'नेतील म्हणजे? त्यांना न्यावंच लागेल. दलितांचा विचार केल्याखेरीज यापुढे त्यांना एक पाऊलही टाकता येणार नाही हे ओळखून आहेत ते.' भावाच्या बोलण्याला इतर कार्यकर्त्यांनीही दुजोरा दिला.

'अरे, पण मला . . मला नेतील का, म्हणते मी ...'

'का, तुला का नेऊ नये? तू लिहीत नाहीस, तुला मराठी येत नाही, की तू महाराष्ट्रातली नाहीस? का? सांग.'

भावापुढे जास्त बोलण्यासारखं नव्हतं. नाहीतर मग कुणी कुणी जनसंघाची अर्धी चड्डी घातलेली नि कुणी बाबासाहेबांच्या पाठीत कसा खंजीर खुपसलाय हे सुरू झालं असतं. मी गप्प बसले. मनात म्हटलं - माधवराव गडकरी थट्टेने बोलले असावे.

पण कोकण परिषदेची स्थापना माधवराव गडकरींच्या हस्ते झाली तेव्हा त्याच समारंभात जागतिक मराठी परिषदेसाठी माझी निवड केल्याचं माधवरावांनी माझ्या माहेरकरांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून निवडीचं स्वागत केलं, मनापासून अभिनंदन केलं, आणि मला थोडीशी खात्री वाटू लागली. हिंदी महासागराच्या अथांग निळाईत माझे डोळे मॉरिशसचं बेट शोधू लागले. मॉरिशस पाचूचं बेट, स्वप्न नीळं जग, पृथ्वीचं नंदनवन, भारताची छोटी प्रतिकृती असं बरच काही कानावर येऊ लागलं.

मुंबईत आल्यावर नेरुरकरांना भेटले. म्हटलं, 'हे खरं ना?' ते हसले.

मी म्हटलं, 'खरंच मला मॉरिशस बघायचं आहे हो, कारण इथले आमचे तळागळातले लोक तिथे गेले आहेत ना?'

सर म्हणाले. 'माझं मॉरिशस डायरी वाचलंस का?' आणि मग त्यांनीच मॉरिशसची माहिती सांगायला सुरुवात केली.

'सुमारे ७० लक्ष वर्षापूर्वी हिंदी महासागरात मोठा भूकंप झाला नि ज्वालामुखी जागृत होऊन ढालीसारखा एक मोठा पृष्ठभाग समुद्रातून वर आला. त्यानंतर ३० लक्ष वर्षापूर्वी परत एक भूकंप झाला नि त्या ढालीसारख्या पृष्ठभागाचं डोंगर-दऱ्या - सपाट प्रदेशात रूपांतर झालं. मग आफ्रिकेतून आशियात नि आशियातून आफ्रिकेत स्थलांतर करणाऱ्या पशुपक्ष्यांनीं या निर्जीव भूमीवर वनस्पतींची बीजं आणून टाकली नि हा खडकाळ भूकंपाचा प्रदेश वनस्पतींनी भरून गेला. मग डच लोक इथं येऊ लागले. मग फ्रेंच आले.

फ्रेंचांनी इथल्या जमिनीत उसाचं उत्पादन चांगलं होईल हे ओळखलं आणि ते ऊस उत्पादन करू लागले. पाठोपाठ इंग्रजांचं लक्ष या भूमीकडे वळलं आणि फ्रेंच आणि इंग्रजांच्या भागीदारीत उसाचं उत्पादन काढायला सुरुवात झाली. ते आफ्रिकेतून गुलामांना पकडून या इथे मळ्यांत काम करायला आणू लागले. पुढे १८१३ साली गुलामांच्या व्यापारावर बंदी आली आणि मग इंग्रजांनी भारतातून मजूर न्यायला सुरुवात केली. १८३४ सालापासून आपल्याकडचे दुष्काळाला, गरिबीला, रोगराई साथींना कंटाळलेले सर्व जाती धर्मांचे गरीब लोक पोट भरण्याच्या आशेनं मॉरिशसला येऊ लागले. खूप हालअपेष्टा सहन केल्या त्यांनी. . .'

'त्या लोकांमध्ये आमचे महार समाजाचे लोकही होते ना! आता कसे काय आहेत ते लोक?' मी सरांना मध्येच अडवून विचारलं.

'ते तुला काय करायचं आहे?' बोलता बोलता सर एकदम फिस्कारून म्हणाले, 'तू ऊठ, तयारीला लाग. आधी पासपोर्ट काढायचं बघ.'

दुसऱ्या दिवशी परिषदेचं पत्र आलं. माझं बरंचसं शंकासमाधान झालं. पत्रात लिहिलं होतं —

''जागतिक मराठी परिषदेचे दुसरे अधिवेशन मॉरिशस येथे श्री. पु.ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरत आहे. तेथे खास निमंत्रित म्हणून उपस्थित रहाण्यासाठी तुम्हाला विनंती करीत आहोत. दि. २६, २७; २८, एप्रिल १९९१ या तीन दिवसांत ही परिषद मॉरिशस येथे भरणार असून दि. २४ अगर २६ च्या विमानाने निघावे लागेल. मॉरिशससाठी व्हिसाची गरज नाही. जाण्या-येण्याची व रहाण्याची व्यवस्था परिषदेतर्फे केली जाईल. तयारी ठेवावी. कळावे.''

हा मजकूर परिषदेच्या लेटरहेडवर टाईप केला होता. अध्यक्ष म्हणून मा. शरद पवारांचे नाव होते, तर सेक्रेटरी म्हणून माधवराव गडकरींची सही होती.

एखाद्या प्रशस्ति पत्रकासारखं ते पत्र कुणाला दाखवू नि कुणाला नको असं वाटलं. पण म्हटलं, नको. दुसरं एखादं असंच पत्र येईल नि 'काही अपरिहार्य कारणास्तव तुमचं नाव रद्द करण्यात येत आहे' असं म्हणून दिलगिरी व्यक्त करील. म्हणजे बोंबला. पुण्याला निलम गोऱ्हे नि विलासराव वाघांनी बाबासाहेबांचा शताब्दी महोत्सव साजरा केला होता. त्यात मीही भाग घेतला होता. पण तेव्हाही मी काही बोलले नाही. मला खात्री आहे त्यांनी माझा तिथे सत्कारसुद्धा केला असता. एवढ्या मोठ्या परिषदेला तेही भारताबाहेर जाणारी मी एक सामान्य स्त्री होते. माझ्या दृष्टीनं सारी अपूर्वाईच होती.

माझी धावपळ सुरू झाली. पासपोर्ट ही भानगड फक्त ऐकून माहीत होती, पण ती आपल्यालाही जवळ बाळगायची संधी मिळेल असं कधी वाटलं नव्हतं. शिवाजी पार्कच्या सेनापती भवनापासून पोर्तुगीज चर्चपर्यंतच्या ट्रॅव्हल एजन्सींची नाव जाणकार लोक सांगू लागले. पण येथे बरचं द्रव्य सोडावं लागतं हेही कळलं. तयारी केली होती, पण तेवढ्यात माझ्या मिस्टरांचे मामा जनार्दन जाधव वरळीला पासपोर्ट कार्यालयातच असल्याची आठवण झाली आणि मग त्या नातेसंबंधाची दोरी पकडून पासपोर्टसाठी गळ टाकला.

पासपोर्टच्या फॉर्मवर प्रवासाचे कारण या कॉलममध्ये 'फॉर कॉन्फरन्स' हे शब्द लिहिताना मान थोडी उंचावलीच. पासपोर्टसाठी लागलेल्या रांगेत परदेशी जाणारे श्रीमंत लोकच उभे असतील अशी माझी समजूत. पण तिथे काही फाटक्या अंगाच्या, फाटक्या कपड्यालत्त्यांच्या बायका-मुलांना नि तरुणांना पाहून माझ्या त्या समजुतीला धक्का बसला. साधारणपणे १८३४ पासून मॉरिशसमध्ये मजुरी करायला गेलेल्या तळागाळयातल्या लोकांचेच नमुने असलेली ही मंडळी आजही गल्फ कंट्रीत तसंच राबायला जात आहेत हे प्रत्यक्ष बघून मन जरा उदास झालं. उंचावलेली मान खाली आली.

पासपोर्ट मिळाला त्या दिवशी त्याचं महत्त्व लक्षात आणून देत आमचे ऑफिसचे साहेब म्हणाले, 'नीट जपून ठेवा तो. तुम्ही हरवलात तरी चालेल पण पासपोर्ट हरवता कामा नये.' साहेबांनी दाखवलेली ही काळजी बघून आमच्या ऑफिसच्या लहानशा जगात माझं परदेशी जाणं, तेही परिषदेसाठी म्हणजे काहीतरी मोठं असावं याची सर्वांना नव्यानं जाणीव झाली. काहींना चांगलं वाटलं, काहींना बरं तर काहींना ... अशी मग सर्वच ठिकाणी तरतम भावाने प्रतिक्रिया दिसू लागली.

नरीमन पॉईंटला बजाज भवनात दुसऱ्या मजल्यावर जागतिक मराठी परिषदेचं कार्यालय होतं. पासपोर्ट घेऊन मी तेथे गेले. तेव्हा मला कळलं की बारा हजार रुपये भरून कुणालाही परिषदेसाठी मॉरिशसला जाता येईल; घरी आले. मिस्टरांना सांगितलं. ते म्हणाले, 'नको, मला रजा वगैरे मिळणार नाही.' मी त्यांना प्रोत्साहन देत म्हटलं, बघा प्रयत्न करून. चांगली संधी आहे. आपण आयुष्यभर एवढी दगदग करतो. काय झाले एखादे ठिकाण पहायला चार पैसे खर्च करून गेले तर? नाहीतरी आपल्या आयुष्यात आता ....'

'हे बघ. तूच बघून ये, मला मध्येच तोडत हे म्हणाले, 'मला खरंच येता येणार नाही.' मुलींना न्यावं तर त्या दोघींचा खर्च झेपण्यासारखा नव्हता माझा नाईलाज झाला. उगाचच अपराधीपणाची भावना आता मनात दाटली, असं का व्हावं? पती आणि मुलांशिवाय स्त्रीचा म्हणून वेगळा विचार निर्भेळ मनाने आपण का करू शकत नाही? पासपोर्ट मिळाल्यानंतर सातआठ दिवसांनी विमानाचं तिकिट हातात पडलं आणि माझ्या

प्रवासाची निश्चिती झाली. पासपोर्ट नि तिकिट दाखवून सांताक्रूझच्या सेंटॉर हॉटेलातील स्टेट बँकेच्या शाखेतून अडीचशे डॉलर्स इतके पैसे भरून ट्रॅव्हलर्स चेक्स घेण्याविषयीची सूचनाही परिषदेच्या कार्यालयातून मिळाली.

सेंटॉर हॉटेल बाहेरून पाहिलं होतं. खरं तर ते मोठ्यांचं मोठं जग. तिथे माझ्यासारखीचं काय काम? पण आता परिषदेच्या निमित्ताने माझ्या भोवतीचं जग बदलू लागलं होतं. बहिणीला बरोबर घेऊन मी सेंटॉर हॉटेलात गेले.

एखाद्या अभेद्य किल्ल्यासारख्या त्या गोलाकार हॉटेलच्या प्रवेशद्वारावर आपल्याला कुणीतरी हटकेल म्हणून मी पासपोर्ट हातात तयार ठेवला. तेवढ्यात परदेशी बनावटीची एक पांढरीशुभ्र कार झुळकन आमच्या पुढून सरकली नि दाराशी थांबली. त्याबरोबर प्रवेशद्वारावरची गुरखा वगैरे मंडळी लगबगीने तिकडे धावली आणि आमच्याकडे काळ्या कुत्र्यानंही पाहिलं नाही.

आम्ही सरळ आत गेलो नि दिवस असूनही आतल्या दिव्यांची झगमगत्या झुंबरांची आरास पाहून आमची पावलं थबकली. आपण बँकेत जाण्यासाठी आलो आहोत हे विसरून आम्ही हॉटेलचीच शोभा थोडावेळ पाहिली. फक्त सिनेमातच दृष्टिभेट होणारा, अंगठीतल्या खड्यासारख्या पांढऱ्या शुभ्र फरशीच्या कोंदणात आकाशी निळ्या रंगाचा तलाव, त्यात डुंबणारी गुलाबी माणसं, तलावासभोवतीची बाग, आतल्या दारंखिडक्यांना केलेलं कोरीव काम, प्रशस्त आरसे, चित्रं, शिल्पं, उंची वस्त्रप्रावरणांची दुकानं, शोरूम्स . . . आणि त्या शोरूम्समध्ये ठेवलेला, कमरेला पंचा हातात काठी घेतलेला महात्मा गांधीजींचा पुतळा...

दुसऱ्या मजल्यावरच्या बँकेचा काचेचा दरवाजा ढकलून आम्ही आत गेलो. प्रत्येक काऊंटरशी बडी मंडळी उभी होती. आमच्या रांगेत दोन साधारण पोशाख केलेले तरुण, आपल्या बॅगा - पिशव्यांसह एकदम प्रवासाच्या तयारीने उभे होते. त्यांच्या कपाळावर दुबईची भाग्यरेषा दिसत होती.

कोणत्याही बँकेचे पैसे ठेवण्या-काढण्याचे व्यवहार असावे तसेच डॉलर्स वगैरेचे व्यवहार येथे दिसत होते. त्यामुळे तशी काही अडचण झाली नाही.

डॉलर्स घेऊन घरी आले आणि मग मात्र माझी प्रवासाची खरी तयारी सुरू झाली. अगदी बॅग खरेदीपासूनच. वीस किलो सामान विमानातून नेता येतं, अर्थात जाताना आपल्याकडे सामान नसतं, येताना ते खूप वाढतं... असे जाणकारांचे अनुभवाचे बोल सुरू झाले.

मॉरिशसला काय काय मिळतं, काय काय आणता येतं, याच्याही गप्पा सुरू झाल्या. कुणी म्हणाले - तिकडे कापडगिरण्या फार आहेत. त्यामुळे सुती कापड, बेडशीटस वगैरे स्वस्त मिळतात. कुणी म्हणालं चिनी क्रॉकरी चांगली मिळते. तर कुणी व्ही. सी. आर., आणि टीव्ही आणि सोनंही इथल्यापेक्षा निम्यानं मिळतं अशी छातीठोक माहिती सांगू लागले. मला या कशातच रस नव्हता. मात्र 'दगड उचलला तरी सोनं सापडेल' या शब्दांना भुलून मॉरिशसमध्ये गेलेल्या लोकांच पुढे काय झालं ते पहायला नि ते टिपून आणायला मी उत्सुक होते.

मॉरिशसमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होते असं कळलं होतं. मध्ये मुंबईत बौद्धजन पंचायत शाखेत मॉरिशसची काही मंडळी आली होती. त्यांनी बाबासाहेबांच्या प्रकाशित साहित्यांचे खंड मॉरिशसला नेले होते. नक्कीच ती मंडळी आपली असणार. त्यांचे पत्ते पंचायत शाखेतून घ्यायचं मी ठरवलं. नेरूरकरसरांना याबाबत सांगितलं, तर ते म्हणाले, 'अग, ती मंडळी मला माहीत आहेत.' 'मग तुम्ही मला न्याल त्यांच्याकडे?' मी उत्सुकतेनं विचारलं.

'बघू नंतर. तू चल तर खरी.' नेरूरकर सर म्हणाले. मलाही निघण्याच्या गडबडीत पंचायत शाखेत जायला वेळ मिळाला नाही.

बॅगेत साड्या ठेवायला निघाले तेव्हा मुली म्हणाल्या, 'आई, अगदीच गावंढळ दिसू नको. दोन ड्रेस घे बरोबर. मलाही ते पटलं. सुटसुटीतपणाच्या दृष्टीनं ड्रेसच बरे होते . पण भारतातून परदेशात गेलेल्या उच्चभ्रू स्त्रियांचं पंजाबी ड्रेसबद्दलचं मत मला नंतर कळलं नि त्या परदेशी स्त्रियाची मला कीव करावीशी वाटली.

२५ एप्रिल हा माझा निघण्याचा दिवस उजाडला. खरं तर २४ तारखेला परिषदेला जाणाऱ्यांची एक बॅच निघून गेली होती. त्यात परिषदेचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे, वसंत कानिटकर, माधव गडकरी, प्र. श्री. नेरूरकर, मधू मंगेश कर्णिक, वसंत बापट वगैरे मंडळी सहकुटुंब होती.

२५ तारखेला आमच्याबरोबर खुद्द मुख्यमंत्री माननीय शरदराव पवार आणि प्रतिभाताई पवार येणार होत्या. माझंही आडनाव पवार. त्यावरूनही परत येताना बराच घोटाळा झाला.

रात्री ३ वाजून ४५ मिनिटांनी विमान सुटणार होतं. त्याआधी दोन तीन तास विमानतळावर जायचं होतं. खास प्रवासासाठी घेतलेल्या नव्या बॅगेत मुंबईतल्या मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण करून परत जाणाऱ्या एका मॉरिशसच्या मुलाची लठ्ठ पुस्तकं, त्याला ड्यूटी पडू नये म्हणून, मी घातली होती. खरं तर त्या पुस्तकांनीच बॅग भरली होती. नाहीतर प्रवासभर माझी रिकामी बॅग खुडखुड वाजली असती.


रात्री साडे अकरा वाजता मी मुलींचा निरोप घेतला. मिस्टर पोहोचवायला आले होते. त्यांनी मला विमानतळाच्या इमारतीबाहेर सोडलं. पुढचा प्रवास मी एकटीनं करणार होते. प्रवासातले थ्रिल अनुभवणार होते कारण सोबत, कोण कोण आहेत मला माहीत नव्हतं.

टॅक्सीत बसल्यावर हे म्हणाले - स्वतःला जप, पैसे वगैरे नीट सांभाळ नि गेल्याबरोबर तार कर. मी म्हटलं - माझी काळजी करू नका. अहो, मी एकटी जगप्रदक्षिणासुद्धा करून येईन.

'म्हणूनच मला काळजी वाटते' हे हसून म्हणाले. मी म्हटलं, 'उलट तुमचीच मला काळजी वाटतेय!' आम्ही असं एरवी कधी नव्हे ते जरा भारावून वगैरे एकमेकांशी बोलतोय तेवढ्यात विमानतळ आलाच. बॅग उतरून खाली घेत पैसे देतोय तेवढ्यात आमचे एक नातेवाईक जयसिंग असरोंडकर सहकुटुंब मला निरोप द्यायला आमच्या समोर आले. भर मध्यरात्रीसुद्धा अगदी पुष्पगुच्छ वगैरे घेऊन आलेल्या त्या मंडळींमुळे माझ्या प्रवासाला जरा व्ही.आय.पी. टच मिळाला.

तिथेच आमचा दुसरा नातेवाईक विद्याधर कांबळे भेटला. तो विमानात इलेक्ट्रिकल इंजिनिअर आहे. त्यानेच माझ्या प्रवासाची सूत्रं हातात घेतली. त्याच्यामुळे माझ्या पुढच्या प्रवासाचं थ्रिल गेलं. सामानाची तपासणी, वजन, तीनशे रुपये विमानतळावर ड्यूटीचार्ज म्हणून भरणं, जातानाचा कुठे जाता, कशाला, कुणाकडे काय करता वगैरे चौकशी करणारा छोटा फॉर्म भरणं वगैरे तो सांगत होता नि मी त्याप्रमाणे निमूट वागत होते.

शेवटी धातुशोधक यंत्राचा चिमटा अंगावरून फिरवून तपासणी करण्याच्या खोलीकडे मी निघाले तेव्हा विद्याधर म्हणाला - आता तुम्ही थेट विमानातच जाऊन बसाल. 'म्हणजे? ती शिडी, तिने चढायचं, टाटा करायचं ते? मी विचारलं, तो हसला, म्हणाला - आता शिडीबिडी काही नाही. शिडी नाही म्हटल्यावर प्रवासातला चार्म थोडा कमी झाल्यासारखा वाटला. आम्हाला शिड्यांची सवय. पिशवी सांभाळत व्हरांड्यासारख्या मोकळ्या बोळखंडातून आम्ही विमानाच्या दाराशी पोहोचलो. दारात देखण्या एअर होस्टेसेस, पर्सर स्वयंसेवकासारखे हात जोडून उभे होते. नि भारताबाहेरच्या जगात प्रवेश करायला मी माझं पहिलं पाऊल विमानात ठेवलं होतं.



विमानात पाय ठेवल्या ठेवल्या मी लहान मुलाच्या उत्सुकतेने प्रथम काय पाहिले असेल तर खिडकी शेजारची जागा. रात्रीच्या वेळी विमानातून मुंबई पाहून आपल्याला काय वाटले हे सांगताना एका कवीने म्हटलं आहे, ''जणू कुणीतरी हिऱ्यामाणकांची ताटंच्या ताटं उधळून दिली आहेत असे वाटलं.'' ती उधळलेली हिरे माणकं पहाण्यासाठी मला खिडकी हवी होती, अर्थात मला ती मिळाली नव्हती. खिडकीच्या दोन सीट सोडून मधल्या चार सीटच्या कोपऱ्यावरची सीट माझी होती. दारावरच्या एअर होस्टेसने मला लांबूनच ती दाखवली.

विमान चालकाच्या केबीनच्या डाव्या हाताला तिच्या मागे फर्स्टक्लासच्या गुबगुबीत खुर्च्या, खिडक्यांचे तलम नक्षीदार पडदे, वर झगमगते दिवे नि खाली लाल मऊ गालीच्यामुळे एखाद्या उंची, अत्याधुनिक थिएटरमध्ये शिरल्यासारखं वाटत होतं. तेथून पिशव्यांसकट पुढे सरकत सरकत आम्ही परिषदवाली मंडळी सेकंड क्लासमध्ये घुसलो आणि आपापल्या सीटवरची कपाटं उघडून त्यात हातातल्या पिशव्या टाकायची आमची एकच घाई उडाली.

माझा पहिलाच विमान प्रवास. मला काही फडताळ कसं उघडायचं ते कळेना. सराईताचा आव आणूनही जमेना. माझा चेहरा हेरून एक चपळ एअर होस्टेस पुढे आली. माझ्या हातातली पिशवी घेऊन चटकन तिने कपाट उघडून ती आत टाकली नि तोंडातल्या तोंडात गुदगुदली, 'ॲनी मॉ?' मी स्वच्छ खणखणीत उच्चारात म्हटलं, 'थँक यू' नि मुकाट खुर्चीवर बसले. हो, ती आणखी काही तरी इंग्रजीत विचारायची नि माझी पंचाईत व्हायची. मी बसताच ती निघून गेली.

पॅसेजमध्ये उभं राहून पिशव्या वर टाकण्याचा कार्यक्रम आटोपून मंडळींनी आपापल्या खुर्च्या घेताच बरंच स्थिरस्थावर झालं. मी आजूबाजूला पाहिलं. माझ्या डाव्या बाजूला एक बुरखेवाली मुस्लीम स्त्री बसली होती. मुस्लीम स्त्री, एकटीच, तीही इतक्या दूरच्या प्रवासात. मला उगाचच तिच्याविषयी शंका वाटू लागली. तिच्या चेहऱ्यावर बुरखा नव्हता. मी तिचं तोंड, हातपाय बायकी असल्याबद्दल खात्री करून घेतली नि तरीही खबरदारी म्हणून गळयात अडकवलेली पासपोर्ट नि पैशाची छोटी पर्स ओढून पुढे घेतली.

तिच्या बाजूच्या खुर्चीत होत्या अभिनयसम्राज्ञी विजया मेहता. त्यांना पाहताच मला बॅरिस्टर, जास्वंदी, हमिदाबाईची कोठी वगैरे नाटकं आठवली. त्यासंबंधी त्यांच्याशी बोलावंसं वाटू लागलं पण रात्रीची साडेतीन-पावणे चारची ती वेळ कोठीवरच्या गप्पा करण्यायोग्य नव्हती. त्यात विजयाबाईनीही सावधपणे ओठाच्या कोपऱ्यातून थोडे हसू सांडलं नि डोळे बंद करून शाल ओढून त्या पडून राहिल्या. एअर कंडिशनमुळे मलाही हुडहुडी भरल्यासारखं झालं होतं. सीटवर ठेवलेली विमानातली उबदार शाल मीही ओढून घेतली.

वरच्या कर्ण्यातून सारखी काहीबाही अनाऊन्समेंट चालूच होती. थोड्यावेळाने पट्टे कमरेभोवती बांधायची सूचना होताच सर्वजण खुर्चीला लावलेले पट्टे कमरेभोवती आवळू लागले. याचवेळी विमानाची घरघर सुरू झाली. सर्व दिवे बंद झाले नि विमान निघालं. मला पट्टा बांधायचा नव्हता, कारण विमान उडताच मला उठून खिडकीतून खाली पहायचं होतं. पण एअर इंडियाच्या विमानांचा अनुभव असलेली काही जाणकार मंडळी म्हणाली होती की रस्त्यावर स्कूटर किंवा सायकल चालवावी तशी पायलट मंडळी आकाशात विमान चालवतात. म्हणूनच इतके अपघात होतात. हे शब्द मला आठवले नि वाटलं, विमान उडताना उलटं-पालटं झालं तर आपण वरच्या फडताळात जाऊन बसू; त्यापेक्षा खुर्चीत बांधून घेतलेलं बरं.

कमरेभोवती सैलसा पट्टा बांधून मान उंचावून मी बाजूच्या खिडकीतून दिसणारा आभाळाचा तुकडा पहात होते. खिडकीतल्या गृहस्थांचं डोकं मधे येत होतं. वाऽऽ छान! बघा बघा! ते अर्धवट स्वतःशी नि अर्धवट शेजाऱ्याशी पुटपुटत होते. मला राहवलं नाही. परत हा क्षण येईल न येईल, मी उठून उभी राहिले नि दोघांच्या खुर्चीवरून ओणवून खिडकीतून पहाण्याचा प्रयत्न केला. वॉव! माझ्या तोंडून उद्गार निघाला नि डोळे विस्फारून मी पहातच राहिले. मुंबईभर विखुरलेली ती झगमगत्या दिव्यांची आरास पाहून त्या कवीने उच्चारलेल्या शब्दांची प्रचीती आली. मात्र त्या वाक्यामागे मी माझे दोनच शब्द जोडले, कुणा बेमुर्वत राजकन्येने. . . खरोखरच कुणा बेमुर्वत राजकन्येने हिऱ्या माणिकांची ताटंच्या ताटं उधळली आहेत असं वाटत होतं.

शूऽऽऽऽ कुणीतरी त्या काळोखात मला दटावलं नि टार्चचा झोत माझ्या चेहऱ्यावर टाकून मला बसण्याची खूण केली. ती एअरहोस्टेस होती. डब्ल्यू सी जवळच्या रांगेत बसून माझ्यासारख्या नवख्या प्रवाशांना ती आवरत होती. आकाशात अलगद उड्डाण करून विमानाने आवश्यक ती उंची गाठल्यावर सर्वत्र दिवे प्रकाशले. पट्टे सोडण्याची अनाऊन्समेंट झाली. विमान उड्डाण करताना काही मंडळींना गरगरतं, पोटात भीतीचा गोळा येतो, काहींना वांत्याही होतात असंही मी ऐकलं होतं. पण तसं काही झालं नव्हतं. बहुतेक ते एअर इंडिया ऐवजी एअर मॉरिशस विमान होते म्हणून असेल का?

आकाशाला चिकटल्यासारखं विमान स्थिर झालं नि एअर होस्टेसने मधल्या पॅसेजमध्ये खाद्य पदार्थांची ट्रॉली उभी केली. ती मधून ब्रेड, बटर, चीज, ज्यूस, फ्रूटसॅलड काटे चमचे, सुऱ्या असे पाश्चात्य पद्धतीचे काहीबाही लहानशा ट्रेवर रचून समोर धरलं. पुढच्या सीटच्या पाठीला अडकवलेले लहानसे फोल्डींग टेबल मांडीवर घेऊन प्रत्येकजण ते खाण्यात गुंतला. पुढच्या सीटला कांगारुच्या पोटासारखी एक पिशवी होती. तिच्यात कसले कसले अंक, सूचनापत्रं, कानाला लावून संगीत ऐकायला हेडफोन्स वगैरे साहित्य होतं. माझं मात्र कशातच लक्ष नव्हतं.

आतल्या एअर कंडीशनमुळे मला सर्दीचा जबरदस्त अटॅक झाला होता. फडाफड शिंका येऊन नाक ओघळत होतं. थंडगार ज्यूसपेक्षा काहीतरी गरमागरम कडकडीत प्यावेसं वाटत होतं. होस्टेसकडे कॉफी मागितली. तिने आणून दिली. तोंडाला लावली तर नुसतेच कोमट पाणी. त्यात ना साखर ना दूध. होस्टेस जवळ येईपर्यंत वाट पाहिली. ती येताच शुगर-शुगर, मिल्क-मिल्क असे नुसते कर्मणीवाचक बडबडले. तिने आणखी कसली कसली पाकीटं आणून दिली. मीठ, साखर, दूध वगैरेच्या त्या पुड्या होत्या. साखर, दूध कॉफीत टाकेपर्यंत ती ठार कोल्ड झाली. मग तो खाण्यापिण्याचा नाद सोडून मी नाक गोंजारत बसून राहिले. थोड्या वेळाने पर्सर नि होस्टेस परत आली. सर्वांनी हेडफोन्स डोक्याला लावले नि सर्वच मंडळी डोळे मिटून पडून राहिली. आकाशात चांदणं होतं मी परत एकदा उठून खिडकीतून पाहण्याचा प्रयत्न केला. काहीच दिसत नव्हते. मग मायक्रोफोन कानाला लावला. त्यावर पाश्चात्य संगीताचे ठ्या ठ्याऽऽऽ चालू होते. फोन काढला. उगाचच अस्वस्थ वाटलं. माझी चाळवाचाळव पाहून की काय शेजारणीला माझ्याशी बोलावंसं वाटलं "आप मॉरिशस में कहा जा रही है?'' तिने मला विचारलं. आप कहाँ जा रही है? मी उलट विचारलं, 'मेरे भाई के पास । मॉरिशसमें मेरा भाई बिझनेस करता है।' ती म्हणाली, आप अकेलीही क्यों जा रही है? मी खोदून विचारलं, 'क्योंकी मैं अकेली ही हूँ' तिच्या या उत्तरावर मी गप्प बसले. ही लग्न न झालेली म्हणून अकेली की तलाकपीडित म्हणून? बहुतेक तलाकपीडितच असावी. अरेरे तिच्या

एकटेपणाबद्दल मला उगाचच काळजी वाटली. काहीतरी बोलावं म्हणून मी तिच्याकडे पाहिलं पण तिने डोळे मिटून घेतले नि संभाषण तेवढ्यावरच तोडलं.

थोडावेळ गेला न गेला तोच परत दिवे प्रकाशले. होस्टेस नि पर्सरची लगबग सुरू झाली. पांढऱ्या शुभ्र पोशाखातल्या एका पर्सरने ट्रे मधून कापसाचे चौकोनी तुकडे आणले नि मेलेला उंदिर टाकल्यासारखे चिमट्याने उचलून आमच्या हातावर टाकले. कढत पाण्यात वाफवून आणलेल्या त्या गरम तुकड्यांनी सर्वांनी डोळे नाक तोंड पुसून घेतले तोच कॉफी आली. तीही आधी होती तिचीच बहीण. साखर-दुधाच्या भरीस न पडता ते गरम पाणीच मी पोटात ढकललं. त्यानंतर जो तो उठून मागच्या बाजूला डब्ल्यू. सी. कडे जाऊ लागला.

यावेळी विमानात काही ओळखीचे चेहेरे दिसू लागले. फर्स्टक्लासमध्ये मुख्यमंत्री शरद पवार, प्रतिभा पवार, सचिन, सुप्रिया, प्रमोद पवार वगैरे मंडळींचा वावर दिसत होता. रात्री विमान सुटताना शरद पवारांनी सपत्नीक यजमानी हसू चेहऱ्यावर आणून सर्वांना अभिवादन केलं होतं, तरी यावेळीही लोक त्यांना भेटून त्यांच्याशी जवळीक साधू पहात होते नि लोकांना टाळण्याचा पवारांचा निकराचा प्रयत्न चालला होता.

मी मात्र विमानाचं निरीक्षण करीत होतं. कमीत कमी जागेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करावा याचा आदर्श नमुना म्हणजे विमान. हा नमुना समोर ठेवून धनिकांची नि मंत्री महोदयांची घरे बांधली गेली तर... तर असंख्य बेघरांचे घराचे प्रश्न सुटतील असं मला वाटलं. खुर्च्यांमधल्या मोकळ्या पॅसेजमधून दोन माणसे व्यवस्थित सरकतील इतकीच बेतशीर जागा, पर्सर नि एअर होस्टेसच्या विसाव्याच्या अगदी लहानशा आटोपशीर केबीन्स, खाद्य पदार्थांची कपाटं, मल्टीपर्पज टेबल, इलेक्ट्रिक शेगड्या, फोल्डिंगच्या दरवाजांचे पिटुकलं स्वच्छतागृह, त्यातही लक्षात ठेवण्यासारखं वाटलं ते बटण दाबताच हवा आणि पाण्याच्या प्रचंड प्रेशरनं क्षणात स्वच्छ होणारं संडासाचं भांडं. वाटले अशी भांडी नि बटणं रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड, झोपडपट्ट्या वगैरेतून बसवतील तर आपली मुंबई सुंदरीच काय पण रंभा उर्वशी सुद्धा होईल. असो.

माणसे किंचित साफसूफ होऊन येतात तोच खिडकीबाहेर फटफटलं नि लगेच ब्रेकफास्टची ट्रॉली आणून होस्टेसनं पॅसेजमध्ये उभी केली. रात्रीचेच पदार्थ, त्यात आता आम्लेट, केकची भर होती. मात्र ज्यूस नव्हता. होस्टेस चहा - कॉफी कुणाला काय हवं ते विचारत फिरत होत्या. मला घरच्यासारखा भरपूर साखर, दूध घातलेला कढत कढत चहा हवा होता. पुढे मॉरिशसच्या संपूर्ण मुक्कामात मला तो एकदाही मिळाला नाही. होस्टेसला मी म्हटलें, आय वॉंट टी. हॉट शब्द मुद्दामच वापरला नाही, नाहीतर जसें

पु. ल. देशपांडेनी अपूर्वाईमध्ये अमेरिकन वेटरला गरम काय आहे हे विचारताना व्हॉट इज हॉट? असें विचारले. वेटरने पंखा सुरू केला नि तो निघून गेला तसें व्हायचे.

सर्वांच्या गरजा पुरवता पुरवता होस्टेसनं चहाच्या कोमट पाण्याचा कप माझ्यासमोर धरला. नाकात हुळहुळणारी शिंक आवरता आवरता मी तो सावरून धरतेय तेवढ्यात तो कलंडलाच. होस्टेसनं तत्परतेनं टिशू पेपर आणून दिला. कपड्यावर उडालेले चहाचे थेंब मी पुसू लागले. 'सर्दी फार झालेली दिसतेय तुम्हाला.' खिडकीजवळच्या खुर्चीवरून कुणीतरी म्हणालं. ते अहमदनगरचे प्राध्यापक डॉ. कऱ्हाडकर होते. त्यांचा माझा विशेष परिचय नव्हता. परिषदेच्या कार्यालयात एकदा ते दिसले होते तेव्हा कुणीतरी म्हणालं होतं इतकंच. सर्दीवरच्या त्यांच्या बोलण्यावर ओशाळं हसत ओळख वाढवत मी विचारलं, 'तुमचा मॉरिशसचा हा पहिलाच प्रवास की....?'

'छे छे, मी मॉरिशसला कित्येकदा आलोय, बरीच वर्षे राहिलोयसुद्धा.'' तरीही खिडकी सोडत नाहीत, मी मनात म्हटलं. माझ्या मनातलंच जणू ओळखून ते पुढे म्हणाले, तुम्हाला खिडकी हवी आहे का?'

'ओ, हो. नाही म्हणजे माझा पहिलाच विमान प्रवास न, तेव्हा.'

'अहो, मग या न, बसा इथे. बघा मॉरिशस आलं.' ते असं म्हणाले नि ब्रेकफास्ट फास्ट फास्ट संपवून उठले सुद्धा. पडत्या फळाची आज्ञा म्हणून खाणं अर्धवट टाकून मी ही उठले नि खिडकी पटकावली. उत्सुकतेनं खिडकीतून पाहिलं. बाहेर अजून काहीच दिसत नव्हतं. विमानात एअर होस्टेस नि पर्सर यांची विमानातला पसारा आवरायची घाई चालली होती.

त्यांच्याकडे पाहून एअर होस्टेसला हवाई सुंदरीऐवजी हवाई सेविका हेच नाव योग्य आहे या पद्मश्री वि. वा. शिरवाडकरांच्या वाक्याची प्रचीती आली नि एअर पर्सरचं हवाई हिशोब तपासणीस किंवा पोतनीस असं काहीतरी लंबचवड वा बोजड भाषांतरीत नाव घेण्यापेक्षा त्यालाही हवाई सेवक म्हणावं असं वाटलं. पण 'सेवा' हा सतकार्यशील शब्द त्यांना आवडत नाही जसं ऐकलं.

परत एकदा स्वत:भोवती पट्टे बांधून घेण्याची सूचना मिळाली. खुर्चीत कुठेतरी अडकलेली पट्ट्याची टोकं शोधून सर्वांनी पट्टे आवळले नि याच वेळी उंच झोपाळा खाली यावा तसं विमान टप्प्याटप्प्यान खाली खाली येऊ लागल. आता पोटात किंचित गोळा फिरल्यासारखं झालं. विमानाची घरघर सुरू झाली नि हळूहळू हिरवंगार मॉरिशस दिसू लागलं.

सकाळच्या सोनेरी किरणात न्हाऊन निघालेलं हिरवंगार पाचूचं मॉरिशस अवाक् घेऊन आम्ही पहात होतो. डोंगर, लहानश्या नद्या, तलाव, हिरव्या मखमलीवर चमकदार राखाडी दोऱ्यानं सुबक कशिदा काढावा तसे, मधले चौक, दुतर्फा रुखवतात मांडून ठेवतात तशी छान पिटूकली घरं, रस्त्यावरची वाहनं सारं सारं चित्रात रेखल्यासारखं डोळ्यात साठवता साठवता पक्ष्याप्रमाणे मॉरिशसच्या भूमीवर आम्ही झेपावत होतो नि क्षणाक्षणात ते आम्हाला कवेत घेत होतं. एक हलकासा झटका देऊन विमानानं मॉरिशसच्या जमिनीला चाकं लावली. एक सुरेखशी गिरकी घेऊन विमान प्लेझान्स येथील शिवुसागर रामगुलाम आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्थिरावलं.

वरून सारख्या अन्साउन्समेंट सुरू झाल्या. पहिली सूचना मिळाली ती वेळेची. सर्वांनी घड्याळात पाहिलं. बरोबर साडेनऊ वाजले होते. 'आता मॉरिशियन वेळेप्रमाणे सकाळचे आठ वाजले आहेत. प्रवाशांनी आपापल्या घड्याळातील वेळ ठीक करावी. 'घड्याळाचे काटे आम्ही दीड तासानं मागे फिरवले. मनात आलं मॉरिशस भारताच्या दीड तास मागे आहे. सर्वच बाबतीत असं आहे की काय?

सामानाची आवराआवर करून सर्वजण दाराकडे सरकू लागले. काहीजण एकमेकांचे फोटो काढू लागले. विजया मेहतांबरोबर फोटो काढावा असं मलाही वाटलं. विजयाबाईंना विनंती केली. त्यांनी ती लगेच मान्य केली. चेहऱ्यावर पावडरचा पफ फिरवून केसांचा बॉब ठीक करत त्या माझ्या बाजूला सावरून बसल्या नि त्यांच्या माझ्या जवळीकेचा तो एकमेव क्षण कॅमेऱ्यानं पटकन टिपला. मग सामान आवरून आम्हीही सर्वांच्या मागे निघालो. माझ्या मागे ती बुरखेवाली होती. आप यहाँसे अकेली घर जायेगी? मी तिला विचारलें, 'नहीं मेरा भाई आनेवाला है' ती म्हणाली. तिच्या एकटेपणाची माझी काळजी दूर झाली.

विमानाच्या दारात हवाई सेवक - सेविकाची रांग उभी होती. सुंदर पेहरावातली ती गोड पोरं हात हालवून सर्वांना गुडबाय करत होती, पण माणसं त्यांना दुर्लक्षून एकमेकांना रेटत पुढे सरकत होती. चालायचंच, रोजचं झालं की कौतुक संपत. त्या देखण्या पोरांच्या गुडबायची हात हालवून परतफेड करत मी विमानातून बाहेर पडले. इथेही विमानातून राजरोस उतरायला शिड्या नव्हत्या. बोगद्याच्या आडपडद्यातच आम्ही बाहेर आलो.

भारताबाहेर पडताना जसे बारके निर्गमन फॉर्म भरले तसे इथे येताना आगमन फॉर्म भरायचे होते. मी फॉर्म भरतेय तेवढ्यात जागतिक मराठी परिषदेसाठी आलेल्या विशेष अतिथींची नावं पुकारत चारपाच मंडळी पुढे आली. त्यांनी आपली ओळख करून दिली. पुष्पाजी नारू-मॉरिशच्या नाट्य संगीत कला विभागाचे प्रमुख - विरजानंद मल्लू अर्थ सचिव, बाबूराम महादू-प्रसिद्धी अधिकारी अशी ही सर्व बडी मंडळी होती. विशेष

अतिथीमध्ये मीही होते. माझ्या मागोमाग एक बॉबकटवाली, फ्रॉक घातलेली, गोरी, शिडशिडीतशी बाई पुढे आली. माझ्या खांद्याला स्पर्श करून म्हणाली - तुमचं नाव? मी म्हटलं - उर्मिला पवार, तुम्ही?

'मी फ्लोरा, फ्लोरा सॅम्यूअल. मी इस्त्रायलला असते.' सत्तरीच्या घरातली प्रसन्न चेहऱ्याची ती बाई चक्क पुण्याचं सदाशिव पेठी मराठी बोलत होती. माझं आश्चर्य ओळखून ती म्हणाली - 'मी ज्यू आहे, पण महाराष्ट्रातली. अलिबागजवळच्या अष्टम गावची. मी महाराष्ट्रातच शिकले,' हं! म्हणजे ही वेनेइस्त्रायली. धर्मातरीत इस्त्रायली. तरीच. बाईनं आपला अधिक परिचय दिला. ती इस्त्रायलला रहात होती. नवरा विमान दलात नोकरीला. मुलंही मोठमोठ्या हुद्यावर. बाई स्वत: इस्त्रायलमध्ये इंग्रजी व संस्कृतची शिक्षिका शिवाय मोठी समाजकार्यकर्ती आहे. तिथं मराठी भाषेचं संवर्धन, संरक्षण नि विकास करते. मायबोली हे मराठी मासिक चालवते. हे सर्व असूनही तिच्या व्यक्तीमत्वाला गर्वाचं जरासुद्धा गालबोट लागलं नव्हतं. तिचं माझ्याशी आस्थेवाईक बोलणं, प्रेमळ वागणं पाहून मला सारखं गहीवरून येत होतं.

सामानाच्या फिरत्या पट्ट्यावरून आम्ही आपापल्या बॅगा उचलल्या नि मोटारीत बसलो. परिषदवाल्या मंडळींना ग्रुप ग्रुपने मोटारातून नियोजित हॉटेलवर पोहोचवण्यात येत होतं. आमच्या ग्रूपमध्ये मी, फ्लोरा, लंडनच्या आशा दामले, मस्कतचे गोखले दांपत्य, जपानचे नरेश मंत्री, भोपाळचे चंद्रकांत पांढरीपांडे नि ऑस्ट्रेलियाची अलका शर्मा अशी आम्ही आठजण निघालो.

विमानतळाबाहेरील वस्तीपेक्षा मोकळी जागाच खूप होती. मैदान सोडलं तर दहा वीस फुटापलिकडे मुंबईत मोकळी जागा क्वचीतच पहायची सवय. इथे दूरवर पसरलेला मोकळा माळ, सिमेंट काँक्रीटचे गुळगुळीत मोकळे रस्ते, दुतर्फा तशीच विरळ एक मजली घरं, अधून मधून लाल पिवळया कर्दळीची गेंदेदार बने, ताजी थंडगार स्वच्छ निर्गंध हवा नि वर मोकळं आकाश पाहून मन भरून येत होतं. पण त्या मोकळया अथांग गगनाला पादाक्रांत करत मुक्त विहार करणारं एखादं पाखरूही कुठं दिसत नव्हतं. अगदी चिटपाखरूसुद्धा.

आमच्या ऑफिसातल्या सखदेव साहेबांना पक्ष्यांची विलक्षण आवड. कर्मचारी म्हणून मलाही पक्षी पहायची उत्सुकता. पण ते दिसत नव्हते. नंतर कळलं की मॉरिशसला पक्षी विशेष नाहीतच. का नाहीत तेही कळलं. पु. ल. बरोबर सुनिता ताईची भेट झाली तेव्हा. पक्षी नसले तरी माणसं मात्र पक्ष्याप्रमाणे मुक्त मोकळ्या मनानं वावरताना दिसत होती. त्यात कुरळया केसांचे जाड ओठांचे कृष्णवर्णीय आफ्रिकन, गोऱ्या गुलाबी कातडीचे,

सोनेरी केसांचे युरोपियन, पिवळ्या वर्णाचे बसक्या नाकाचे ठेंगणे चिनी नि या सर्वांच्या रंगाआकारांचा सुवर्णमध्य साधून असलेली बरीचशी भारतीय मंडळी दिसत होती.

माणसांपेक्षा झांडाची नि शेतांचीच इथे गर्दी होती. चार पाच पेरांच्या उंचीइतकी उसाची शेतं हिरवेगार तुरे झुळकवीत जिकडे तिकडे पसरलेली होती. त्यातून वाट काढत आमची गाडी एका दुमजली हॉटेल समोर थांबली. मुंबईतल्या सेंटॉर हॉटेलचीच छोटी प्रतिकृती असलेलं ते एक तीन ताऱ्यांचं (थ्री स्टार) हॉटेल होतं. नाव होतं एल. मोनॅको.





'**का**त्रबोन' शहरातील हॉटेल एल. मोनॅकोसमोर आमची मेटॅडोर थांबली. आमच्याबरोबर विमानतळापासून आलेले स्वयंसेवक चंद्रसेन बापू नि ड्रायव्हर किसन दोघे खाली उतरले. वन मिनीट, म्हणत चंद्रसेन हॉटेलच्या दोन तीन पायऱ्या चढून वर गेला. भिंतीवरच्या झगझगत्या दिव्याखाली छातीइतक्या उंच काऊंटर पलिकडे बसलेल्या माणसाशी क्रिओल भाषेत तो बालू लागला आणि गाडीत बसूनच आम्ही हॉटेलचं निरीक्षण करू लागलो.

काऊंटरच्या डाव्या हाताला लहानसा हॉल होता नि त्यात हिरव्या रंगाचे अर्ध वर्तुळाकार कोच मांडलेले होते, मध्यभागी वर्तुळाकार टिपॉय नि कोपऱ्यातल्या स्टँडवर रंगीत टी.व्ही. होता. भिंतीवर झगमगते दिवे नि हॉलला शोभणारं हिरवळीवर निवांतपणे चरणाऱ्या घोड्याचं आकर्षक चित्र होतं. भिंतींचा फिकट हिरवा रंग नि जमिनीवर गडद हिरव्या रंगाचा मऊ गालिचा पाहून कावीळ झाली की पिवळं दिसतं तसं आपल्यालाच हिरवळ झालीय म्हणून सर्वत्र हिरवं दिसतंय की काय अशी शंका येत होती.

हॉटेलमध्ये परदेशी टुरिस्टची वर्दळ दिसत होती. विशेषत: काळ्याभोर आफ्रिकन स्त्रीपुरुषांचा वावर जास्त होता. त्यांच्याशी बोलून निग्रोंचे प्रश्न समजावून घेण्याचे मी मनात मनसुबे रचत असतानाच काऊंटवरच्या माणसाशी बोलून चंद्रसेन आमच्याजवळ आला. म्हणाला, तुम्हाला प्रत्येकाला सेपरेट रूम हवी की दोघात एक चालेल?

आशा दामले चटकन म्हणाल्या, 'मी नि उर्मिला एकत्र राहू.' आशाताई लंडनला रहात असल्या तरी त्या जेव्हा मुंबईत येतात तेव्हा आमच्या 'मैत्रीणी' या संस्थेच्या सर्व

कार्यक्रमांना त्या हजर असतात. त्यांची माझी ओळख तिथलीच. त्या म्हणाल्या, काय ग, चालेल ना? मी म्हटलं, पण....

का ग, तुला नाही चालणार?

तसं नाही, पण... मी आढेवेढे घेतले. मला दया पवार नि लक्ष्मण माने अमेरिकेत एकत्र राहिले त्याची आठवण झाली. ते दोघे फोर्ड फाऊंडेशनच बक्षीस घ्यायला अमेरिकेत गेले नि एकाच खोलीत राहिले. दोन समलिंगी माणसं एकत्र रहातात म्हणजे ती होमोसेक्सी दिसतात असा तिथल्या वेटर लोकांचा समज होऊन त्या दोघांकडे मूर्खासारखे तिरस्कारान पहायचे, हसायचे...मी म्हटलं, आशाताई तुम्हाला चालेल तर मलाही चालेल. आशाताई म्हणाल्या, अग, हे ताई ताई काय लावलंयस, नुसतं आशा म्हण. 'अग, आपण दोघीं साठीच्या पुढं गेलोय ना त्याची आम्हाला आठवण करून देतेय ती...' असं म्हणून फ्लोरा एखाद्या अल्लड मुलीसारखी मिस्कील हसली. मग आशा, अलका आणि आम्ही सारे खळखळून हसलो. त्या हसण्यात आमच्यातला परकेपणा विरघळून गेला.

आमच्याप्रमाणे फ्लोरा नि अलकानं एकत्र रहाणं पसंत केलं. चंद्रसेननं खोलीच्या चाव्या आमच्या हातात दिल्या नि दुपारी दीड वाजता परिषदेसाठी तयार रहा, गाडी घेऊन आम्ही हजर होतो असं सांगून तो नि किसन निघून गेले. पायऱ्या चढून आम्ही वर आलो. हॉटेलच्या नोकरांनी आमच्या बॅगा आत आणल्या. काऊंटरवरच्या माणसाने आम्हाला हसून अदबीनं अभिवादन केलं. आतल्या बाजूच्या जिन्यानं आम्ही खोल्याकंडे निघालो. जिन्यावरच्या पूर्णाकृती नक्षीदार आरशात मी सहज माझं प्रतिबिंब पाहिलं तर माझ्या चालण्यात अचानक व्ही. आय. पी. डौल आलेला जाणवला.

खोलीचा दरवाजा उघडून मी नि आशा आत आलो. दोन माणसांना बेतशीर वावरण्याएवढी डबलबेडची खोली भिंतीच्या हलक्या क्रिम तैलरंगामुळे ताजी टवटवीत दिसत होती. दोन्ही सेपरेट बेडवर जाड डिझाईनची पण हलकी स्वच्छ कव्हर, उजव्या हाताला नक्षीदार लाकडी कपाट, त्यात दोन उशा, पांढरी शुभ्र बेडशीट, कव्हर्स नि पांढऱ्या शुभ्र फुलासारखे दोन टॉवेल्स, हँगर्स, कपाटाला लागून ड्रेसिंग टेबल, टिपॉय, बाजूला बाथरूम, त्यात बेसीन, कमोड नि हँड शॉवर बाथची नळी....

चला आधी छानपैकी आंघोळ करू, ब्रेकफास्ट घेऊ नि मग आरामात निवांत पडू असा आमचा बेत ठरला. मी माझी बॅग उघडली आतला टॉवेल काढला. आशा म्हणाली, 'उर्मिला, कसली एवढी लठ्ठ पुस्तकं आणली आहेस?' अगं नेरूरकरांच्या ओळखीच्या एका विद्यार्थ्यांची आहेत ती. नाहीतरी माझ्याकडे वीस किलो सामान नव्हतंच म्हणून केली मदत बिचाऱ्याला. असं म्हणून मी बाथरूममध्ये शिरले.

आंघोळ वगैरे उरकून आम्ही दोघी खाली कॅन्टीनमध्ये आलो. तिथे सुरेख टेबल मांडलेली होती. टेबलावर काचेच्या बशा, कप, काटे चमचे, पाण्याचे रंगीत ग्लास, टिशू पेपर्स नि कपबशीशेजारी बचक्या एवढा पाव. एका टेबलाशी आम्ही दोघी बसलो. बाकी सहकारीही फ्रेश होऊन आले. वेटर जवळ येईल म्हणून वाट पाहिली, पण कुणीच ढुंकून पाहीना. शेवटी मि. गोखल्यांनी आतल्या बाजूला जाऊन एकाला धरून आणलं. त्याच्या हातात मोरांबा नि अमूल बटरची पाकीटे असलेली बशी होती. ती आमच्यासमोर ठेवून त्यानं विचारलं, 'टी ऑर कॉफी?'

आम्ही आपापल्या चॉईस सांगितला नि पावावर ओढायला सुऱ्या हातात घेतल्या. चमचा, काटा, सुरी अशी शस्त्रं चालवून पाहिली पण तो कासवाच्या पाठीसारखा टणक पाव काही दाद लागू देईना. शेवटी मी तो दोन्ही हातात धरून पिंजला, अमूलचं पाकीट त्यावर फासलं नि खाऊ लागले. मी ठरवलं होतं - परदेशात आलो म्हणून उगाच साहेबी, नाटकी आव आणायचा नाही. पाव संपत आला तरी चहा कॉफीचा पत्ता नव्हता. आजूबाजूला इतर वेटर वावरत होते, पण त्यांना इंग्रजीही कळत नव्हतं, कळलं तरी पहिल्याला बोलवायला गेलेला दुसराही फिरकत नव्हता, फिरकला 'तरी तो मी नव्हेच'च्या चेहऱ्यानं हिंडत होता.

फ्लोरा म्हणाली, 'तरीच बाहेर हॉलमध्ये घोडेही पळायचं सोडून संथ रवंथ करतायंत.' आम्ही सर्वजण हसलो. मॉरिशसच्या संथ शांत जीवनाची चुणूक जाणवायला लागली. पाव लाळेत घोळवून संपवता संपवता चहा आला. त्यात साखर दूध मिसळून तोंडाला लावलं तर शाडूच्या पावडरीचं गरम पाणी पितोयसं वाटलं.

'हे पावडरचं पॅक दूध बरं का? इथे सगळं बाहेरून येतं. दूधसुद्धा. ही अमूलची पाकीटं भारतातली.' सुधा गोखले म्हणाल्या. मला आठवलं की येताना पाखरांप्रमाणेच हिरव्यागार कुरणामध्ये चरणारी किंवा रस्त्यावर मोकाट फिरणारी गाई-गुरं आम्हाला दिसली नव्हती. मी म्हटलं, पण इथे गाई म्हशी का पाळत नाहीत? पाळतील तर या मऊ लुसलुशीत गवतावर त्या धष्टपुष्ट होतील नि भरपूर दूध देतील, नाही का? माझ्या प्रश्नाची दखल कुणीच घेतली नाही. सगळे उठले. मला मात्र तो अनुत्तरित प्रश्न बोचत राहिला.

ब्रेकफास्ट आटपून खोलीवर परतलो. अजूनही साबण टॉवेल आला नव्हता, बेडशीटस् बदलली नव्हती. रात्रभर बसून बसून शरीत ताठलं होतं. आत आल्या आल्या थकले ग ऽऽ बाई म्हणत आशानं ताणून दिलं.

मी पाठीमागच्या खिडकीशी उभं राहून बाहेर पाहू लागले. नुकतीच पावसाची सर येऊन गेली होती नि पलिकडची बाग छान न्हाऊन सूर्य प्रकाशात लखलखत होती. बागेच्या कडेनं पेरू, रायआवळा नि पपईची झाडं उभी होती. बागेच्या मध्यभागी पोहण्याचा

तलाव, कडेला कापडी छत्र्यांची गोलाकार टेबलं नि भोवती खुर्च्या होत्या. जमिनीतून वर आलेले शुभ्र गोलाकार दिवे तलावाची शोभा वाढवत होते. पलिकडे आणखी काही खोल्या होत्या, तिथे भारतीय मंडळींचा वावर दिसत होता. हॉटेलच्या आवारा पलिकडे आंब्याचे नि शेवग्याचे शेंडे झुलत होते नि त्या पलिकडे उजव्या आणि डाव्या बाजूला डोंगराचे दोन सुळके खडा पहारा दिल्यासारखे उभे होते. अगदी भारतात असल्यासारखं वाटत होतं.

'उर्मिला, काय एवढं पहातेस? चल कपडे बदल, जेवायला जाऊ नि तिथूनच परिषदेला... चंद्रसेन येईल एवढ्यात.' आशा म्हणाली. कपडे बदलून आम्ही जेवण घरात आलो. टेबलावर कपबशीऐवजी मोठ्या डिश होत्या नि गोल पावाच्या जागी मनगटाच्या आकाराचे लांबडे पाव होते इतकंच. बाकी सरंजाम तोच होता. पाव बघून कपाळावर आठी पडली. तेवढ्यात प्रा. पांढरीपांडे म्हणाले, हे पहा, आपल्याला इथे भारतातल्यासारखे जेवण द्यावं अशा यांना सूचना मिळालेल्या आहेत. तेव्हा तुम्ही काय हवं ते मागा.' गोखले दांपत्याने लगेच वरण भात पोळी - भाजीची ऑर्डर दिली. मी म्हटलं, हे आपण नेहमीच जेवतो. इथले पदार्थ खाण्यात खरी मजा आहे.

अलका म्हणाली, 'ते खाऊ ग नंतर. आहोत अजून आठ दिवस. प्रवासात हलकं नि साधं जेवण तेही माहितीतलं असलेलं बरं.' आम्ही मग तोच मेनू सांगितला.

बऱ्याच वेळानं वरणाचे, भेंड्याच्या भाजीचे बाऊल नि पोळया भाताच्या ताटल्या घेऊन वेटर आला. त्याच्याकडे वरण घ्यायला बाऊल मागितले पंधरा-वीस मिनिटांनी बाऊल आले. तोपर्यंत भात खाऊन झाला होता. भाजी, वरण खरोखरच चांगलं होतं, पण मैद्याच्या पोळया भेंड्याच्या भाजीबरोबर घशाखाली उतरत नव्हत्या. आशानं वेटरला हळूच विचारलं, 'ऐनी नॉनव्हेज इज देअर?'

'एस, चिकन' वेटर म्हणाला नि मी एकदम उचंबळून म्हटलं, ब्रिगं-ब्रिग. फ्लोरा शांतपणानं म्हणाली, 'अगं उर्मिला, त्याचं चिकन येणार म्हणजे कोंबडी धरण्यापासून तयारी. चल, वरण भातावरच भागवून घे.' तरीही मी नि आशा पोळया चिवडत बसलोच. वेटरनं त्याच्याच चालीनं चिकनचा बाऊल टेबलावर आणला. पंजाबी पद्धतीनं कांद्यात शिजवलेलं चिकनही चांगलं झालं होतं.

तुमच्याकडे इंडियन कूक आहेत का? माझा मोडक्या इंग्रजीत प्रश्न. 'हो. हा कूक पंजाबीच असणार.' आशा अस्खलीत इंग्रजीत... नि त्यावर 'आता गिळा!' असा वेटरचा कडकडीत आविर्भाव.

हो, इंडियन कूक असणारच. त्याशिवाय ही लसणाबिसणाची चव यायची नाही. असं सर्वांचं एकमत झालं नि जेवण उरकलं.

दातात अडकलेली कोंबडी काढत आम्ही बाहेर येतोय तेवढ्यात चंद्रसेन आलाच. आम्ही घड्याळयात पाहिलं - बरोबर दीड वाजला होता. काऊंटरवर खोलीच्या किल्ल्या देऊन आम्ही मोटारीत बसलो.

सकाळच्याच मार्गाने अर्ध्यापर्यंत प्रवास करून आम्ही एका सर्कलशी पोहोचलो. चार-पाच रस्त्यांना कवेत घेणाऱ्या त्या सर्कलच्या मध्यभागी मद्रासी मृदंगासारखी ताडाची पण बुटकी झाडं गोलाकार उभी होती. जमिनीपासून मध्यभागाकडे फुगीर होत. तिथून वर निमूळती होत गेलेली खोडं नि त्यावर कातरून खोवल्यासारख्या पानांमुळे ती फुलदाणीसारखीही दिसत होती. लांबून तर समान आकाराचे मधाचे बुधलेच कुणी मांडून ठेवल्यासारखं वाटत होतं. मी त्या झाडांच्या अगदी प्रेमातच पडले. त्यांच्याबरोबर फोटो काढावासा वाटला. पण तोपर्यंत त्या झाडांपासून आम्ही फार दूर आलो होतो.

मेमोरीयलकडे जाणाऱ्या रस्त्यावर बरीचशी वाहनं जाताना दिसत होती. परिषदेसाठी तयार केलेली शोभायात्रा वाजत गाजत आमच्यापुढे चालली होती. शोभायात्रेत रामायण महाभारत शिवकालीन दृश्ये जास्त होती आणि त्यावर टी. व्ही. वर पाहिलेल्या रामायण महाभारताची छाप दिसत होती. शिवजयंती १ मेचा महाराष्ट्र दिवस तोंडावर आला होता. त्याचाही रंग शोभायात्रेत होताच. भगवे झेंडे फडकत होते नि बँडच्या तालासुरात मराठ्यांची फौज महात्मा गांधी मेमोरियलकडे चालली होती.

त्यांना वळसा देऊन आम्ही मेमोरियलच्या गार्डनमधून थेट प्रवेशद्वाराशी येऊन थांबलो. दारावर पाचवारी साड्या नेसलेल्या नि पदरावर परिषदेचे बिल्ले लावलेल्या स्वयंसेविका दोन्ही हात जोडून अगदी मराठीत 'नमस्कार', 'या' 'या बाजूने चला' म्हणत पाहुण्याचं स्वागत करत उभ्या होत्या. आम्हाला मार्ग दाखवत एक स्वयंसेविका थेट पुढे पाहुण्यांच्या खास खुर्च्यांकडे घेऊन गेली.

सभागृह काठोकाठ भरलं होतं. दिव्यांच्या रोषणाईत व्यासपीठ उजळून निघालं होतं. व्यासपीठावर पाठीमागे जागतिक मराठी परिषदेचं स्मृतिचिन्ह - सुवर्ण कलश, निळ्या मखमली पडद्यावर रेखलेला होता. डावीकडे शिवाजी महाराजांची गडावरून उतरत असलेली भव्य रंगीत तसबीर लावली होती नि बाजूला भगवी निशाणं फडकत होती. उजव्या हाताला माईकसह डेक्स उभा होता नि मध्यभागी आच्छादित लांबड्या टेबलावर मॉरिशसमधल्या अँथेरियम नावाच्या लालभडक फुलांच्या नि हिरव्या तुऱ्यांच्या परड्या ठेवल्या होत्या. संपुर्ण व्यासपीठच त्या खास फुलांनी शुभोभित केलं होतं.

टेबलापलिकडे मान्यवर व्यक्ती बसल्या होत्या, त्यांत मॉरिशसचे पंतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ ; गव्हर्नर जनरल रिंगाडो, कामगार आणि कुटुंब कल्याणमंत्री शिलाबाय बापू, मुख्यमंत्री शरदराव पवार, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, कानिटकर, माधव गडकरी अशी सगळी श्रेष्ठ-ज्येष्ठ मंडळी बसली होती. डाव्या हाताला गायकवृंद स्वागत गीतासाठी सज्ज होता. तिथूनच जिन्यापर्यंत नऊवारी साड्या नेसलेल्या, नथ, आंबाडे घातलेल्या नि हातात तबक घेतलेल्या सुंदर मॉरिशिअन मुली चित्रासारख्या उभ्या होत्या. त्यांच्यामुळे तो कार्यक्रम मॉरिशसमध्ये आहे याचाच विसर पडत होता. व्यासपीठाखाली वार्ताहरांची नि टी. व्ही. कॅमेरावाल्यांची गर्दी होती. अधून मधून भगवे फेटेही झुलत होते.

वातावरण तसं प्रसन्न होत, पण उगाचच ताणल्यासारखं वाटत होतं. परिषदेसाठी आम्ही तिनशे भारतीय आलो होते, त्यात पन्नास साठ निमंत्रित होते, तर बाकीचे स्वखर्चाने मॉरिशस पहायला आले होते. हिमालय ट्रॅव्हल एजन्सीमधून काही मंडळी आली होती, त्या मंडळींचं मॉरिशसमधील मंडळींशी नंतर कशावरून तरी बिनसलं नि नंतर तो एक फार्सच झाला. मॉरिशअन मंडळीत काही स्त्रिया चक्क नऊवारी साड्या नेसलेल्या होत्या, तर काही धोतरवाले पुरुषही होते. एक दोघांनी तर लांब बाराबंदी नि पुणेरी पगडी असा खास महाराष्ट्रीयन वेष धारण केला होता. अशाच एका पगडावाल्या शेजारी नेरूरकर सर दिसले मिसेस नेरुरकर आमच्या रांगेत होत्या.

थोड्या वेळाने निवेदिकेने कार्यक्रमाचं सूत्र संचलन हातात घेतलं नी गणेशस्तवनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. गणेशस्तवन, गणेशपूजा म्हटलं नि मला डॉ. तारा भवाळकरांची आठवण झाली. रुढी परंपरा पूजापाठ यावर बोलताना त्या म्हणाल्या 'कोणत्याही कार्याची सुरवात आपण गणेश पुजेने करतो. कारण गणपती ही देवता विघ्नहर्ती नसून विघ्नकर्ती आहे. म्हणून हा पूजाप्रसाद, नैवेद्य घे, पण बाबा तू संतुष्ट रहा, विघ्न आणू नको असं ते सांगणं असतं.' जागतिक मराठी परिषदेचा गणेशस्तवनाशी वगैरे काय संबंध होता कुणास ठाऊक! पण एकंदर सोहळ्याला आता धार्मिक स्वरूप येतंय की काय असं वाटू लागलं.

गणेशोस्तवनानंतर शारदा स्तवन झालं नि नंतर शाहीर साबळेंनी पहाडी आवाजात 'जय जय महाराष्ट्र माझा ऽ ऽ ऽ ऽ' ची गर्जना करताच वातावरणात एकदम चैतन्य आले. लोकांच्या माना, भगवे पटके नि भगवी निशाणं डोलू लागली. उभय देशांतील मराठमोळ्या जनतेच्या मनात भद्रा गोदावरीचे खळाळते प्रवाह उसळले नि मग टाळयांच्या प्रचंड कडकडाटात मिसळून गेले.

महाराष्ट्र गीतानंतर निवेदिकेने मॉरिशीयन व्यक्तीला प्रास्ताविकासाठी पाचारण केलं आणि मायमराठीमध्ये प्रास्ताविक सुरू झालं मुकुंदराज - ज्ञानेश्वरांपासून गडकरी - खांडेकरापर्यंत,

लक्ष्मणशास्त्री जोशी, विनोद सम्राट पु. ल. देशपांडे, नाट्याचार्य वसंत कानेटकर अशा मायमराठीच्या मातब्बर सुपुत्रांनी झळाळत ठेवलेल्या तेजस्वी मराठी समोर जीर्णशीर्ण झालेल्या प्राकृतप्रणीत मराठीचे थरथरते बोल उमटू लागले. 'मॉरिशसचे तुमचे भाऊ आणि बहिणी तुमचे मनापासून स्वागत करतो... मॉरिशस म्हणजे एक लहानसे टिंब. वाळूच्या कणाएवढ्या आमच्या देशात जगातली मराठी माणसे एकत्र आली याचा आम्हाला आनंद वाटतो.' असंच बोलत पुढे तिथला इतिहास सांगताना निवेदक म्हणाला.

'मॉरिशसची भूमी ज्वालाग्राही खडकाची बनलेली आहे. या भूमीत पाणी साचून दलदल होत नाही, त्याचा जलदगतीने निचरा होतो. या जमिनीत उसाची लागवड चांगली होते. इथली जमीन इतकी कसदार आहे की इथे वर्षातून आठ आठ, नऊ नऊ वेळा उसाचं उत्तम पीक काढता येतं.'

त्याच्या या वाक्याने काय, इतक्या वेळा पीक? काय, इतकं पीक? असं म्हणून आम्ही भारतीय आश्चर्यचकित झालो. त्यांच्या तोंडचं पुढचं वाक्य ऐकून तिथल्या भूमीचा कसदारपणा जाणवलाच, पण त्याचबरोबर मॉरिशसमधली मराठी भाषा जीर्णशीर्ण झालेली नाही ती अद्यापही ताजी टवटवीत आहे हेही जाणवलं. निवेदक म्हणाला, 'या चमत्काराचं कारण असं की मॉरिशसची जमीन ही हजारो वर्षे पीक दिलेली प्रौढा नाही, ती नवोढा आहे...' अशाच लालित्यपूर्ण भाषेत मग निवेदक तिथली भाषा, संस्कृती, तिथले लोक, त्यांच्या संघटना यावर माहितीपूर्ण पण थोडक्यात बोलत राहिला.

पौर्वात्य विद्यांचा अभ्यास व संशोधन करणारी तेथील महात्मा गांधी संस्था. तेथे भरणाऱ्या मराठी परिषदा, मराठी लेखक संघ, नाट्य संस्था, मराठी शिकविणाऱ्या शाळा, तेथील मराठा मंदिर संस्था तेथे होणारे कार्यक्रम यांची माहिती देता देता मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन होण्यासाठी आवश्यक असलेली ग्रंथालयं, भारतीयांशी भाषिक आणि सांस्कृतिक आदान प्रदान, ग्रंथनिर्मितीसाठी प्रकाशन आणि आवश्यक ते प्रोत्साहन इत्यादीबाबतच्या भारतीयांपासूनच्या अपेक्षाही त्याने व्यक्त केल्या. तेव्हा तेथील जनतेच्या अंतरात तेवणारा मराठी भाषेचा ज्ञानदिवा पाहून मराठी भाषेचा रत्नकिळा (रत्न) हाती असताना परक्या भाषेचा तोरा मिरवणारे आम्ही किती लहान आहोत याची जाणीव झाली.

कार्यक्रम चालू असताना स्वयंसेविका माहितीपत्र, निमंत्रण पत्रिका, विशेष म्हणजे फिल्टर वॉटरच्या सील्ड बाटल्या नि ग्लासही आणून देत होत्या. आमच्यापेक्षा आमच्या आरोग्याची काळजी तिथल्या जनतेला जास्त आहे हे पाहून खरंच गहिवरून येत होतं.

प्रास्ताविकानंतर शिलाबाय बापू, अनिरुद्ध जगन्नाथ, रिंगाडो, बाबूराम महादू, विरजानंद मल्लू अशा मान्यवरांनी आम्हा भारतीयांचे स्वागत करून आमच्याबद्दल प्रेम आणि आपुलकी व्यक्त केली. त्यानंतर वाङ्मयप्रचुर, रसाळ, माहितीपूर्ण भाषणं झाली. भाषणांचा मथितार्थ एकच होता की, मराठी भाषेचं संवर्धन आणि विकास होण्याच्या दृष्टीनं उभय देशाचं


परस्पर प्रेम वृद्धिंगत झाले पाहिजेत. यावर श्रोत्यांचीही अनुकूल टाळी पडत होती. मात्र महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं भाषण इंग्रजीत असल्यामुळे सभागृहात बरीच खुसफुस चालली होती. उलटसुलट प्रतिक्रिया उमटत होत्या. तर रात्रभर विमान प्रवासातलं जाग्रण नि दुपारचं मसालेदार जेवण बऱ्याच मंडळींच्या अंगावरून डोळ्यांवर चढलं होतं. डोळे टेकीला आले होते नि शरदरावांच्या प्रत्येक मुद्याला माना आपोआपच डुलत होत्या.


स्वयंसेविकांनी दिलेल्या निमंत्रण पत्रिका पाहिल्या तर त्याचदिवशी सायंकाळी ५-३० ला गव्हर्नर जनरलाच्या बंगल्यावर चहा-पान नि रात्री फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जेवण असा संध्याकाळचा भरगच्च कार्यक्रम होता. त्यामुळे मॉरिशियनांच्या सधन अशा सांस्कृतिक जीवनाचा जवळून परिचय होणार होता म्हणून मी खूष होते.

थोड्या वेळाने व्यासपीठावरील कार्यक्रमाचा समारोप झाला आणि संपुर्ण सभागृहात कडेने आणि मधल्या ओळीत उभ्या असलेल्या हजारो मॉरिशिअन स्त्री पुरुषांनी एका तालात सुरात मॉरिशसचं मंगल गीत म्हणायला सुरुवात केली नि उठता उठता खुर्चीला खिळून बसत टाळ्या वाजवीत आम्हीही आपोआप त्यांच्यात सामील झालो. नाचूया गाऊया, नाचूया गाऊया मंगल गान मॉरिशस हा देश महान.

सुंदर सुंदर दऱ्या शोभती । इवल्या इवल्या नद्या वाहती

देश आमुचा स्वर्ग समान । स्वर्ग समान, स्वर्ग समान.....





**मॉ**रिशस मंगल गीत गाणाऱ्या त्या हजार चेहऱ्यात एक चेहरा आपला पेहराव नि गाण्याच्या विशिष्ट लकबीमुळे सर्वांचं लक्ष आपल्याकडे वेधून घेत होता. भगवा फेटा नि गुलाबी अंगरखा घातलेला तो एक गोरटेलासा तरुण होता. मुख्य गायक दिग्दर्शकही तोच होता. गाणं चालू असताना मध्येच तो उंच स्वरात हर्ररर असा आवाज काढायचा नि एकदम समेवर यायचा. गोफण भिरकावताच पाखरांनी भुर्ररर करत फडफडावं तशा लोकांच्या कडाडून टाळ्या पडायच्या. त्याच्या तालावर लोक ठेका धरायचे. नाचू या गाऊ या म्हणत झुलायचे, डुलायचे.

त्या तरुणाचा तो हर्ररर पुढे आमचा चेष्टेचा, गमतीचा विषय झाला.

पण खरी गोम होती ती त्याच्या भगव्या फेटयात जी मला शेवटी कळली. गाता गाता डुलता डुलता तबल्यावर मोठी थाप पडली. हर्ररचा स्वर टिपेला पोहोचला नि खटका दाबावा तसं एकदम गाणं थांबलं. सर्वांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. हळूहळू टाळ्या विरल्या एक क्षण दोन क्षण सर्वत्र शांतता पसरली नि पाठोपाठ पाश्चात्य संगीताचे बँडवर मंद मंद स्वर उमटू लागले; त्याबरोबर लोक उठून स्तब्ध उभे राहिले. ते होतं मॉरिशसचं राष्ट्रसंगीत. बँडच्या नुसत्या स्वराचं... तेच त्याच राष्ट्रगीत होतं.

राष्ट्रगीतानंतर माणसं विस्कटली. उठली. एकमेकांना भेटू लागली. पुढच्या रांगेतल्या शरद पवार, पु. ल. देशपांडे, वसंत कानिटकर, लक्ष्मणशास्त्री जोशी वगैरेंशी काहीजण जवळीक साधू लागले. त्यांच्याशी बोलण्याच्या पोझमध्ये काहींनी फोटो काढले. ती सर्व

मंडळीही सर्वांशी खेळीमेळीने वागू, बोलू लागली, मी नेहरूकर सरांना गाठलं. म्हटलं सर, तो विद्यार्थी कुठाय, ज्याची पुस्तक माझ्या बॅगेत आहेत तो? सर त्यांच्या नेहमीच्या शांत स्वरात हेल काढत म्हणाले "अग हो ऽ ऽ ऽ मी पण त्यालाच शोधतोय, पण दिसला नाही कुठे· ऽ ऽ ऽ पण तो येईल. मी पाठवतो त्याला पुस्तकं घ्यायला एल. मोनॅकोत. अग पण तू चहा वगैरे घेतलास का?' ही काय, तिकडेच तर निघालेय असं म्हणून मी वळले. आशा, फ्लोरा माझ्यासाठी थांबल्या होत्या.

दुपारी आम्ही कार्यक्रमाच्या ओढीनं आलो तेव्हा आजूबाजूला न पहाता थेट सभागृहात जाऊन बसलो होतो, आता मात्र महात्मा गांधी मेमोरिअल नि त्याचा आजूबाजूचा परिसर नीट पहात होतो. मेमोरियलचा आवार खूपच प्रशस्त होता, दर्शनी भागी महात्मा गांधीची मुर्ती होती. धातूची पुरुषभर उंचीची दांडी यात्रेला चाललेल्या पोझमधली. तिथेच भारताचा तिरंगा नी मॉरिशसचा चौरंगा ध्वज (तांबडा, पिवळा, निळा, पांढरा) गळ्यात गळा घालून उभे. सभोवताली मऊ हिरवळ पसरलेली.

ज्या सभागृहात कार्यक्रम आयोजित केला होता त्याला लागून लहान मोठया इमारती आहेत. त्यात मराठी, हिंदी, गुजराथी, चिनी वगैरे भाषा शिकवण्याचे वर्ग आहेत. मॉरिशसच्या साहित्यिक सांस्कृतिक चळवळीचे हे केन्द्र आहे. इथेच बाजूला एक उपहार गृह आहे. त्याच्यासमोर उंच पायऱ्यांचा प्रशस्त आवार आहे. बाजूला पोहण्याच्या तलावासारखा उतरता खोलगट भाग आहे. त्याच्या पलिकडे पांढऱ्याशुभ्र सिमेंटच्या मनुष्याकृती शोभेसाठी मांडल्या आहेत. दूरवर पसरलेल्या हिरवळीच्या पार्श्वभूमीवर या मूर्ती फार आकर्षक दिसतात. मेमोरियलच्या या भागातच 'स्टोन बॉय' या हिंदी मालिकेचा काही भाग चित्रीत झाला होता. कॅन्टीनच्या इमारतीतच होतं एक प्रदर्शन. मॉरिशसमध्ये आलेल्या भारतीयांच्या वस्तू, फोटो, ग्रंथ काही प्रतिकृती तिथे मांडल्या होत्या. मुख्यमंत्री शरद पवारांच्या हस्ते त्याचं उद्घाटनही झालं होतं. काही मंडळी तिकडे वळत होती तर काही चहापानाकडे. आम्हीही चहाकडे वळलो.

भारतीय पाहुण्यांना अगदी घरच्यासारखं वाटावं यासाठी यजमान्यांचा आटोकाट प्रयत्न दिसत होता. आडव्या लांब टेबलावर मुगाचे लाडू, पुरणपोळया, अळूवडया, चिरोटे अशा खास महाराष्ट्रीयन पद्धतीचा फराळ ताटे भरभरून ठेवलेला होता नि लोक त्याचा भरभरून आस्वाद घेत होते. कुठे काय उणं राहू नये या दक्षतेनं ओथंबलेले मॉरिशियन स्वयंसेवक वाकून वाकून कुणाला चहा, कॉफी, थंड काय हवं ते विचारत होते. तेही मराठीत अगदी जाणीवपूर्वक. तशी त्यांची भाषा क्रिओल. परस्परांशी बोलताना त्याच भाषेत बोलत. हावभावावरून त्याचं बोलणं थोडसं समजे. चहापानाच्यावेळी काही मंडळी गप्पात रंगली होती. चहापानानंतर होणारा दशावताराचा कार्यक्रम पहायला मात्र सर्वजण उत्सुक होते.

कोकणातून दिडशे वर्षांपूर्वी मॉरिशसमध्ये आलेली ती लोककला पहायला हॉलकडे परतत होते.

आमच्या पाठीमागे काही मंडळीत मॉरिशसच्या इतिहासाची चर्चा चालली होती. 'काय हो, अरब आणि स्वाहिलींच्या नावाड्यांना दहाव्या शतकात हे बेट माहीत झालं म्हणे.' 'हो, तो निवेदक नाही का सांगत होता की १५१० नंतर इथे पोर्तुगीज आले आणि त्यानंतर पाऊणशे वर्षांनी डच आले नि १७१० त ते परतही गेले. पुढे १७६७ मध्ये फ्रेंचांनी या बेटाचा ताबा घेतला.'' ''अहो पण खऱ्या अर्थाने इथली भरभराट केली ती ब्रिटीशांनी. १८१० ते अगदी काल परवापर्यंत म्हणजे १९६८ पर्यंत ते या देशात होते.'' दुसऱ्या एकाने शंका विचारली, काय हो आपल्यासारखंच दिडशे वर्ष ब्रिटीशांनी इथे राज्य केले, मग ते गेले कसे, यावर कुणीतरी चेष्टेत म्हणाला, 'अहो, दुपारचं आपल्या मुख्यमंत्र्याचं इंग्रजी भाषण ऐकून' त्याबरोबर हास्याचा फवारा उडाला.

चहापान उरकून आम्ही हॉलमध्ये आलो तर पावसाळ्यात तुडुंब भरलेला तलाव उन्हाळ्यात कोरडा ठाक पहावा तसं सभागृह रिकामं दिसत होतं. भारतातून आलेली पाहुणे मंडळी नि परिषदेची संयोजक मंडळीच काय ती तिथे होती. नऊवारी साड्या नेसलेल्या स्त्रिया नि धोतरवाली पुरुष मंडळी कुठे दिसली नाहीत. आमच्या कुडाळ सावंतवाडी भागातल्यासारख्या दिसणाऱ्या त्या माणसांना भेटायला मी उत्सुक होते. नेरूरकर सरांना मी त्यांच्याबद्दल विचारलं तर सर म्हणाले, अग त्यांच्या घरी आपण नंतर जाणारच आहोत. ती मंडळी माझ्या परिचयाची आहेत, पण तू आधी यांना भेट. असं म्हणून सरांनी तिथल्या काही मंडळींशी माझी ओळख करून दिला. ती सर्व मंडळी मॉरिशसमधले शिक्षक, प्राध्यापक, मोठमोठे अधिकारी, साहित्यिक वगैरे बडी मंडळी होती, पण परिषदेत अंग मोडून मेहनत करत होती, आस्थेवाईकपणे बोलत होती.

माझं लक्ष काही स्त्रियांनी आपल्या वेणीकडे आणि आंबाडयात भाळलेल्या पांढऱ्या चाफ्याच्या नि रुईच्या फुलांकडे, गजऱ्याकडे वारंवार जात होतं. रानफुलातलं सौंदर्य टिपण्याची बालकवी वृत्ती त्या सामान्य माणसांतही दिसत होती नि त्या रानफुलांनीही तिथल्या स्त्रियांच्या सौंदर्यात तितक्याच उत्कटतेनं भर टाकली होती.

व्यासपीठावर दशावताराची सिद्धता झाली. बाज्याच्या पेटीचे सूर उमटू लागले तशी इकडे तिकडे पांगलेल्या मंडळींनी खुर्च्या पकडल्या टी. व्ही. कॅमेरेवाले पुन्हा एकदा व्यासपीठाच्या रोखानं सरसावले. व्यासपीठावर एका बाजूला दहा बारा खुर्च्या मांडल्या होत्या. त्यावर हातात टाळ-चिपळ्या घेतलेले साध्याच वेषातले स्त्री-पुरुष बसले होते. काहीं हातात झांज होते तर काहींच्या मांडीवर पखवाज, समोर ध्वनीक्षेपक होता दुसरी बाजू पात्रांच्या हालचालीसाठी मोकळी सोडली होती. पुढे बसलेल्या प्रमुख गायकानं आम्ही

आता गणेश जन्माचं आख्यान सांगणार आहोत असं निवेदन केलं. त्याचं बोलणं शुद्ध आणि स्पष्ट होतं. त्याला मराठी बोलण्याच चांगलाच सराव दिसत होता.

गणेश जन्माची कथा सर्वांना माहीत होती. पार्वती स्नानाला जाण्यापूर्वी अंगावरच्या मळाचा मुलगा तयार करून त्याला पहाऱ्यावर बसवते. मग शंकराला भेटायला येणाऱ्या नंदीला, ब्रह्मा, विष्णूला तो मुलगा अडवतो. शेवटी शंकर येतो त्यालाही अडवतो. नंतर शंकराकडून मुलाची हत्या नि हत्तीचं शिर बसवणे वगैरे. त्या कथेतील सर्व पात्रांव्यतिरिक्त अन्य देवी देवता चेटकीणी वगैरे मिळून सुमारे एकवीस बावीस माणसं स्टेजवर वावरत होती. पण तो कार्यक्रम सर्वांच्या नजरेत भरत होता तो त्या मंडळींच्या कमालीच्या शिस्तीमुळे. प्रत्येक पात्र आपलं ठरलेलं काम ठरल्या वेळेत आखीव रेखीवपणे सादर करून एक्झीट घेत होतं. पात्रांची वेशभूषा केशभूषा साजेशी होती. गायक मंडळी प्रत्येक प्रवेश गायनातून निवेदन करत होते नि प्रवेश संपताना 'थे कितान ता दे था.' हा परवलीचा शब्द उच्चारून थांबत होते. कुठेही नवखेपणा बुजरेपणा नव्हता. होती एक लयबद्ध हालचाल, एक जोश, एक आवेश... नाचता नाचता मुखवटा लावून नंदी झालेला मुलगा स्टेजवरून खाली पडला अगदी साफ उताणा. तरीही उठून तो नाचत नाचत परत स्टेजवर गेला तेव्हा आसनावरून उठून पु. ल. देशपांडे पुढे गेले नि त्याला शाबासकी देत म्हणाले, ''अरे हा खरा आमचा नंदी!'

मॉरिशियन मंडळींच्या प्रत्येक कार्यक्रमात शिस्त प्रकर्षानं जाणवत होती. ठरल्या वेळेप्रमाणे बरोबर साडेसातला दशावतार कार्यक्रम संपला नि डिनरसाठी एका हॉटेलमध्ये आपण जायचे आहे अशी अनाउन्समेंट झाली. लोक भराभर उठले नि आपापल्या ग्रुपमधल्या सोबत्यांना शोधू लागले. आपण कुठे हरवू नये याची प्रत्येक जण काळजी घेत होता. परमुलखात गेल्यावर आपल्या माणसांना धरून रहाण्याच्या स्वाभाविक वृत्तीने सर्वजण आपापल्या ग्रुपला चिकटून होते.

दुपारी आलो त्याच गाडयांमधून आम्ही नियोजित हॉटेलकडे एखाद्या मोहिमेवर निघावं तसं एका मागोमाग एक अशा मोटारींच्या ताफ्यातून निघालो. बाहेर चादणं होतं नि हवेत गारवा. मधूनच पावसाची बारीकशी सर सरसरून जात होती. रस्ते ओलावत होते नि त्या ओलसर रस्त्याच्या मध्यभागी जमिनीत ओळीनं खोवलेले कॅटआईज गाडीच्या प्रकाशात खरोखरच मांजराच्या डोळ्यांसारखे चकाकत होते. मॉरिशसमधल्या जवळ जवळ सर्वच रस्त्यांवर असे कॅट आईज खोवलेले आहेत. ती मर्यादा कोणतंही वाहन उल्लंघत नाही किंवा रस्त्यात आडवी गाडी घालून इतरांचा खोळंबा करत नाही. मागच्यानं हार्न वाजवून वॉर्न करणं हा इथे अपमान समजतात.

एका अत्याधुनिक हॉटेलसमोरच्या बागेत आमची गाडी थांबली मॉरिशसमधली झगझगती दुनिया माझ्यासमोर उलगडू लागली. मोठमोठी झुंबर, पोर्ट्रेट, दिवे, सारं काही उंची हॉटेलच्या प्रतिष्ठेला शोभणारं. त्या हॉटेलची आठवण म्हणून काउंटरशी उभं राहून आम्ही फोटो काढले. तेवढ्यात गोखले म्हणाले, 'इथेच बाजूच्या हॉटेलमध्ये माझा एक मित्र राहिला आहे. चला त्याला आधी भेटून येऊ.' बाजूचं हॉटेलही पाहून घेऊ म्हणत मीही सर्वांबरोबर निघाले.

ते हॉटेल पाहून मला 'नंबर सिक्स्टी फोर, अ हाऊस इज अ बांबू डोअर' हे गाणं आठवलं खरंच बांबूचे घर पहायला हवे, बांबूच्या घरात रहायला हवे असंच वाटत होतं. हॉटेलची इमारत प्रशस्त होती. आवार मोठा होता. पोहण्याचा तलाव वगैरेही अत्याधुनिक दिसत होता, पण संपूर्ण आवारभर बांबूचीच कलाकुसर होती. हॉटेलमधील खुर्च्या टेबल साऱ्यांवर बांबूच्या बारीक काडया जोडून केलेली नक्षी तर होतीच, शिवाय जमिनीवरही बांबूच्या काडयांचंच डिझाइन होतं. इतकच नव्हे तर मधल्या खांबांवरही वेगवेगळया आकाराच्या लहान मोठया बांबूच्या काडयांनी कमळाकृती मत्स्याकृती तयार केलेली होती. काउंटरचं टेबल, हॉलमधल्या शोभेच्या वस्तू सारं सारं सणसणीत बांबूंच्या बोरूंनी, छड्यांनी, पटटयांनी केलेलं. त्या हॉटेलमधून आमचा पाय निघत नव्हता. अलका मिस्कीलपणानं म्हणाली, 'पळा पळा! नाहीतर बांबूच्या छडया बसतील छमछम् नि म्हणाल आई ग छडी लागे...'

''मॉरिशसमध्ये अशी पाश्चात्य पद्धतीची अत्याधुनिक व आपापलं वेगवेगळं वैशिष्ट्य जोपासणारी बरीच हॉटेलं आहेत.'' प्रा. पांढरीपांडे माहिती देत म्हणाले. ते मॉरिशसमध्ये बरेच दिवस राहिले होते. मुंबईतल्या बडया हॉटेलसारखीच इथल्या हॉटेलमधून बँडवादन, आर्केस्ट्रा नृत्याची सोय असते. बोटींग, माशांची शिकार, प्रेक्षणीय स्थळांना भेट अशाही सोई प्रवाशांसाठी इथे असतात. परदेशी पर्यटकांची इथे सतत वर्दळ असते. परराष्ट्रीय राजकीय पाहुण्यांचीही इथे सतत ये जा असते. या पाहुण्यांवर मॉरिशस सरकार भरमसाठ पैसा खर्च करतं.

बांबूचं हॉटेल पाहून आम्ही आमच्या नियोजित हॉटेलात परतलो. दारावरच्या सुटाबुटातल्या माणसाने आम्हाला थेट आत नेलं. जेवण घरात. घर कसलं, तो महालच होता. गोलाकार टेबलं, त्याभोवती खुर्च्या, टेबलावर पांढराशुभ्र परीटघडीचा टेबल क्लॉथ, त्यावर मध्यभागी काचेच्या मेणबत्तीचा स्टँड, सभोवती गोलाकार डिसेस, ग्लासेस, काटे, चमचे सर्व एकदम साहेबी थाट. हॉलच्या मध्यभागी प्रशस्त टेबलावर कसले कसले पदार्थ, आईस्क्रीम, केक्स आणि काय काय रचून ठेवलेलं जवळच मोठया आडव्या स्टँडवर तपेलीसारखी भांडी आडवी टांगलेली नि खाली गॅसच्या शेगडया पेटलेल्या. दुसऱ्या


बाजूला कसली कसली पेये ठेवलेली नि त्या सर्वामधून माणसं बसलेली, काही उभी. बोलतायत, खातायत, पितायत. आजूबाजूला पांढऱ्याशुभ्र पोशाखातले वेटर्स, खानसामे उंच टोप्या घालून वावरत होते. पाणी, नॅपकीन काय हवं ते सर्व्ह करत होते. पदार्थ आपले आपणच घ्यायचे होते.

माझ्या डोळयांना वाईट खोड लागली होती म्हणून असेल, पण माझं लक्ष वारंवार त्या वेटर्स मंडळींकडे जात होतं. प्रश्न पडत होता की अशा बऱ्याच उशीरापर्यंत पाटर्या चालणाऱ्या हॉटेलमधले वेटर्स आधी जेवत असतील की भारतीय आदर्श गृहिणीसारखं सर्वांचं जेवून झाल्यानंतर? की सर्व जेवले या तृप्तीनच त्याची पोटं भरत असतील?

आम्ही एका टेबलावर बसलो. आमच्या सोबत डॉ. शरदिनी डहाणूकर येऊन बसल्या. पुढ्यातल्या डीश उचलून आशा-फ्लोरा जेवण आणायला निघाल्या. मीही निघाले. टेबलावर इतके पदार्थ होते त्यापैकी नेमकं काय घ्यावं तेच मला कळत नव्हतं. फ्लोरा काय घेते, आशा काय खाते ते बघत त्यांच्या मागोमाग मी हिंडत होते, वाटेत माधवराव गडकरी भेटले. नेहमीच्या उंच आवाजात म्हणाले 'काय पवार, कसा काय झाला प्रवास?' ते मला विचारत होते तेही सहज म्हणून पण त्यांच्या स्वत:चा प्रवास ठीक झालेला दिसत नव्हता त्याबद्दलच मग ते बाजूच्या व्यक्तीशी बोलू लागले.

जेवण घेण्यासाठी मी आशा-फ्लोरा मागून हिंडत होते खरी पण त्या जे घेत होत्या त्याची चव बघून ते त्या का घेत होत्या तेच मला कळत नव्हतं. आजूबाजूच्या टेबलांवर लोक चमचमीत पदार्थ खाताना दिसत होते नि ते कुठे मिळतात या शोधावर मी निघत होते. कॅटलॉग न पहाता भल्या मोठया लायब्ररीत शिरावं नि आपल्याला हवं ते किंवा तसं एकही पुस्तक हाती लागू नये तशी माझी अवस्था झाली होती. आशा-फ्लोराच्या मदतीनं खाता येईल तेवढ्यावरच भागवून मी उठले.

बाहेर टिपूर चांदणं पडलं होतं नि त्या चांदण्यात समोरची बाग नि पलिकडची गर्द झाडं उजळून निघाली होती. त्या रुपेरी चांदण्यात न्हालेल्या दृश्यावर नजर भिजवत मी नि:शब्द उभी होते. तेवढयात आशा म्हणाली, 'उर्मिला वर बघ आकाशात. मी वर पाहिलं. पौर्णिमेचा पूर्ण चंद्र जणू डोक्यावर ओथंबला होता. त्या पूर्ण चंद्राभोवती सप्तरंगी इंद्रधनुष्याचं गोलाकारकंड विलक्षण तेजानं झळाळत होतं. आकाशातले दूरचे तारेही प्रखर तेजानं झगमगत होते. स्वच्छ हवेतून थेट काळजात उतरणारं चंद्रताऱ्याचं ते अनावृत नीतळ दर्शन बराच वेळ आम्ही हृदयात साठवत होतो. त्या दर्शनानं माझं पोट आता तुडुंब भरलं होतं.



रात्री पार्टीतलं जेवण आटोपून हॉटेलात परतायला बराच उशीर झाला त्यामुळे उठलोही उशीरानंच. हॉलवर बरोब्बर नऊ वाजता हजर रहायचं होतं त्यामुळे घाईगडबडीनं आंघोळ वगैरे उरकून आम्ही दोघी खाली आलो. कॅन्टीनच्या बाजूनं बऱ्याच मंडळींचा गलका ऐकू येत होता.

कॅन्टीनमध्ये आलो तर तिथे नाटकातल्या ग्रीमरुमसारखं दृश्य दिसत होतं. नऊवारी साडया, केसांचा आंबाडा, त्यावर गजरे, नाकात नथ वगैरे घातलेल्या मुली नी शाहीरी वेश परिधान केलेले मुलगे बसलेले होते. शाहीर साबळे आणि पार्टीच्या 'महाराष्ट्राची लोकधार' मधले ते कलाकार होते. त्यात पांढरी सुरवार कमीज आणि वर किरमिजी जाकीट घातलेले शाहीर साबळेही दिसत होते. अगदी स्टेजवर जायच्या तयारीनं मंडळी बसली होती नी त्यांच्या बाजूला बसलेले आफ्रिकनही काळा कुळकुळीत मेकप करून त्यांच्यातले कलाकारच आहेत असं वाटत होतं.

आम्ही दोघी पुढे झालो. शाहीरांच्या बाजूच्या टेबलशीच साबळयांच्या चेहरेपट्टीच्याच त्यांच्या दोन मुली यशोधरा नी वसुंधरा बसल्या होत्या. चारुशीला आली नव्हती. मी त्या दोघींशी बोलू लागले. यशोधरा मितभाषी वाटली तर वसुंधरा बरीचशी बोलकी.

'आज कुठं कार्यक्रम आहे तुमचा?' मी विचारलं.

'आज आम्हाला बऱ्याच ठिकाणी जायचं आहे' असं म्हणून तिनं पटापट दोनतीन ठिकाणची नावं घेतली.

'लोकांचा रेस्पॉन्स कसा काय आहे?'

'फारच छान. प्रत्येक ठिकाणी प्रयोग हाऊसफुल असतो. शिवाय माणसंही खूप प्रेमानं बोलतात वागतात. असं वाटतं ही आमची, आमच्या कुटुंबातलीच आहेत सारी...'

वसुंधरा आनंदून बोलत होती. बाकीच्यांच्या चेहऱ्यावरही तसाच आनंद दिसत होता. कार्यक्रमातली सर्वच मुलं, मुली कॉलेजमध्ये शिकणारी होती. शाहीरांचा बारा-तेरा वर्षांचा नातू केदारही आजोबांसारखाच खडया आवाजात गात होता.

'लोकधाराचं' चांगलंच नाव झालं होतं. इंग्लंड- अमेरिकेहूनही लोकधारेला मागणी होती. मॉरिशसमध्ये दिवसाला दोन दोन तीन तीन कार्यक्रम होत होते. शाहीर साबळे आणि कुटुंबानं अतिशय मेहनतीनं, असीम प्रयत्नानं शून्यातून फार मोठं यश संपादन केलं होतं. पण माणूस कितीही मोठा झाला, कर्तृत्ववान झाला तरी त्याची जात काय हे जाणून घेणारे काही मनूचे वंशज असतातच. शाहीर साबळ्यांनाही 'तुमची जात काय' असा प्रश्न भारतातून गेलेल्याच कुणा प्रतिनिधीनं तिथे जाऊन विचारला असं नंतर कळलं नी जागतिक मराठी परिषदेचं फलित काय असा मला प्रश्न पडला.

शाहीर साबळे पार्टीला घेऊन जाणारी गाडी आली नी मंडळी निघून गेली. आम्हीही तोच तो कासवाच्या पाठीसारखा पाव, अमूल बटर नी शाडूचा चहा घेऊन बाहेर आलो, तर अगदी पायाला घडयाळाचे काटे बांधल्यासारखे किसन नी चंद्रसेन आमची वाट पहात गाडी घेऊन उभेच होते.

आदल्या दिवशीच्याच मार्गानं आमची गाडी निघाली. आता आम्ही त्या वाटेवर नवखे राहिलो नव्हतो. परिषदेकडे जाण्याचा मार्ग आमच्या चांगला परिचयाचा झाला होता. सकाळची कोवळी उन्हं सभोवतालच्या हिरव्या कुरणावर लखलखत होती नी थंडगार ताज्या हवेचे झोत अंगावर घेत आम्ही पुढे सरकत होतो. वाटेवरची मधल्या वर्तुळातली ती मृदुंगासारखी ताडाची झाडं मला ओढ लावत होती. आता जाताना त्या झाडांचा फोटो काढायचाच असं मी जाहीर केलं. ए त्या झाडांचा कसला फोटो काढतेस? म्हणत सर्वांनी माझी सूचना उडवून लावली. अहो, असं काय करताय, इतकी सुंदर झाडं नी उनही छान पडलंय. ते काही नाही, मी खाली उतरून त्या झाडांचा फोटो घेणारच. माझं तुणतुणं मी चालूच ठेवलं. सगळ्यांनी पुन्हा चेष्टा केली.

सर्कल आलं, झाडं दिसू लागली. अहो अहो, थांबवा जरा. थांबा मी असं म्हणेपर्यंत सर्कलला वळसा घालून सुळकन् गाडी पुढे आली सुद्धा. माझा चेहरा पडला. मागे वळून वळून बघत मी ती झाडं डोळ्यांनीच टिपत राहिले. तशी सुधा गोखले एकदम म्हणाल्या

'उर्मिला ह र्र र्र र्र...' नी आदल्या दिवशीच्या गाण्यातल्या हर्रर्र ची आठवण होऊन आम्ही सगळे हसत सुटलो.

हॉलवर पोहोचलो तेव्हा आदल्या दिवसासारखेच अगत्यशील स्वयंसेवक, सेविका स्वागताला दारावर उभ्या होत्या. हॉलही गच्च भरलेला होता. मात्र पाहुण्यांसाठी पुढे मोकळ्या खुर्च्या होत्या. समोरच गायकवृंद गायनासाठी उभा होता. आणि गाण्यानंतर होणार होता परिसंवाद.

बरोब्बर नऊ वाजता आदल्या दिवशीचं नाचूया गाऊया गीत परत सुरू झालं. आता ते अगदी आमचंच असल्यासारखं आम्ही सर्वांनीच ते तालासुरात म्हणायला सुरवात केली. त्या गाण्याच्या, जोडीला आता आणखी एक गीत सादर करण्यात आलं...

छान छान छान आमची बाग किती छान

फुलेही छान फळेही छान पक्षी किती छान...

ते गीत ऐकून मला 'या बाई या, बघा बघा कशी माझी बसली बया' या बडबडगीताची आठवण झाली, इतकं ते सरळ आणि बालबोध होतं. मात्र त्या गाण्यातल्या दोन तीन ओळी थोरांनीही बोध घेण्यासारख्या होत्या.

हिरवा चाफा करीत नाही शेवंतीचा हेवा

जास्वंदीच्या रंगछटेची गुलाब करतो वाहवा

उंच नारळींनाही हिरव्या गवताचा अभिमान

छान छान छान......

या दोनही गीतांच्या तालावर सगळे टाळ्या वाजवू लागले, डोलू लागले त्या गीतांच्या स्वराशयाने आमची मनं इतकी धुंदफुंद होऊन गेली की त्यानंतर झालेल्या परिसंवादाकडे मनाला ओढून आणताना बागेत बागडणाऱ्या मुलांना घरी आणताना पालकांची व्हावी तशी आमची स्थिती झाली. ती दोनही गीतं मनाच्या कप्प्यात टाकून आम्ही परिसंवादाकडे वळलो.

महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्र हे परिसंवादाचं नाव खूप चांगलं होतं, पण का कोण जाणे मला ते ऐकून हसूच येत होतं. माझ्या आजूबाजूला मराठी-हिंदी-इंग्रजी असं भेसळयुक्त संभाषण चालू होतं. त्यात आपला भाऊ, बहीण, मुलगा किंवा आपल्या भावा-बहीणीची दिरा-नणंदेची मुलं वा असेच नातेवाईक परदेशी कुठे कुठे ग्रीन कार्ड होल्डर झाले आहेत,

त्यांनी तिथे कसा उत्कर्ष साधला आहे, याचा अभिमान डोकावत होता. त्यांच्या मुलांना कसं मुळ्ळीच मराठी येत नाही त्याचं कौतुक ओघळत होतं आणि मराठी बोलणं, दिसणं, असणं जरा 'हेच' मानून इंग्रजी माध्यमात शिकलेली माणसंही महाराष्ट्राबाहेरच्या मराठीसंबंधी ऐकायला सरसावून बसली होती.

परिसंवादाचं सूत्रसंचालन कविवर्य वसंत बापट करत होते जगात मराठी भाषा कुठे कुठे बोलली जाते आहे, मराठी संस्कृती कशी टिकवली जात आहे हे सांगून मॉरिशसमध्ये मराठी भाषा टिकली आहे याबद्दल कौतुक होत होतं आणि यापुढेही ती टिकून रहावी, वाढावी यासाठी अनेक उपक्रमही अगदी पोटतिडीकीने सांगितले जात होते.

तरुणांना मराठी भाषेकडे, संस्कृतीकडे आकर्षित केलं पाहिजे. पुस्तकें, वाचनालयें, कॅसेटस मोठया प्रमाणात निघाल्या पाहिजेत. दर्जेदार साहित्य वाचलं जावं. ज्ञानेश्वरीचं वाचन व्हावं, इतकंच नव्हे तर मराठी ही सक्तीची भाषा व्हावी इथपर्यंत वक्ते बोलत होते. भाषणं रंगत होती. मॉरिशियन मंडळी ऐकत होती आणि ते सर्व मला बाळ हरदासेंच्या गोष्टीसारखं वाटत होतं.

एकदा बाळ हरदासे बस्तरमध्ये मिशनऱ्यांविरुद्ध भाषण द्यायला गेले तेव्हा त्याचं स्वागत करायला एक मिशनरीच पुढे आला. म्हणाला, 'तुमच स्वागत असो.' हरदासेंनी त्याला विचारलं, 'माझ्या भाषणाची तुम्हाला भीती नाही वाटत?'

मिशनरी म्हणाला, 'नाही. कारण तुम्ही निघून जाणारे आहात. मी इथेंच आहे.'

परिसंवादनंतर आभार मानायला वसंत बापट उठले. म्हणाले, 'आभार मानायला घेतले की लोकांना लवकर भूक लागते.' तसंच झालं होतं. भराभर उठून आम्ही बाहेर आलो.

आदल्या दिवशीच्या चहापानाच्या जागीच आता जेवणासाठी लोक रांगेनें उभे होते. छातीवर एखाद्या मेडलसारखे बॅजेस लावून स्वयंसेवक इकडे तिकडे वावरत होते. एकमेकात क्रिओल भाषेत बोलत होते. किली बीझ वँ? त्यांना काय पाहिजे! डेमाँड ली त्यांना विचारा. किंवा एखाद्याला टॉयलेट दाखवायला सांगताना, मोंथ्रेली टॉयलेट आले आले-म्हणजे त्यांना टॉयलेट दाखव जा, जा. याशिवाय वीं वीं म्हणजे होय होय, नी विनी विनी म्हणजे या या. असे शब्द तर वारंवार कानावर पडत होते.

जेवणाच्या रांगेत आम्ही उभे राहिलो. खरं तर रांगा बिंगा म्हटलं की आमचा मस्तकशूळ उठतो. विशेषतः भूकबीक लागली असताना फारच. आपला नंबर येईपर्यंत जेवण संपलं तर, असा भीतीचा गोळा भुकेबरोबर उगाचच पोटात उठतो. वाढप्याच्या हातात नवीन पदार्थ काय आहे हे माना वळवून वळवून पहात सर्व जण पुढं सरकत होतो.

जेवणात इथला काहीतरी वेगळा पदार्थ असेल असं वाटल होतं. पण प्रत्यक्षात फोर्टमधल्या केळकरांच्या हॉटेलातही महाराष्ट्रीयन थाळी हातात पडत होती. वरण-भात, पुऱ्या, वांगं-बटाटा भाजी, लोणचं, पापड, दह्याचा पॅक टीन नी पक्वान्न म्हणून जिलबी. जेवण मात्र स्वादिष्ट नि रुचकर होतं. भरपूर होतं. विशेष म्हणजे आवडत्या माणसांसाठी एखाद्या प्रेमळ गृहिणीनं वाटीभर खास पदार्थ वेगळा काढून ठेवावा तसा बिगर शाकाहारी मंडळींना ते जेवण अळणी वाटू नये म्हणून त्यांच्यासाठी कोंबडीच्या मटणचा गंज वेगळ्या ठिकाणी ठेवलेला होता. जिलबीच्या परातीऐवजी त्या गंजाकडेच लोकांचे हात जास्त वळत होते.

स्वयंसेवक मंडळी ताटाभोवती फिरफिरून आग्रह करकरून वाढत होती. हवं नको बघत होती. एखाद्यानं टेबलावर तसंच टाकून ठेवलेलं उष्टं ताट, खरकटंही घरच्या माणसासारखं आपलेपणानं उचलत होती. ते सर्व पाहून पहिल्या परिषदेची आठवण सर्वांनाच होत होती.

मुसळधार पाऊस कोसळत होता. जेवणाच्या मंडपात पाण्याचे लोट येऊन रपरपीत चिखल झाला होता. जेवण घेताना सर्वांची एकच झुंबड उडाली होती. माणसं एकमेकांवर कोसळत होती. बऱ्याच प्रयत्नानं ताटात काय पडेल ते कसंबसं खाऊन तिथून निसटत होती नी त्या सगळ्या धुमश्चक्रीत आमची स्वयंसेवक मंडळी बिचारी आपण छातीवर बिल्ला लावला आहे हेही विसरली होती.

जेवण आटोपून आम्ही माडवातून बाहेर आलो तसी आशा म्हणाली, 'उर्मिला, पुढचं सेशन सुरू व्हायला अजून वेळ आहे. तोपर्यंत चल आपण प्रदर्शन पाहू.'

'होय होय. इथेच कुठेतरी आहे ते' असं म्हणत मी वळले. तेवढ्यात पाठीमागून येत असलेले मधु मंगेश कर्णिक समोर दिसले. ओळखीचं हसून ते पुढे जाणार तोच मी त्यांना म्हटलं, मघाचा तुमचा परिसंवाद छान झाला, पण एक गोष्ट खटकली.

'कोणती?' कर्णिक थांबून विचारू लागले.

इथल्या मराठी भाषेबद्दल, ती टिकवणाऱ्या लोकांबद्दल कुणीच बोललं नाही. खरं म्हणजे भाषा, संस्कृतीचं खऱ्या अर्थाने जतन, संवर्धन करतो तो तळागाळातला माणूसच. इथे मराठी भाषा जतन केली, टिकवली ती दीड-दोनशे वर्षांपूर्वी मजुरीसाठी भारतातून इथे आलेल्या तळागाळातील लोकांनीच. त्या लोकांवर , ती त्यांनी कशी टिकवली, काय प्रयत्न केले यावर कुणीतरी बोलायला हवं होतं नाही का? मी थोडसं तावातावानेच बोलले.

कर्णिक अगदी निर्मळ हसले, 'खरं आहे तुमचं म्हणणं, खरचं त्यावर बोलायला हवं होतं.' असं म्हणून ते हॉलकडे वळले नी आम्ही प्रदर्शनाकडे.

प्रदर्शनाच्या हॉलमध्ये पाऊल ठेवल्याबरोबर मॉरिशसमध्ये आलेल्या पहिल्या भारतीयांच्या अनेक वस्तू आमच्यासमोर फेर धरून नाचू लागल्या. त्यांनी जतन केलेले ज्ञानेश्वरी, तुकारामाच्या गाथेसारखे ग्रंथ, त्यांची तांब्या पितळेची भांडी, विळे, पहार, करवती कुऱ्हाडीसारखी हत्यारे, माती भरायची फावडी नी घमेली, त्यांचे जाडेभरडे सुती कपडे नी त्याच्या जोडीला त्यावेळेचे काही देखावेही तयार केलेले होते. त्यातले रंजले गांजलेले, हडकुळे, खंगलेले मजूर नी त्यांच्या पाठीवर हंटरचे वळ उठवणारे निर्दय वसाहतवादी... भारतातल्या दारिद्र्य आणि दुष्काळाला, रोगराईला कंटाळून जगण्यासाठी आलेली तळागाळातील जनता इथे कोणत्या परिस्थितीत जगत होती त्याचं ते चित्र पोटात कालवाकालव करत होतं.

जडावलेली पावलं परत फिरत असताना त्या दर्शनी भागी ठेवलेल्या ताम्रपटाजवळ थबकत होती नी नजर त्यावरील अक्षरात गुरफटत होती. कुणीतरी आर्त साद घालत म्हणत होतं...

वह अन्जान प्रवासी ...
देशके अंधे इतिहासने न तो उसे देखा था
न ही बेहरे इतिहासने सुना था
उसके चितकारोंको
जिसकी इस माटीपर बही थी
पहली बूंद पसीनेकी
जिसने चट्टानोके बीचसे हरयाली उगायी थी
वह पहिला गिरमिटीया इस माटीका बेटा
जो मेरा भी अपना था, तेरा भी अपना ...



वह पहिला गिरमिटीया इस माटीका बेटा।

जो मेरा भी अपना था तेरा भी अपना।।

ताम्रपटावरील या ओळींनी घातलेली साद कानामनात घोळवीत भारावून आम्ही हॉलमधून बाहेर पडलो. मी आशाला म्हटलं, मघाशी मी कर्णिकांना म्हणत होते ना ते हेच. या या आमच्या माणसांनाच आपण विसरता कामा नये. ज्यांनी अनन्वीत अत्याचार सोसूनही भारतीय संस्कृती टिकवली.

पाय ओढत आम्ही हॉलमध्ये आलो तेव्हा पुढचा परिसंवाद सुरू झाल होता. सकाळच्या मानानं आताची उपस्थिती बरीचशी रोडावलेली होती. काही मंडळी उद्योगधंद्यात काय ऐकायचं अशा चेहऱ्यानं बाहेरच्या रिमझिमत्या पावसाचा आनंद घेत थांबली होती, काही फिरायला गेली होती तर काही आपापल्या उद्योगाला.

आताच परिसंवाद मराठी माणसाच्या जागतिक उद्योगधंद्यावर बेतलेला होता. त्यावर बोलता बोलता वक्त्यांच्या भाषणाचा ओघ मॉरिशसमधील उसाचं उत्पन्न आणि साखर कारखाने याकडे साहजिकच वळत होता. मॉरिशस देश हा एकट्या उसाच्या उत्पन्नावरच उभा आहे. येथील एकूण उत्पन्नात ऐंशी टक्के फक्त ऊसाचं उत्पन्न आहे, वगैरे.

ऊस आणि दारिद्र्य हे साधारणतः एकाच ठिकाणी दिसत असतं असं म्हणतात. पण हा सर्वसाधारण नियम मॉरिशसने पार खोडून काढलेला आहे. याचं ठळक सामाजिक कारण हे आहे की, मॉरिशसमध्ये भारतातून आणि अन्य देशातून गेलेले लोक आता मजूर राहिलेले नाहीत. तेथील शेतीचे ते आता मालक आहेत. साहजिकच माझ्या श्रमातून

मी संपत्ती निर्माण करतोय, तिच्यावर माझी मालकी आहे ही भावना तेथील माणसाला समाधान, स्थैर्य आणि अधिक काम करायला बळ देत असते. त्यामुळे देशाचीही आर्थिक बाजू सबळ होण्यास मदत होते. ही भावना भारतातील कष्टकरी जनतेलाही अनुभवता येईल का, असा विचार मनात आल्यावाचून राहिला नाही. काहीही असो पण मॉरिशसमधील उसाची विपुल आकडेवारी ऐकून सांगली - कोल्हापूरकडे उस मळ्यावरच्या गुऱ्हाळावर जसा अगदी तांब्या लोट्यांनी उसाचा रस आकंठ पिता येतो तसा इथेही भरपूर रस पिता येईल या कल्पनेनं तोंडाला पाणी सुटत होतं.

तो संवादही साखर उसाचा सतत उच्चार केल्यानं अगदी गोड गोड होता. त्यात एक वक्ता म्हणाला की, मॉरिशसमधून भारतात येणारी साखर जशी 'मोरस साखर' या नावाने आपण पूर्वीपासून ओळखतो तसं मॉरिशसमधील मराठी भाषेला आता मोरस मराठी असंच नाव संयुक्तिक आहे. यावर श्रोत्यांमधून पुरंदरे ओरडले, "अहो मग आपल्या गोव्याच्या मराठीचं नाव काय?" तोच त्यांच्या बाजूलाच बसलेले अनिरुद्ध पुनर्वसू म्हणाले "फेणी, फेणी मराठी" आणि त्या फेणी मराठींवर सर्वत्र चांगलीच खसखस पिकली.

एकूण उद्योग व्यवसायात मराठी माणूस तसा फार पुढे नसतोच. तरीही त्याने अधिकाधित उत्पादनाच्या दृष्टीनं आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित केले पाहिजेत आणि त्यादृष्टीनं भारत - मॉरिशसजवळ आले पाहिजेत अशी अपेक्षा काहीजण अगदी सरळसोट शब्दात व्यक्त करत होते तर काहीजण आडपडद्यानं मनातली मळमळ बोलून टाकत होते.

'दादूमिया' या टोपणनावाने लिहिणारे श्री. नेने म्हणाले की, "व्ही. पी. सिंगानी जे केलंय त्याचं फळ म्हणून आम्हाला नोकऱ्या मिळणार नाहीत, तेव्हा आम्ही अन्यत्र व्यवसाय करू."

मला उठून म्हणावंसं वाटत होतं की तुम्ही ज्या 'आम्हीं'बद्दल बोलत आहात त्या आम्हीनींच सर्व नोकरी व्यवसायातल्या वरच्या जागा आधीच पटकावलेल्या आहेत 'तेव्हा' आम्ही, नसलेल्यांचं काय याचा 'तुम्ही' कधी विचार करणार?

ती 'आम्हीं'ची भाषा, मॉरिशियन समाज जातीनिहाय नसल्याने त्या मंडळींच्या डोक्यावरून गेली होती.

असो. परिसंवादानंतर चहा घेऊन सर्वांनी लगेच मॉरिशसचे गव्हर्नर जनरल श्री. रिंगाडू यांच्या बंगल्यावर गार्डनपार्टीसाठी निघायचं आहे असं निवेदन माधवराव गडकरींनी केलं आणि सर्वजण भराभर उठले. दुपारच्या जेवणानं की परिसंवादानं कुणास ठाऊक, सर्वांचे डोळे जरा पेंगुळल्यासारखे झाले होते.

चहासाठी जेवणाच्या मांडवात आम्ही परत शिरलो तिथे चहाबरोबर आदल्यादिवशीसारखीच पुरणपोळी, अळूवडी, लाडू, चिरोटे, बिस्किटं अशा पदार्थांची ताटं भरभरून ठेवलेली होती. खरं तर आता भूक नव्हती आणि हे खाऊन परत गार्डनपार्टीमध्ये काय खाणार... म्हणत फक्त चहा-कॉफी घेऊन आम्ही आमची गाडी पकडली. फ्लोरा, आशा, गोखले दांपत्य, नरेशमंत्री, अलका, पांढरीपांडे आणि मी असं आमचं अष्टक एकत्र जमताच गाडी हलली.

आमच्या पुढच्या गाडीत सिनेनट सचिन, त्याची बायको नी सुप्रिया नी मुलगी श्रीया होती. त्याच्याकडे बोट दाखवून शेजारी बसलेल्या जपानहून आलेल्या नरेश मंत्रींना मी काहींतरी सांगणार तेवढ्यात मंत्रीच म्हणाले, त्या डोंगराचं शिखर पहा माणसाच्या डोक्यासारखं दिसतंय, डोकं, खांदा नी मानही बघा. मला काही त्यांनी दाखवल्याप्रमाणे फारसं जाणवलं नाही. पण मी त्यांचं लक्ष समोरच्या गाडीकडे वेधत म्हटलं, तो. पहा सचिन नी शेजारी त्याची बायको सुप्रिया. मोठा ॲक्टर आहे तो तुम्हाला ठाऊक असेलच.

माझ्या बोलण्यावर नरेश मंत्री ओ हो हो... असा उद्गार काढून हसत सुटले.

म्हटलं, का हसताय? तशी म्हणाले,"तुम्हाला गंमत सांगतो. अहो, काल हा सचिन नी मी विमानात शेजारी-शेजारीच बसलो होतो. रात्रभर आम्ही एकमेकांशी काही बोललोच नाही. पण सकाळी उतरता-उतरता मी त्याला सहज त्याचं नाव विचारलं तर त्याने माझ्याकडे अशा काही विचित्र चेहऱ्यानं पाहिलं की, 'कोण हा बावळट माणूस' असंच त्याला म्हणायचं आहे असं वाटलं. मला कळेना माझं काय चुकलं होतं. मग त्याने जरा खेळकर चेहरा करून म्हटलं 'मी सचिन' नी तो माझी प्रतिक्रिया पहात राहीला. पण तरीही मला तो का पहातो ते कळेना आणि मग परिषदेत मात्र उलगडा झाला की तो फार प्रसिद्ध आहे'. ह्या नरेश मंत्रींच्या बोलण्यावर आम्ही सगळे खो खो हसलो.

आदल्या दिवशीसारखाच निघालेला आमचा व्ही.आय.पी. ताफा संध्याकाळच्या कोवळ्या उन्हातून आणि रिमझिमत्या पावसाच्या गोड शिडकाव्यातून पुढे पुढे सरकत एका विस्तीर्ण आवारात शिरला. अगदी प्रवेशद्वारापासून हिरवीकंच मखमली हिरवळ सर्वत्र पसरलेली होती. गोल्फ या श्रीमंती खेळाचं ते एक ऐश्वर्य संपन्न मैदान होतं नी त्याच्या मध्यभागी गोथिक वास्तुशास्त्राच्या मोजपट्टीत बसणारी शैदरी कौलाची राजवाड्यासारखी टुमदार इमारत उभी होती.

हिरवळीतून लडिवाळ वळण घेत आमच्या गाड्या त्या इमारतीसमोर थांबल्या. आमच्या आधी आत पोहोचलेल्या लोकांचा आतून हलकासा गलका ऐकू येत असला तरी बाहेरची निरव शांतता नी बंगल्यासमोर उभा असलेला शिस्तबद्ध नोकरवर्ग पाहून आम्ही आपोआपच मांजराच्या पावलांनी व्हरांडा ओलांडून आत गेलो.

आत हॉलमध्ये परिषदेची पाहुणे मंडळी हसत परस्परांशी गप्पा मारत उभी होती. आत डाव्या हाताला अंतर्गृह होतं नी समोर पाठीमागचा प्रशस्त व्हरांडा होता. त्या व्हरांड्यापलीकडे पसरलेल्या मऊ लुसलुशीत हिरवळीवर चित्रातल्यासारखी डेरेदार झाडं उभी होती. त्या डेरेदार झाडांकडे पाहून प्लोरा म्हणाली, "टागोरांच्या शांतीवनात आल्यासारखं वाटतयं नै?" मलाही पाठीमागची ती निरव शांतता बघून एखादं छानसं पुस्तक घ्याव नी त्या डेरेदार वृक्षाखाली बसून निवांत वाचत बसावंस वाटत होतं.

अंतर्गृहातून कपबशांचा किणकिणाट ऐकू येत होता नी टेबलावर मांडलेले पदार्थ आमची वाट पहात होते. ते तरी खास तिथले असावे अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात परिषदेच्या मांडवातूनच आणल्यासारखे चिरोटे, बेसनाच्या वड्या, अळू वड्या, पुरणपोळ्या दहीवडे नी असलाच खास महाराष्ट्रीयन कारभार दिसत होता.

ते पाहून लक्षात आलं की, एका विशिष्ट संस्कृतीतल्या माणसांचे खाण्यापिण्याचे पदार्थही सारखेच असतील यात नवल नव्हतं. गव्हर्नर रिंगाडू भारतातून गेले होते, ते पदार्थ बनवणारी मंडळीही भारतीयच होती नी खाणारीसुद्धा.

हॉलमध्ये सपत्नीक रिंगाडू, मॉरिशसचे पंतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ, शीलाबाय बापू अशी मंडळी नी त्यांचा चाहता वर्ग, मित्र आणि आम्ही परिषदवाली मंडळी असं सुरेख कडबोळं इकडे-तिकडे फिरत होतं, परस्परांशी बोलत होतं, कुणी-कुणी फोटो काढत होतं. मात्र आमच्या सोबत आमचे मुख्यमंत्री शरद पवार नव्हते. ते भारतातील निवडणुकांच्या ओढीनं आदल्या रात्रीच्या विमानानेच भारतात परतले होते.

चहा-फराळ झाल्यावर आम्ही मागच्या हिरवळीवर पांगलो. तिथे प्रमोद पवार, सुधीर गाडगीळ, महेश कोठारे, विनय आपटे वगैरे मंडळी टी. व्ही.च्या कचाट्यातून सुटून मुक्त हिंडत होती. नंदू पारीख आपल्या नववधूसह नव्या नवलाईचे दिवस अनुभवत होता. तर सचिन - सुप्रिया आपल्या लाडक्या चिमुकल्या लेकीच्या मागून इकडे-तिकडे पळत होती. सचिनकडे पाहून मघाचं नरेश मंत्रींचं बोलणं आठवत होतं नी ओठावर सारखं हसू फुटत होतं.

चहापानानंतर शाहीर साबळेंचा लहानसा करमणुकीचा कार्यक्रम व्हायचा होता. त्यानंतर तिथल्या प्लाझा थिएटरमध्ये कल्चरल शो होणार होता नी मग म्युनिसिपल हॉलमध्ये पार्टी असा अगदी भरगच्च कार्यक्रम होता.

थोड्या वेळानं बंगल्याच्या मागच्या व्हरांड्यातून पेटीचे स्वर उमटू लागले. ढोलकी-तबल्याचे बोल खणाणले नी नर्तिकांच्या पायातले चाळ झंकारले खाली हिरवळीवरच थबकून आम्ही नर्तिकांकडे पाहू लागलो नी अचानक मध्येच थांबलेल्या रिमझिमत्या पावसाचं

आगमन झालं. आमच्या डाव्या बाजूकडे पूर्वेला एक काळाकुट्ट ढग अगदी संकेताची वाट पहात असल्यासारखा थबकला होता नी त्याच्या खांद्यावरून इंद्रधनुष्याचा अंधुकसा गोफ हळूच डोकावत होता. ते हळवं दृश्य एका डोळ्यात नी नर्तिकांच्या पदन्यासातली वीज दुसऱ्या डोळ्यात साठवत आम्ही त्या रिमझिमत्या पावसात कितीतरी वेळ उभे होतो.

हळूहळू झाडांमधून पाझरणारे सूर्यकिरण विरले नी संधीप्रकाश सर्वत्र भरू लागला. याच वेळी तो अवरोधून उभा असलेला ढगही आवेगानं कोसळू लागला आणि मग मात्र आमची एकच पळापळ झाली. कपडे आणि केस झटकत आम्ही आत आलो. हॉलमधले दिवे प्रकाशले. परत एकदा चहा, कॉफी, काही पेय, फोटो वगैरे झालं.

भिरभिरत्या नजरेनं मी सर्वत्र पहात होते. तो हॉल, कमानी, आतील कोरीव कामाचं फर्निचर , तसबिरी, बाहेरचे प्रशस्त व्हारांडे, उंच खांब, माणसांच्या गजबजाट, दिव्यांचा लखलखाट ते सार पहाता - पहाता मला लहानपणापासून रत्नागिरीत पाहिलेल्या थिबाराजाच्या भग्न राजवाड्याची आठवण होत होती नी उगाचच उदास वाटत होतं. एकेकाळी तो राजवाडा असाच गजबजला होता, झगमगला होता. ब्रह्मदेशातील सोन्याचा धूर त्या राजवाड्याच्या कानाकोपऱ्यातून उसळला होता. तोच राजवाडा आज अडगळीत टाकलेल्या वस्तू सारखा शहराच्या एका टोकाला धुळीचे लोट अंगावर घेत एकाकी उभा आहे.

रिंगाडूच्या आदरातिथ्याचा पाहुणचार घेऊन आम्ही सर्व मंडळी रोझहिल शहरातील प्लाझा थिएटरमध्ये आलो. चार-पाचशे माणसं व्यवस्थित बसतील असे हे अत्याधुनिक सभागृह आहे. आम्ही जाताच तिथे कार्यक्रम सुरू झाला.

मॉरिशसमध्ये गेलेल्या चिनी, आफ्रिकी, भारतीय, इंग्रजी अशा विविध देशातील मंडळींनी आपापल्या संस्कृतीचा एक-एक कार्यक्रम सादर केला. विशेषतः भारतातील विविध राज्यातून मॉरिशसला गेलेल्या मंडळींनी सादर केलेल्या भांगडा, कोळी नृत्याने स्टेज दणाणून सोडलं. पण लक्षात राहिल्या त्या सॅटिनचे निळे झगे घालून हातातले गुलाबी पंखे नी पांढऱ्याशुभ्र मोज्यातली चिमुकली पावलं थरकावीत स्टेजवर फुलपाखरासारख्या भिरभिरलेल्या चिनी मुली. दृष्ट लागण्यासारखी वेशभूषा आणि एका लयीत वाकणारे त्यांचे कमनीय देह आम्हाला थेट परिलोकातच घेऊन गेले.

आणखी एका नृत्यासाठी आम्ही उत्सुक होतो ते नृत्य म्हणजे आफ्रिकेतील ''सेगा नृत्य'' त्या नृत्याबद्दल फार ऐकलं होतं. कमरेच्या वरचा भाग हलवत बेभान नर्तिका कसं नृत्य सादर करत असेल, ते पहायला आम्ही अगदी आतुर झालो होतो. पण का कोण जाणे, त्या कार्यक्रमातून ते नृत्य मात्र वगळ्यात आले आणि आमचा विरस झाला. खरं तर इथून पुढे त्या दिवसापुरती तरी विरस होण्याची एक मालिकाच सुरू झाली.

प्लाझा थिएटरमधून आम्ही निघालो ते थेट म्युनिसिपल कार्पोरेशनच्या हॉलकडे. तिथे मेयरसाहेबांतर्फे आम्हाला जेवण देण्यात येणार होतं. कार्पोरेशनच्या भल्या मोठ्या लांबरुंद हॉलमध्ये अगदी प्रवेशद्वारापासून आतल्या भिंतीपर्यंत टेबलांच्या एकाला एक जोडून अशा चारपाच रांगा मांडलेल्या होत्या. त्यावर पांढरेशुभ्र लांबलचक टेबलक्लॉथ अंथरलेले होते. टेबलांच्या मध्यभागी ओळीनं ठेवलेल्या पाचसहा इंच व्यासाच्या नी सव्वा - दीडफूट उंचीच्या कोल्ड्रिकच्या बाटल्या नजरेत भरत होत्या. इतक्या दांडग्या बाटल्या मी प्रथमच पहात होते. त्या बाटल्यांच्या जोडीला मिनरल वॉटरच्या बाटल्या, काटे-चमचे, तिखटा-मिठाच्या बारीक डब्या, चटण्या-कोशिंबिरींच्या वाट्या वाडगे वगैरे जय्यत तयारी होती. मात्र जेवणाच्या प्लेटस् मात्र दिसत नव्हत्या.

टेबलांच्या मधून सरकता सरकता आशा म्हणाली 'जेवण नॉनव्हेज दिसतंय.'

'कशावरून?'

'दाराजवळच्या टेबलावर बघ प्लॅस्टिकची दातकोरणी ठेवलेत.' इतकी बारीक गोष्टही आशाच्या नजरेतून सुटली नाही.

आम्ही सर्वांनी छानपैकी बसून घेताच आतल्या बाजूला स्वयंसेवकांची वाढण्याची एकच लगबग सुरू झाली. संध्याकाळच्या गार्डन पार्टीतलं चिल्लर खाण्यापेक्षा रात्री पार्टीतच भरपेट खाऊ म्हणून उठून आलेले आमच्यासारखे बरेचजण टेबलावर येणाऱ्या डिशची वाट पाहू लागले. काहीजण त्या थोरल्या बाटल्यांमधलं कोल्ड्रिक घेऊ लागले. मला मात्र ते घेववत नव्हतं, कारण हवेत खूपच गारवा होता.

थोड्या वेळानं मटणपुलावाच्या शिगोशिग भरलेल्या गरमागरम प्लेटस् टेबलावर आल्या. काटेचमचे घेऊन आमचे हात त्या प्लेटसवर चालून जाणार तेवढ्यात प्रवेशद्वाराकडील टेबलाच्या टोकावरून मेयरसाहेब आम्हाला उद्देशून काहीतरी बोलत आहेत असं लक्षात आलं. क्रिओल भाषेची फोडणी दिलेल्या इंग्रजीतून त्याचे काही बोबडे शब्द आमच्यापर्यंत येत होते. नी त्यांचं भाषण जास्त लांबू नये अशी इच्छा करत आम्ही ऐकत होतो. त्यांच्या कसल्यातरी विनोदावर मोठा हंशा पिकला नी 'ते वदनी कवळ घेता' टाईप भाषण एकदाचं संपलं.

सर्वांबरोबर तोंड फाकून आम्हीही हसून घेतलं नी पुलावाचा पहिला चमचा तोंडात घातला मात्र... ई ऽ ऽ ऽ ऊं ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ छे छे ... असे अस्फुट उद्गार सर्वांच्या तोंडून निघाले. तोंडं वाकडी झाली. तोंडातला घास गिळवेना की टाकवेना, कारण पुलाव एकदम कच्चा होता. भरलं तोंड घेऊन जो तो एकमेकांकडे पाहू लागला. काहीजण भुवया उंचावून नुसताच विचार करू लागले, तर काहींना राग आला.

'काय हे? असा कसा कच्चा राहिला? हे हे असलं खायला इतक्या लांब आलो काय आम्ही?' असे प्रश्न चौफेर उठू लागले. माना मुरडत नाकं उडवत पाहुणे मंडळी बोलत होती नी स्वयंसेवक मंडळी पडल्या चेहऱ्यांनं, अपराधी भावनेनं अवघडून बाजूला उभी होती. मेयर साहेबांचा चेहरा तर पृथ्वी दुभंगून पोटात घेण्याची वाट पहात असल्यासारखा विदीर्ण झाला होता.

'या डीश घेऊन जा नी पुलाव दुसरा आणा.' कुणीतरी सुचवलं नी नेमका याच वेळी लाईटने पोबारा केला. तो झगमगता भव्य हॉल काळोखात बुडून गेला. ओ ऽ ऽ ऽ ई ऽ ऽ ऽ ऊई ऽ ऽ ऽ असे उद्गार परत एकदा सर्वत्र उमटले. काळोखात स्वयंसेवकांची एकच धावपळ उडाली, टकराटकरी झाल्या. कच्च्या पुलावाचं दु:ख विसरून आता आम्ही दिव्यांची काळजी करू लागलो. टॉर्च पेटवा... मेणबत्त्या बघा ... काळोखातून सूचना येऊ लागल्या.' असे कसे दिवे गेले?' 'इथेही डोंबीवली आहेच का?' त्यातही कुणीतरी विनोद करण्याचा प्रयत्न केला.

स्वयंसेवकांनी इकडे तिकडे धावाधाव करून मेणबत्त्या पेटवल्या नी तळ्यात दिवे सोडावे तशा मेणबत्या हळूवारपणे आणून आमच्या टेबलांवर ठेवल्या. मेणबत्त्याच्या प्रकाशात आमची टेबलं उजळून निघाली.

थोड्या वेळाने पुलावाच्या दुसऱ्या डीश टेबलावर आल्या. तो पुंलावही आधी होता त्याचाच भाऊ. तो चिवडून आम्ही उठलो. दात कोरत बाहेर आलो. त्या पार्टीचा एकूणच तसा बेरंग झाला नी काहीशा खट्ट मनानं आम्ही आपापल्या गाड्या गाठल्या. त्या रात्री हवेत खूपच गारठा होता नी त्यात पावसालाही चेव झाला होता.

'काय हो, इथे हा सीझन कोणता आहे?' मी ड्रायव्हर किशनला थोडसं वैतागूनच विचारलं. त्यानं काही सांगण्यापूर्वीच पांढरीपांडे म्हणाले 'इथे हा उन्हाळा आहे.'

'उन्हाळा? मग हा असा वेळी अवेळी पाऊस कसा काय पडतो?

'अहो हा विषुववृत्ताजवळचा दक्षिण गोलार्धातला प्रदेश आहे, इथे खरा सीझन एकच - फक्त पावसाळा. अधून मधून ऊन पडतं, थंडी असते तेव्हा उन्हाळा - हिवाळा म्हणायचं इतकंच' विषुववृत्तावरील बारमाही पावसाविषयी फक्त भुगोलाच्या पुस्तकात वाचलं होतं. इथे प्रत्यक्ष अनुभवत होतें. त्या पावसापाण्यावरच्या थोड्याशा गप्पा सोडल्या तर बाकी कशावर बोलण्याचा कुणालाच मूड नव्हता. मुकाटपणे मग आम्ही हॉटेलवर परतलो.

काऊंटरवरच्या किल्या घेऊन मी नी आशा आमच्या खोलीकडे निघालो. तेवढ्यात गोऱ्या रंगाचा एक शिडशिडीत तरुण  झटकन आमच्या मागून आला. त्यानं आशाला इंग्रजीत काहीतरी विचारलं.

'नो नो...' आशा मोठ्यानं बडबडली. तसा फटका बसल्यासारखा तो मागे फिरला.

'काय झालं?' मी विराचरलं.

'चल सांगते' म्हणत आशा पुढे झाली. माझ्या हातातली किल्ली पटकन् खेचून ती घाईघाईनं दरवाजाकडे गेली त्यावेळी तिच्या हाताचा कंप तेवढ्या स्पर्शावरूनही मला जाणवला. दार उघडून आम्ही आत आलो. दाराला  कडी घालून बेडवर धप्पकन् बसत आशा म्हणाली, तो काय विचारत होता माहीत आहे?'

'काय?' तुमच्याकडे माल आहे का? प्राईज काय?

'अय्या म्हंजे?' काही न कळून मी  विचारलं.

'म्हणजे दारू, स्कॉच, व्हिस्की वगैरे आहे का, असं विचारत  होता.' आशा फुललेल्या श्वासातून सांगू लागली. 'इथे हॉटेलात परदेशी माणसं येतात त्यांच्याकडे इंपोर्टेड बाटली मिळत असेल त्यांना; ती पुढे म्हणाली.

'अग पण आपल्याकडे हे असलं मागायला धीर तरी कसा झाला त्याला? आपल्याकडे बाटली मागितली, दुसरीकडे काय  पुढचंही मागत असतील...' मी म्हटलं.

'तर काय...' म्हणत आशानं मान वेळावून डोळे  गरगरवले. त्या रात्री मग नीट झोपच आली नाही. सारखे कसले ना कसले भास होत राहिले.

सकाळी तयारी करून खाली आलो. आमचे सहकारी ब्रेकफास्टसाठी अद्याप झाले नव्हते. परिषदेला जायला तसा वेळही होता. मी नी  आशा हॉटेलमधून बाहेर पडलो.

रस्त्यावर आलो. कोवळं ऊन पडलं होतं नी रस्ता धुतल्यासारखा स्वच्छ होता. कडेला कपड्यांची नी कसल्याकसल्या वस्तूंची दुकानं उभी होती. दुकानाच्या काऊंटरवर ठेंगण्या, पसरट चेहऱ्याच्या पिवळसर गोऱ्या रंगाच्या चीनी स्त्रिया काम करत होत्या. व्यापार उद्योगात चीनी मंडळींचा मोठा सहभाग दिसत होता.

एका दुकानातून कॅमेऱ्यात रोल भरून घेतला. भारतीय किंमती पेक्षा दीडपट किंमत जास्त पडली. रोल भरून आम्ही हॉटेलवर परतलो. तिथे आमचे सहकारी आमची वाटच पहात होते. मी पटकन पुढे होऊन रात्रीचा प्रसंग सर्वांना सांगणार तेवढ्यात आशानं माझा हात दाबला नी कुजबुजली, 'आता नको.'

आमच्या मंडळीत आज आणखी दोन वेगळे चेहरे दिसत होते. त्यांची ओळख करून देत नरेश मंत्री म्हणाले, 'हे मिस्टर बेंद्रे - जागतिक कीर्तीचे थोर चित्रकार! आणि या त्यांच्या पत्नी मोना बेंद्रे. याही चित्रकारच आहेत.' खरे तर बेंद्रे दांपत्य बांद्र्याला माझ्या घरापासून अवघ्या चार मिनिटांच्या अंतरावर रहातं. तरीही त्यांचा परिचय मात्र चार हजार किलोमिटर अंतर तोडून आल्यानंतर परदेशात होत होता. आपापल्या कामाची झापडं डोळ्यावर बांधून घेतली की, माणसाला आजूबाजूची प्रकाशमान स्थळंही दिसत नाहीत ती अशी.

मिस्टर बेंद्रे साधारण ऐंशीच्या घरातले काळेसावळे वार्धक्यानं थकलेले. त्या मानानं मोना बेंद्रे सणसणीत. त्या कन्नड मुलखातल्या, पण मराठी बोलत होत्या. थोड्याशा तक्रारीच्या सुरात त्या म्हणाल्या, "आमची व्यवस्था मुळीच चांगली नवती हो... आम्हाला दुसऱ्याच लांब समुद्रकाठी हॉटेलात नेलं की हो. त्यामुळे हे आजारी पडले बघा. खूप ताप, लहान पोरासारखं साभाळावं लागतं बघा."

"च् च् हे फार वाईट झालं" फ्लोरा म्हणाली, "पण हा एवढासा देश त्या मानानं त्यांनी पाहुण्यांसाठी फारच त्रास घेतलाय. त्यात थोडंसं इकडे तिकडे होणारच."

"हो हो, पण आमची काही तक्रार नाही त्याबद्दल" नरेश मंत्री समजूतदारपणानं म्हणाले. तेव्हा लक्षात आलं की ते सुरवातीपासून आमच्यात नव्हते ते दुसऱ्या दिवशी बेंद्रे कुटुंबियांसह एल्. मोनॅकोत आले होते. मॉरिशसमध्ये आम्हाला चांगला पाहुणचार मिळाला होता पण काहींचे हाल झाले होते त्यापैकी ती तिघं होती.

ब्रेकफास्ट आटोपून बेंद्रे दांपत्याला सोबत घेऊन आम्ही हॉलवर निघालो. छान चकचकीत उन पडलं होतं. आकाश स्वच्छ मोकळं दिसत होतं. गळ्यात कॅमेरा अडकवून फोटो घेण्याच्या तयारीनं मी बसले होते. भरपूर निसर्गदृश्य टिपायची होती. सुरवात त्या ताडाच्या झाडांनी करायची होती.

अर्धी वाट सरली, ताडाची झाडं दिसू लागली. मी कॅमेरा हातात घेतला, झाडं जवळ येताच ठैरो, नही तो गोलीसे उडा दूंगी अशा अतिरेकी थाडात ड्रायव्हरला गाडी थांबवायला लावली नी दार उघडून खाली उडी टाकली. माझ्या मागून गोखले दांपत्यही उतरलं. मी झाडांचे, नी त्यांनी एक वेडी बाई म्हणून माझे त्या झाडांसह पाच-सहा फोटो काढले नी मग आम्ही थेट निघालो ते हॉलकडे. तो परिषदेचा शेवटचा दिवस होता. खरं तर त्या दिवशी परिषदेला जाण्याचा मूडच नव्हता. साईट सीईंगचेच वेध सर्वांना लागले होते. त्यात परिसंवादाचा विषय होता 'व्यापार'. कालच उद्योगावर बोलून झालं. होतं, आज व्यापारावर काय बोलणार होते कुणास ठाऊक! थोडसं आळसावूनच हॉलमध्ये येऊन बसलो.

त्या परिसंवादाला व्यापारी मंडळींखेरीज बाकीच्यांनी तशी जांभयांनीच दाद दिली. मात्र त्यानंतर झालेल्या साहित्यिक आणि कलावंतांच्या खुसखुशीत मुलाखतींनं परिषदेच्या अखेरच्या कार्यक्रमात चांगलाच रंग भरला. आळसावलेलं सुस्त वातावरण एकदम तरतरीत झालं.

सुधीर गाडगीळ त्यांच्या नेहमीच्या ढंगात गंमतीदार फिरक्या घेत प्र. श्री. नेरूरकर, विजया मेहता, नरेश मंत्री, वर्षा उसगांवकर नितीश भारद्वाज, माणिक वर्मा इत्यादींच्या मुलाखती घेऊ लागले. आपले मामा वालावलकर यांच्या सर्कसमधून आपण प्रथम आफ्रिकेत नी तिथून मॉरीशसला कसे पोहोचलो तो ऐतिहासिक प्रवास प्र. श्री. नेरूरकर अगदी सविस्तर सांगू लागले. त्यांचा प्रवास मध्येच थांबवून सुधीर विजया मेहतांकडे वळले. विजयाबाईंनी काही कलावंतांच्या खासियती सांगितल्या उदा. नाना पाटेकर वांड आहे. विक्रम गोखले स्वतःला शेतकरी समजतो. वगैरे. नाना नी विक्रम दोघेही टी. व्ही. सिरीयल नी सिनेमामुळे मॉरिशियन मंडळींच्या परिचयाचे झाले आहेत. त्यामुळे त्या दोघांविषयी ऐकताना त्यांनाही गंमत वाटत होती. वर्षा नी नितीशच्या मुलाखतीही त्यांनी आवडीनं ऐकल्या. इतरांच्या मुलाखती मात्र त्यांच्या डोक्यावरून गेल्या.

सुधीरनी मुलाखतीत खरी विकेट घेतली ती माणिक वर्मा नी नरेश मंत्री यांची. त्यानं माणिक वर्मांना विचारलं, "तुमचं पूर्वीचं आडनाव दादरकर... बरोबर? मग हे वर्मा कस काय जमल?" यावर त्या घुटमळल्या, लाजल्या, तशी पुढच्या रांगेत बसलेले पु. ल. ओरडले, "अहो वर्मावर बोट ठेवू नका..." त्यावर जोरदार हंशा पिकला.

मग सुधीर वळले नरेश मंत्रीकडे. मंत्री साठीच्या घरातले, शिडशिडीत बांधा, डोक्याला टक्कल, चेहराही तुळतुळीत. फक्त दोन्ही कानापासून हनुवटीखाली एक इंच लांबीची पांढऱ्या• शुभ्र केसांची फणीसारखी दाढी. खास चीनी किंवा जॅपनीज ढंगाची. त्या दाढीमुळे

ते वेगळे दिसतात. बाकी माणूस चारचौघांसारखाच. मंत्री जपानमध्ये सर्वोदयी मंडळ चालवतात, मराठी शिकवतात, यापेक्षा त्यांच्याविषयी जास्त आम्हाला माहित नव्हतं.

इतर काही प्रश्न विचारता विचारता सुधीरनी मंत्रींना विचारलं 'तुम्ही लग्न केलं नाही, मग तुम्हाला कुणीतरी जोडीदार असावा असं नाही का वाटलं?'

मंत्री म्हणाले, 'नाही. कारण तशी तिथे माझी एक् मैत्रीण आहे.'

'मग काय तेवढ्यावरच निभावत?' सुधीरच्या या प्रश्नावर सगळे खो खो हसत सुटले. नरेश मंत्री सुद्धा.

त्या खुसखुशीत मुलाखतीनंतर सगळे जेवायला उठले जेवणानंतर होणाऱ्या समारंभात परिषदेचं सूप वाजणार होतं. संध्याकाळी साडेपाच वाजता प्रमोद पवार, चंदू पारखी, विनय आपटे वगैरे आमचे टी.व्ही. आर्टीस्ट 'आग्र्याहुन सुटका' या नाटकाचा प्रयोग 'वाकवा' येथील 'ट्राफल्गार' हॉलमध्ये करणार होते. तो पाहून रात्री शीलाबायबापू आणि राज बापू या उभयतांनी आमच्यासाठी आयोजित केलेल्या 'फ्लिक ॲन्ड फ्लॅक' येथील मोठ्या हॉटेलातील भव्य पार्टीसाठी जायचं होतं.


हॉलमधून बाहेर आलो. महात्मा गांधी मेमोरियलची आठवण म्हणून त्या पार्श्वभूमीवर काही ग्रूपफोटो काढले नी जेवणाच्या मांडवात आलो. काहींची जेवणं झाली होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी एका टेबलाशी बसले होते. त्यांच्या शेजारच्या खुर्च्यांवर आम्ही बसून घेतलं.

लक्ष्मणशास्त्रींची तब्बेत ठीक दिसत नव्हती. थोडेसे थकले होते, बेंद्रेप्रमाणे तिथलं वातावरण, प्रवासाची दगदग त्यांनाही मानवली नव्हती. समोर आलेलं जेवणाचं ताट नाकारून त्यांनी फक्त दही आणायला सांगितलं. बराच वेळ झाला तरी दही आणायला गेलेली स्वयंसेविका आली नाही. माझ्याजवळचा दह्याचा पॅक त्यांच्यासमोर पटकन ठेवून मी आस्थेवाईकपणानं त्यांची चवकशी केली.

खरंतर त्यांना मला आणखी काही विचारावंसं वाटत होतं. 'रिडल्स इन हिंदुइझमवर' पेटलेला वाद, त्यात त्यांनी घेतलेली विरोधी भूमिका...' रामकृष्णांच्या सदोष चरित्रांकडे त्या त्यांच्या लीला म्हणून पहाण्याचा लक्ष्मणशास्त्रीजींचा दृष्टीकोण ... संपत्ती आणि शस्त्रास्त्रे असलेला प्रचंड समाज, शस्त्रास्त्र नसलेला, थोडीशी संपत्ती असलेल्या ब्राह्मण वर्गाच्या आधिपत्याखाली हजारो वर्षे कसं काय राहू शकतो?' हा तर्कतीर्थांचा प्रश्न आणि त्याची उपपत्ती लागत नसल्याचा त्यांचा निर्वाळा हे हे सारं कितपत तर्कशुद्ध आणि तत्त्वनिष्ठ होतं?

'भारतीय ब्राह्मण पुरोहित वर्गानं स्वतःला एकंदर समाजावर लादलेलं नाही. समाजानं त्याला लादून घेतलं.' या तर्कतीर्थांच्या मताला विश्वहिंदू परिषदेनं जगभर चालवलेल्या ब्राह्मणवादाच्या प्रसाराच्या पार्श्वभूमीवर कितपत अर्थ आहे? या आणि अशा अनेक प्रश्नांनी ओथंबलेल्या नजरेनं मी तर्कतीर्थांकडे पहात होते आणि का कोण जाणे, माझ्या नजरेसमोर येरवड्याच्या तुरुंगात उपोषणाला बसलेले महात्मा गांधीजी आणि त्यांचे प्राण वाचवण्यासाठी अस्पृश्यांच्या राखीव मतदारसंघावर पाणी सोडावं लागलेले हतबुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिसत होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे





जेवणानंतर रेंगाळतच आम्ही सांगता समारंभासाठी हॉलवर आलो तर उदघाटनाच्या वेळेसारखाच हॉल खचाखच भरला होता. आम्हाला निरोप द्यायला मॉरिशियन मंडळी जमली होती. वार्ताहर आले होते. टी. व्ही. कॅमेरेवाले हिंडू फिरू लागले होते. थोड्यावेळाने गव्हर्नर जनरल रिंगाडू, पंतप्रधान अनिरुद्ध जगन्नाथ, शिलाबाय बापू, पु. ल. देशपांडे, माधव गडकरी वगैरे मंडळी व्यासपीठावर स्थानापन्न झाली. तीन दिवस झालेल्या. कार्यक्रमांची समरी घेत घेत समारोपादाखल भाषणं झाली. उभय देशांतील सांस्कृतिक - आर्थिक संबंध दृढ होण्याच्या दृष्टीनं काही ठराव मांडण्यात आले.

परिषदेचे अध्यक्ष पु.ल. देशपांडे यांनी मराठी भाषा वृद्धिंगत झाली पाहिजे, त्यासाठी महाराष्ट्राबाहेरील सर्व मंडळींनी मराठी तिच्या अनेक पदरांसह समजून घेतली पाहिजे असा आशावाद व्यक्त केला आणि ते पुढे म्हणाले, 'आमच्या कन्नड मित्रांना मराठी भाषा चमत्कारिक वाटते. ते म्हणतात एक लाकडाचा तुकडा जमिनीत ठोकला तर तो खुंट होतो जात्यात ठोकला की खुंटा होतो नी भिंतीवर ठोकला की खुंटी होते हे कसं काय?' आमच्या मराठीच्या अंतरंगातल्या या नाना कळा अनेक वेळा कळीचा नारदही होऊ शकतात हेही मॉरिशियनांनी लक्षात घ्यावं, असंही मला वाटत होतं. पुढे असा भाषेवरून एक दोनदा घोटाळा झालाच.

शेवटी परिषदेचे मुख्य सचिव माधव गडकरी समारोपाच्या भाषणासाठी उभे राहिले. ते त्यावेळी विशेष खुष दिसत होते. परिषद यथासांग पार पडल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर होतं. 'दर दोन वर्षांनी ज्या ठिकाणाहून परिषदेला आमंत्रण येईल त्या ठिकाणी परिषद होईल. असा परिषदेचा कार्यक्रम सांगून त्यांनी सर्वांचे आभार मानले आणि

मॉरिशसच्या राष्ट्रसंगीताचे स्वर बँडवर उमटल्यानंतर सर्वांनी उत्स्फूर्तपणे टाळयांच्या कडकडाटात परिषदेचं सूप वाजवलं.

एकमेकांचे निरोप घेत माणसं उठून उभी राहिली. 'बराय, भेटू आपण...', सी यू...', '.या एकदा...', अशी उडत्या आत्मीयतेची देवाण-घेवाण करत माणसं हिरवळीवर इकडे तिकडे पांगली. आतले टी. व्ही. कॅमेरेही बाहेर आले. परिषदेच्या कार्यक्रमांवरील काहींच्या प्रतिक्रिया अजमावत इकडे तिकडे फिरू लागले. आशा, फ्लोरा, नरेश मंत्री, नेरूरकर वगैरेंच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. त्यांच्याबरोबर माझीही प्रतिक्रिया मी नोंदवली. मधु मंगेश कर्णिकांशी मी आदल्या दिवशी बोलले होते तोच विषय तसाच तावातावानं मांडून मी म्हटलं, झालेल्या परिसंवादामध्ये इथल्याच मंडळींचा जास्त सहभाग हवा होता. खरं तर त्यांनाच ऐकायला आम्ही आलो होतो. वगैरे. तिथल्या स्वयंसेवकांनी आमच्यासाठी घेतलेल्या त्रासाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानून त्यांचे कौतुकही केलं.

नेहरूकरांच्यामुळे होमराजेन गौरिया, रेमाजी वगैरे तिथली बरीच मंडळी माझ्याही चांगली परिचयाची झाली होती. देवयानी, फुलमती, नंदिनी या शिक्षिका तर माझ्या अगदी मैत्रीणीच झाल्या होत्या. मध्यम उंचीच्या हसऱ्या चेहऱ्याच्या देवयानीकडे बोट दाखवून सर म्हणाले, 'उर्मिला, हिच्यासाठी भारतातला नवरा बघ बघू.'यावर देवयानी म्हणाली, 'हो पण त्याला इकडे येऊन रहावं लागेल.'

'का ग असं का म्हणतेस?' मी विचारलं तर म्हणाली, 'त्याला इथे चटकन नोकरी मिळेल. मला मात्र तिकडे लवकर नोकरी मिळणार नाही.'

देवयानीचं म्हणणं खरं होतं. मॉरिशसमध्ये तशी बेकारी नाहीच. जे काही बेकार लोक आहेत त्यांना बेकारभत्ता मिळतो आहे. तिने नंतर अशी बरीच माहिती दिली. मॉरिशसमध्ये मॅरेज ब्युरो वगैरे नाहीत त्यामुळे लग्न जमवण्यासाठी नातेवाईकांवरच अवलंबून रहावं लागतं. पुनर्विवाहासाठी तर फारच अडचण येते वगैरे.

परिषदेतील शेवटच्या चहा आणि फराळाचा समाचार घेऊन आम्ही 'वाकवा' शहरातील 'ट्राफल्गार' थिअटरकडे 'आग्राहून सुटका' पहायला निघालो. खरं तर प्रमोद पवार, चंदू पारखी वगैरे आमच्याच नट मंडळींनी बसवलेले ते नाटक होतं. त्यामुळे ते पहायला तसे आम्ही उत्सुक नव्हतो. मात्र सर्वांबरोबर रहायचं असल्यानं त्या नाटकातून सुटका नव्हती.

'ट्राफल्गार' हॉल दीड दोनशे माणसांचा होता. तोही मॉरिशियन मंडळींनी हाऊसफुल्ल केला होता. आपल्या परम दैवताच्या शिवाजीच्या दर्शनासाठी सर्वजण उत्सुक झाले होते. आम्ही तेथे जाताच काही माणसं बिचारी उठून आम्हाला जागा देऊ लागली. आम्ही त्यांना थोपवलं. बसू दिलं. नि बाजूला उभे राहिलो. देवयानी, फुलमती वगैरे शिक्षिका

नाटक चांगलं समजून घ्यावं म्हणून आमच्या जवळ आल्या. नाटकाचा पडदा वर गेला. नाटकाला विशेष नेपथ्य नव्हतंच. एक सिंहासन नि सीन बदलणारे एक-दोन पडदे. पात्रांचा मेकप नि अंगावरचे कपडे यामुळे ते ऐतिहासिक नाटक वाटत होतं इतकंच. नाटकातली भाषा मात्र जुन्या पठडीतली होती.

१६ एप्रिल १९३० ला रंगभूमीवर आलेलं विष्णुपंत औंधकराचं ते चार अंकी नाटक होतं. त्यातील हिंदू आणि मुस्लिम राजांमधील संघर्षामुळे जशी हिंदूची मन पेटून उठली होती तशी मुस्लिमांचीही. पण वेगळ्या अर्थाने... औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा हिला बुरख्याशिवाय दरबारात आणलं म्हणून किंवा औरंगजेबापेक्षा शिवाजीला जास्त टाळ्या पडल्या म्हणून ... अशा कारणासाठीही कडवे मुसलमान चिडले होते. इतकंच नव्हे तर मुंबईत रिपन थिएटरात प्रयोग चालू असताना पाच-सहा लाल टोपीवाले मुसलमान नंग्या तलवारी घेऊन थिएटरमध्ये घुसले होते नि त्यामुळेही नाटक खूप गाजलं होतं. अशा त्या गाजलेल्या नाटकाचा प्रयोग मॉरिशसमध्ये होत होता.

शिवाजी महाराजाचं वाक्य प्रमोद पवार त्वेषानं बोलत होते- 'बापजाद्यांच्या बडेपणावर मदार ठेवून नंदीबैलाप्रमाणं नटणाऱ्या नामधारी राजाहून मनगटाच्या बळावर उदयास आलेल्या या शिवाजीची योग्यता शतपटीनं श्रेष्ठ आहे!' छप्पर उडून जाईल अशा टाळ्या पडणारं ते वाक्य होतं... पण थिएटर सामसूमच होतं.

देवयानी मला हळूच विचारत होती, 'कोण बैल?'

'नंदीबैल.'

'म्हणजे?' 'थांब ऐक', असं म्हणून मी तिला नाटकाकडे वळवलं. औरंगजेबाच्या दरबारात आवेशपूर्ण बोलता बोलता शिवाजी झालेल्या प्रमोद पवारांच चढावातलं पाऊल लाकडी व्यासपीठावरून घसरलं. पवारांनी चटकन तोल सावरला. प्रत्येक पात्रानं आपापल्या अभिनयकौशल्यानं नाटकही सावरल्याचा खूप प्रयत्न केला. पण फक्त बाळबोध मराठी जाणणाऱ्या मॉरिशियन मंडळींच्या ते अगदी डोक्यावरून गेलं.

त्या दिवशी नाटकाचे दोनच अंक झाले. ते पाहून आम्ही फ्लिक अँन्ड फ्लॅक येथील 'ला पिरोज' हॉटेलकडे निघालो. आज पाऊस अजिबात नव्हता. आकाश एकदम निरभ्र होतं नि स्वच्छ चांदणं पडलं होतं. आजूबाजूची दूरवर पसरलेली उसाची शेतं त्या चांदरसात शांतपणे डुंबत होती. त्या शांततेत जरासुद्धा व्यत्यय न आणता आमच्या गाड्या 'हळूच या ग, हळूच या' असं एकमेकींना खुणावत, दिव्यांचे डोळे मिचकावत पुढे सरकत होत्या.

असा तासभर प्रवास केल्यानंतर आम्ही नियोजित पार्टीसाठीच्या हॉटेलजवळ पोहोचलो. हॉटेल कसलं, ते एक सुरूच्या झाडाचं भलं मोठं बनच होतं. त्या बनाच्या तोंडाशी सिमेंट काँक्रीटचं लोखंडी गजांचं एक मोठ्ठं गेट होतं इतकंच. बाकी परिसरात झाडंच झाडं होती. झाडांवर सोडलेल्या दिव्यांच्या माळा आतपर्यंतचा मार्ग दाखवत होत्या. आत एका झाडाशी शिलाबाय बापू सपतिक नटून थटून उभ्या होत्या. आत येणाऱ्या प्रत्येकाचं अगदी हात जोडून वाकून स्वागत करत होत्या.

झाडाच्या गर्दीतून बरंच आत गेल्यावर समुद्राच्या काठाशी एकखांबी गोलाकार अशी सिमेंटची इमारत दिसली. तिच्या अवती भवती मऊ मऊ वाळूत ठिकठिकाणी टेबल-खुर्च्या मांडलेल्या होत्या. मधूनमधून गवताच्या ठेंगण्या उघड्या झोपड्या होत्या. त्याखालीही टेबल-खुर्च्या होत्या.

ज्या गोलाकार छत्रीखाली मद्यपानाची सोय होती त्या दिशेनं बाटल्या नि चषकांची किणकिण ऐकू येत होती. दुसऱ्या बाजूला मोठ्या आडव्या टेबलांवर जेवणाचे पदार्थ होते. नाना तऱ्हेचे केक्स, पराठे, सलाड वगैरेचे ढीग होते. भात पुलाव नि वाफाळत्या भाज्या होत्या. तिसरीकडे चिकन ताबडतोब भाजून देण्यासाठी पाच-सहा कुक शेगड्यांसमोर उभे होते. बाजूला लोखंडी स्टँडवर तयार तंदूरी चिकन टांगलेल्या होत्या. शिवाय कसल्या कसल्या प्राण्यांच्या मटनाचे गंज खदखदत होते ते वेगळेच तर आणखी एकीकडे निरनिराळ्या रंगीबेरंगी आइस्क्रीमचे स्टॉल होते.

इथेही जेवण वाढायला वेटर नव्हते. पदार्थ आपले आपण घ्यायचे होते. ते घेत आजूबाजूच्या खुर्च्यांवर बसून आमच्या आधीच बरीचशी माणसं खातपीत होती.

'ही मंडळी कोण, कुठली? शिलाबाईनी आणखी कुणाकुणाला बोलावलंय की काय?' मी फ्लोराला विचारलं.

फ्लोरा म्हणाली, 'शिलाबाईनीच कशाला बोलवायला हवं? अग, हे हॉटेल आहे. इथे इतर माणसंही कुणाकुणाला पार्ट्या देत असतीलच की...' फ्लोरा आणखी कोणकोण येतात ते सांगत होती नि मी विचार करत होते की मग कुणी किती खाल्लं, काय खाल्लं, बील किती झालं ते कसं काय समजत असेल? हॉटेलवाल्याची माणसं सिव्हील ड्रेसमध्ये प्रत्येकावर वॉच ठेवत हिंडत असतील की काय?

त्या खात्यापित्या टेबलांना वळसा घालून आम्ही पुढे गेलो. तिथे असलेल्या थंड पेयाच्या नि मद्याच्या काऊंटरवरून हवं असलेलं पेय घेऊन काही मंडळी वाळूत बसली होती, तर काही ओल्या वाळूत फिरत होती. गप्पा गोष्टी चालल्या होत्या. एका बाजूच्या कोंडाळ्यात कविवर्य बा. भ. बोरकरांची 'तुजी गो पायंजणा' ही कविता रुणझुणत होती.

समुद्रात गेलेल्या लहानशा लाकडी धक्क्यावर कवी ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, सुधीर गाडगीळ आणि काही मंडळी बसली होती. मऊ रेशमी वाळूवरून अनवाणी फिरत फिरत आम्हीही आमचा मोर्चा त्या धक्क्याकडे वळवला आणि बघता बघता तिथे एक लहानसं कवि संमेलनच भरलं. ना. धों. महानोर, फुटाणे वगैरे मंडळींना कविता म्हणण्याचा जोरदार आग्रह झाला.

दूरवर पसरलेला अथांग शांत समुद्र, वर निरभ्र आकाश वरून बरसणाऱ्या शीतल चंदेरी चांदणधारा नि अंगाभोवती रुंजी घालणारा मंद मधुर गार वारा... असं ते वातावरण माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या कंठातही गाण्याची लकेर पेरत होतं, तिथे त्या दोघा मातब्बर कवींची काय कथा?... बघता बघता त्या चमचमत्या समुद्राच्या लाटांवर महानोरांच्या बोरी-बाभळींचं बनच्या बन उगवू लागलं... कुठेतरी केळ प्रसूत झाली... ती गुप्तवार्ता बोरी-बाभळींनी फेर धरून आमच्या कानाशी आणली... रामदास फुटाणेनींही दोन तीन वात्रटिका ऐकवल्या नि हास्याचे फवारे उडाले...

कितीतरी वेळ आम्ही त्या काव्य गायनात डुंबत होतो. शेवटी काठावरच्या मित्रमंडळींनी आमच्या नावाने हाकाट्या सुरू करताच ते संमेलन संपवून आम्ही धक्क्यावरून खाली आलो. मध्येच रामदास फुटाणेंनी माझ्याकडे बोट दाखवत आशाला विचारलं, 'यांचा परिचय...?'

आशा म्हणाली, 'ही उर्मिला पवार, दलित लेखिका आहे.' 'दलित ? दिसत नाहीत दलित...' फुटणेंचा चेहरा थोडा वाकडा झाला. माझा असाच परिचय नेरूरकर सरांनी [illegible], शीलाबाय ब्रापू इत्यादी लिहणाऱ्या मंडळींना करून दिला होता तेव्हा त्यांचा चेहरा वाकडा झालेला दिसला नाही.

मी विचारलं. का? दलितांनी दलितच दिसायला हवं का?' आशानं माझा हात दाबला. म्हणाली, 'जाऊ दे ग. वाद नको.' मी गप्प बसले. मात्र मऊ रेशमी वाळूत चालता चालता चटकन् बाभळीचा काटा पायात बोचावा तसं झालं.

आशा, फ्लोरा, मी जेवणासाठी रिकामी टेबलं पाहू लागलो. मघाशी आलो तेव्हाचेच काही लोक अजूनही निवांत गप्पा-गोष्टी करत जेवत होते. हवं नको ते घेत होते, खात होते, पीत होते. प्लेटसच्या प्लेटस् फस्त होत होत्या. चिकन तंदूरी कडाकड वाजत होत्या. आइस्क्रीम्स रिचवली जात होती. खाण्यापिण्याला ददात नव्हती.

ते सर्व पाहून कुठेतरी वाचलेल्या ग्रीक राजांच्या शाही पार्ट्यांची आठवण होत होती. त्या शाही पार्ट्यांमध्ये अनेक प्रकारच्या दुर्मिळ चविष्ट पदार्थांची रेलचेल असे. पार्टीला आलेल्या मंडळींची भूकच नव्हे, तर अन्नावरची वासनाही तृप्त झाली पाहिजे यासाठी

एका बाजूला एक हौद असे. हौदाच्या बाजूला तासलेली मोरपिसं असत. जेवून तृप्त झालेल्यांची परत एखाद्या पदार्थावर वासना गेली आणि पोटात जागा नसली तर ती करण्यासाठी ते मोरपिसं घशात फिरवून पोटातलं अन्न हौदात ओकून टाकत नि मग रिकाम्या पोटात वासना गेलेल्या पदार्थाला जागा दिली जाई.


असा हौद नि पिसं तिथं नसली तरी असा राजेशाही थाटाच्या पार्ट्या मॉरिशसमध्ये सर्रास चालतात. खाऊन पिऊन तृप्त झालेल्या मनानं स्नेहसंबंध दृढ करीत आंतरराष्ट्रीय संबंधाची देवाण घेवाण होते.

त्या पार्टीतलं जेवण सुरू असतानाच कुणीतरी बातमी दिली की आता इथे 'सेगा' नृत्य सादर केलं जाणार आहे. त्याचबरोबर आम्ही सगळे डाव्या हाताकडील गवताच्या झोपडीसमोरच्या लहानशा व्यासपीठाकडे माना उंचावून पाहू लागलो. तिथे हळूहळू बाजाची पेटी, तबला, गिटार वगैरे वाद्ये येऊ लागली, माईकही आला. भराभर जेवणं आटोपून आम्ही व्यासपीठाकडे तोंड करून बसलो. उजव्या बाजूला बसलेली नितीश भारद्वाज, वर्षा उसगांवकर वगैरे कलावंत मंडळींही उत्सुकतेनं पाहु लागली.

आइस्क्रीम खाताखाता मिटक्या मारत एक गृहस्थ म्हणाले, 'आता रंगीबेरंगी घागरे घालून डफाच्या तालावर कंबर हलवीत आफ्रिकन नर्तिका व्यासपीठावर येतील बघा.' ते ऐकून आमची उत्सुकता खूपच ताणली. प्रत्यक्षात मात्र तो फुसका बार निघाला. व्यासपीठावर आमचे हर्ररवाले बाळ देशपांडे उभे राहिले नि त्यांनी तबल्याच्या तालावर आगगाडीचं गाणं, गाणं कसलं बड बड गीत म्हणायला सुरवात केली - गाडी आली, गाडी आली झुक झुक झुक टाईपच्या त्या गीतामधील प्रत्येक कडव्याला देशपांडे जोरात कूकारे ठोकत होते. तोंडावर उभा पंजा धरून झुक झुक करत होते. त्या गाण्यावर तिथली माणसं जाम खूष होती. हसत होती. टाळ्या वाजवत होती. ते पाहून आशानं विचारलं, 'यांना एवढी का गंमत वाटतेय?'

'इथे आगगाडी नाही म्हणून त्यांना अप्रूप वाटतंय' पांढरीपांडे म्हणाले. 'इथे पूर्वी रेल्वे होती, पण नंतर देशातला उंच सखलपणा गरज वगैरे पाहून ती बंद झाली.' 'अहो हा साधारण दहाबारा लाख लोकवस्तीचा देश. त्यातही जवळजवळ प्रत्येकाकडे गाड्या आहेत. मग आगगाडी हवीच कशाला?' आणखी कुणीतरी पुस्ती जोडली.

सेगा नृत्यानं हुलकावणी दिल्यानं आमचा मात्र मूडच गेला. शेवटी कंटाळून आम्ही उठलो नि वरून बरसणारं दुधाळ चांदण अंगावर घेत, प्रखर तेजानं लखलखणाऱ्या चांदण्या निरखत मिळेल तेवढं दृष्टीसुख अनुभवत, सुरूच्या बनातून चालत आम्ही आमच्या गाड्या गाठल्या.



सकाळी नेहमीप्रमाणे आंघोळ वगैरे उरकून ब्रेकफास्ट घेऊन साईड सीईंगला जायचं होतं मॉरिशला जगाचं नंदनवन म्हटलं जातं. इतका इथला निसर्ग सुंदर आहे तो पहायचा होता. परिषदेचा हॉल सोडून उघड्या मोकळ्या जागेत हिंडायचं होतं. डोंगर - दऱ्या - खोरी पहायची होती. समुद्रकिनारा, उसाची शेतं, लहान मोठ्या टेकड्यावरून फिरायचं होतं. त्यामुळे अंगावर साडी वगैरे असण्यापेक्षा सुटसुटीत पंजाबी ड्रेसच बरा, म्हणून माझ्या मुलींनी आवर्जून बॅगेत ठेवलेला पंजाबी ड्रेस मी बाहेर काढला. आशाला म्हटलं, 'मी हा ड्रेस घोलणार आहे. तूही घाल ना आणला असशील तर...'

'एऽऽशीऽऽनको ग बाई... 'आशानं पटकन् तोंड वाकडं केलं नि मग सावरून घेत म्हणाली, 'बरं बरं... इथे ठीक आहे.'

... का, सुरवातीला असं का तोंड केलंस?'

'तरी पण... मी माझा हेका सोडला नाही.'

'अग, तिकडे इंग्लंड-अमेरिकेकडे पंजाबातून वगैरे गेलेल्या सफाई कामगार स्त्रिया असा ड्रेस घालतात नं... म्हणून.'

'म्हणून काय?' माझी चीड मला लपवता आली नाही.

'म्हणून तिकडे गेलेल्या महाराष्ट्रीयन स्त्रिया एक तर पॅन्टस्, स्कर्टस्, फ्रॉक्स घालतात

किंवा मग आपली साडीच नेसतात.... बर, तू आणलायस नं, मग घाल. मी ही घालते.' असं म्हणून आशानं बॅग उघडली. पण पंजाबातून गेलेल्या सफाई कामगार स्त्रिया पंजाबी ड्रेस घालतात, म्हणून तो कितीही सुटसुटीत शोभून दिसणारा आणि खास भारतीय असला तरी आपण तो घालू नये, ते बिलो डिग्निटी आहे, या विचारानं मला कुठेतरी विस्कटून टाकलं. आणि मग याच वेळी, 'आपल्याहून वरिष्ठाचं अनुकरण करणं ही मानवी प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्तीही जातिसंस्थेच्या उगमाचं एक कारण आहे. रक्तशुद्धीच्या विचारातून प्रथम ब्राह्मणवर्गानं आपली जात बंदिस्त केली आणि इतरांनी त्याचं अनुकरण केलं.' या डॉ. आंबेडकरांच्या जातिविषयक सिद्धान्ताची आठवण झाली.

फिरायला जायच्या तयारीनं आम्ही दोघी खाली आलो तेव्हा सुधा गोखले एकट्याच चहा घेत बसल्या होत्या. त्या व बेंद्रे दांपत्याखेरीज आमचे इतर सहकारी सकाळीच उठून आपापल्या कसल्या कसल्या कामासाठी निघून गेले होते. बेंद्रेना ताप होता त्यामुळे ती दोघं फिरायला येणार नव्हती. सुधा गोखले विश्रांती घेणार होत्या. ब्रेकफास्ट आटोपून आपल्या रुमकडे जाता जाता त्या हसत म्हणाल्या, 'संध्याकाळी लवकर या ग. नाहीतर रात्री पार्टीला जायला उशीर होईल'

'म्हणजे, आजही पार्टी आहेच का?' नी विचारल.

'होय तर... दोन तारखेला आपण सर्व निमंत्रित परत जाईपर्यंत इथल्या बड्या मंडळीतर्फे आपल्याला डिनर देण्यात येणार आहे. आणि आजच्या पार्टीत तर सेगा नृत्य दाखवणार आहेत. म्हणून म्हणते लवकर या', असं म्हणून त्या आपल्या रूमकडे गेल्या. आम्ही चंद्रसेन नि किसनची वाट पहात वेटिंग रुममध्ये येऊन बसलो. बराच वेळ झाला तरी ते दोघे आलेच नाहीत. मी म्हटलं - उत्सव संपला तसं कवित्वही संपलेलं दिसतंय.

'हो असंच वाटतंय.' आशा असं म्हणतेय तेवढ्यात ते दोघे गाडी घेऊन आलेच. त्यांच्याबरोबर एक जाडे धिप्पाड गृहस्थ होते. चंद्रसेन खाली उतरताच ते गाडीतूनच खेकसले, 'हे पहा लवकर या. उगाच मला त्रास देऊ नका.'

ही काय भानगड आहे म्हणून मी नि आशा पाहू लागलो, तशी चंद्रसेन पुढे येत म्हणाला, 'सॉरी हं, आम्हाला यायला उशीर झाला. पण याच गाडीतून आणखी काही मंडळींना फिरायला न्या असा आम्हाला मेसेज मिळाला म्हणून तिकडे जावं लागलं.' असं म्हणून चंद्रसेननं त्या जाड्या गृहस्थांकडे नजर उडवली.

आमच्याकडे पहात कपाळाला आठ्या घालून ते गृहस्थ पुटपुटले, 'एकतर या मंडळींना मराठी नीट येत नाही. नि निघालेत जागतिक मराठी परिषद घ्यायला...' आम्ही काही बोललो नाही. मुकाट्यानं गाडीत बसलो. तसं ते पुन्हा तणतणले, 'आता आणखी कुठे

समुद्रात गेलेल्या लहानशा लाकडी धक्क्यावर कवी ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, सुधीर गाडगीळ आणि काही मंडळी बसली होती. मऊ रेशमी वाळूवरून अनवाणी फिरत फिरत आम्हीही आमचा मोर्चा त्या धक्क्याकडे वळवला आणि बघता बघता तिथे एक लहानसं कवि संमेलनच भरलं. ना. धों. महानोर, फुटाणे वगैरे मंडळींना कविता म्हणण्याचा जोरदार आग्रह झाला.

दूरवर पसरलेला अथांग शांत समुद्र, वर निरभ्र आकाश वरून बरसणाऱ्या शीतल–चंदेरी चांदणधारा नि अंगाभोवती रुंजी घालणारा मंद मधुर गार वारा... असं ते वातावरण माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या कंठातही गाण्याची लकेर पेरत होतं, तिथे त्या दोघा मातब्बर कवींची काय कथा?... बघता बघता त्या चमचमत्या समुद्राच्या लाटांवर महानोरांच्या बोरी-बाभळींचं बनच्या बन उगवू लागलं... कुठेतरी केळ प्रसूत झाली... ती गुप्तवार्ता बोरी-बाभळींनी फेर धरून आमच्या कानाशी आणली... रामदास फुटाणेनींही दोन तीन वात्रटिका ऐकवल्या नि हास्याचे फवारे उडाले...

कितीतरी वेळ आम्ही त्या काव्य गायनात डुंबत होतो. शेवटी काठावरच्या मित्रमंडळींनी आमच्या नावाने हाकाट्या सुरू करताच ते संमेलन संपवून आम्ही धक्क्यावरून खाली आलो. मध्येच रामदास फुटाणेंनी माझ्याकडे बोट दाखवत आशाला विचारलं, 'यांचा परिचय...?'

आशा म्हणाली, 'ही उर्मिला पवार, दलित लेखिका आहे.' 'दलित ? दिसत नाहीत दलित...' फुटणेंचा चेहरा थोडा वाकडा झाला. माझा असाच परिचय नेरूरकर सरांनी आनंद मल्लू, पुष्पाजी नारू, शीलाबाय बापू इत्यादी तिथल्या मंडळींना करून दिला होता तेव्हा त्यांचा चेहरा वाकडा झालेला दिसला नाही.

मी विचारलं. का? दलितांनी दलितच दिसायला हवं का?' आशानं माझा हात दाबला. म्हणाली, 'जाऊ दे ग. वाद नको.' मी गप्प बसले. मात्र मऊ रेशमी वाळूत चालता चालता चटकन् बाभळीचा काटा पायात बोचावा तसं झालं.

आशा, फ्लोरा, मी जेवणासाठी रिकामी टेबलं पाहू लागलो. मघाशी आलो तेव्हाचेच काही लोक अजूनही निवांत गप्पा-गोष्टी करत जेवत होते. हवं नको ते घेत होते, खात होते, पीत होते. प्लेटसच्या प्लेटस् फस्त होत होत्या. चिकन तंदूरी कडाकड वाजत होत्या. आइस्क्रीम्स रिचवली जात होती. खाण्यापिण्याला ददात नव्हती.

ते सर्व पाहून कुठेतरी वाचलेल्या ग्रीक राजांच्या शाही पार्ट्यांची आठवण होत होती. त्या शाही पार्ट्यांमध्ये अनेक प्रकारच्या दुर्मिळ चविष्ट पदार्थांची रेलचेल असे. पार्टीला आलेल्या मंडळींची भूकच नव्हे, तर अन्नावरची वासनाही तृप्त झाली पाहिजे यासाठी

एका बाजूला एक हौद असे. हौदाच्या बाजूला तासलेली मोरपिसं असत. जेवून तृप्त झालेल्यांची परत एखाद्या पदार्थावर वासना गेली आणि पोटात जागा नसली तर ती करण्यासाठी ते मोरपिसं घशात फिरवून पोटातलं अन्न हौदात ओकून टाकत नि मग रिकाम्या पोटात वासना गेलेल्या पदार्थाला जागा दिली जाई.

असा हौद नि पिसं तिथं नसली तरी असा राजेशाही थाटाच्या पार्ट्या मॉरिशसमध्ये सर्रास चालतात. खाऊन पिऊन तृप्त झालेल्या मनानं स्नेहसंबंध दृढ करीत आंतरराष्ट्रीय संबंधाची देवाण घेवाण होते.

त्या पार्टीतलं जेवण सुरू असतानाच कुणीतरी बातमी दिली की आता इथे 'सेगा' नृत्य सादर केलं जाणार आहे. त्याचबरोबर आम्ही सगळे डाव्या हाताकडील गवताच्या झोपडीसमोरच्या लहानशा व्यासपीठाकडे माना उंचावून पाहू लागलो. तिथे हळूहळू बाजाची पेटी, तबला, गिटार वगैरे वाद्ये येऊ लागली, माईकही आला. भराभर जेवणं आटोपून आम्ही व्यासपीठाकडे तोंड करून बसलो. उजव्या बाजूला बसलेली नितीश भारद्वाज, वर्षा उसगांवकर वगैरे कलावंत मंडळींही उत्सुकतेनं पाहु लागली.

आइस्क्रीम खाताखाता मिटक्या मारत एक गृहस्थ म्हणाले, 'आता रंगीबेरंगी घागरे घालून डफाच्या तालावर कंबर हलवीत आफ्रिकन नर्तिका व्यासपीठावर येतील बघा.' ते ऐकून आमची उत्सुकता खूपच ताणली. प्रत्यक्षात मात्र तो फुसका बार निघाला. व्यासपीठावर आमचे हर्रर्रवाले बाळ देशपांडे उभे राहिले नि त्यांनी तबल्याच्या तालावर आगगाडीचं गाणं, गाणं कसलं बड बड गीत म्हणायला सुरवात केली - गाडी आली, गाडी आली झुक झुक झुक टाईपच्या त्या गीतामधील प्रत्येक कडव्याला देशपांडे जोरात कूकारे ठोकत होते. तोंडावर उभा पंजा धरून झुक झुक करत होते. त्या गाण्यावर तिथली माणसं जाम खूष होती. हसत होती. टाळ्या वाजवत होती. ते पाहून आशानं विचारलं, 'यांना एवढी का गंमत वाटतेय?'

'इथे आगगाडी नाही म्हणून त्यांना अप्रूप वाटतंय' पांढरीपांडे म्हणाले. 'इथे पूर्वी रेल्वे होती, पण नंतर देशातला उंच सखलपणा गरज वगैरे पाहून ती बंद झाली.' 'अहो हा साधारण दहाबारा लाख लोकवस्तीचा देश. त्यातही जवळजवळ प्रत्येकाकडे गाड्या आहेत. मग आगगाडी हवीच कशाला?' आणखी कुणीतरी पुस्ती जोडली.

सेगा नृत्यानं हुलकावणी दिल्यानं आमचा मात्र मूडच गेला. शेवटी कंटाळून आम्ही उठलो नि वरून बरसणारं दुधाळ चांदण अंगावर घेत, प्रखर तेजानं लखलखणाऱ्या चांदण्या निरखत मिळेल तेवढं दृष्टीसुख अनुभवत, सुरूच्या बनातून चालत आम्ही आमच्या गाड्या गाठल्या.



सकाळी नेहमीप्रमाणे आंघोळ वगैरे उरकून ब्रेकफास्ट घेऊन साईड सीईंगला जायचं होतं मॉरिशला जगाचं नंदनवन म्हटलं जातं. इतका इथला निसर्ग सुंदर आहे तो पहायचा होता. परिषदेचा हॉल सोडून उघड्या मोकळ्या जागेत हिंडायचं होतं. डोंगर - दऱ्या - खोरी पहायची होती. समुद्रकिनारा, उसाची शेतं, लहान मोठ्या टेकड्यावरून फिरायचं होतं. त्यामुळे अंगावर साडी वगैरे असण्यापेक्षा सुटसुटीत पंजाबी ड्रेसच बरा, म्हणून माझ्या मुलींनी आवर्जून बॅगेत ठेवलेला पंजाबी ड्रेस मी बाहेर काढला. आशाला म्हटलं, 'मी हा ड्रेस घोलणार आहे. तूही घाल ना आणला असशील तर...'

'एऽऽशीऽऽनको ग बाई... 'आशानं पटकन् तोंड वाकडं केलं नि मग सावरून घेत म्हणाली, 'बरं बरं... इथे ठीक आहे.'

मी म्हटलं, 'का, सुरवातीला असं का तोंड केलंस?'

'नाही ग... काही नाही.'

'तरी पण... मी माझा हेका सोडला नाही.'

'अग, तिकडे इंग्लंड-अमेरिकेकडे पंजाबातून वगैरे गेलेल्या सफाई कामगार स्त्रिया असा ड्रेस घालतात नं... म्हणून.'

'म्हणून काय?' माझी चीड मला लपवता आली नाही.

'म्हणून तिकडे गेलेल्या महाराष्ट्रीयन स्त्रिया एक तर पॅन्टस्, स्कर्टस्, फ्रॉक्स घालतात

किंवा मग आपली साडीच नेसतात.... बर, तू आणलायस नं, मग घाल. मी ही घालते.' असं म्हणून आशानं बॅग उघडली. पण पंजाबातून गेलेल्या सफाई कामगार स्त्रिया पंजाबी ड्रेस घालतात, म्हणून तो कितीही सुटसुटीत शोभून दिसणारा आणि खास भारतीय असला तरी आपण तो घालू नये, ते बिलो डिग्निटी आहे, या विचारानं मला कुठेतरी विस्कटून टाकलं. आणि मग याच वेळी, 'आपल्याहून वरिष्ठाचं अनुकरण करणं ही मानवी प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्तीही जातिसंस्थेच्या उगमाचं एक कारण आहे. रक्तशुद्धीच्या विचारातून प्रथम ब्राह्मणवर्गानं आपली जात बंदिस्त केली आणि इतरांनी त्याचं अनुकरण केलं.' या डॉ. आंबेडकरांच्या जातिविषयक सिद्धान्ताची आठवण झाली.

फिरायला जायच्या तयारीनं आम्ही दोघी खाली आलो तेव्हा सुधा गोखले एकट्याच चहा घेत बसल्या होत्या. त्या व बेंद्रे दांपत्याखेरीज आमचे इतर सहकारी सकाळीच उठून आपापल्या कसल्या कसल्या कामासाठी निघून गेले होते. बेंद्रेना ताप होता त्यामुळे ती दोघं फिरायला येणार नव्हती. सुधा गोखले विश्रांती घेणार होत्या. ब्रेकफास्ट आटोपून आपल्या रुमकडे जाता जाता त्या हसत म्हणाल्या, 'संध्याकाळी लवकर या ग. नाहीतर रात्री पार्टीला जायला उशीर होईल'

'म्हणजे, आजही पार्टी आहेच का?' नी विचारल.

'होय तर... दोन तारखेला आपण सर्व निमंत्रित परत जाईपर्यंत इथल्या बड्या मंडळीतर्फे आपल्याला डिनर देण्यात येणार आहे. आणि आजच्या पार्टीत तर सेगा नृत्य दाखवणार आहेत. म्हणून म्हणते लवकर या', असं म्हणून त्या आपल्या रूमकडे गेल्या. आम्ही चंद्रसेन नि किसनची वाट पहात वेटिंग रुममध्ये येऊन बसलो. बराच वेळ झाला तरी ते दोघे आलेच नाहीत. मी म्हटलं - उत्सव संपला तसं कवित्वही संपलेलं दिसतंय.

'हो असंच वाटतंय.' आशा असं म्हणतेय तेवढ्यात ते दोघे गाडी घेऊन आलेच. त्यांच्याबरोबर एक जाडे धिप्पाड गृहस्थ होते. चंद्रसेन खाली उतरताच ते गाडीतूनच खेकसले, 'हे पहा लवकर या. उगाच मला त्रास देऊ नका.'

ही काय भानगड आहे म्हणून मी नि आशा पाहू लागलो, तशी चंद्रसेन पुढे येत म्हणाला, 'सॉरी हं, आम्हाला यायला उशीर झाला. पण याच गाडीतून आणखी काही मंडळींना फिरायला न्या असा आम्हाला मेसेज मिळाला म्हणून तिकडे जावं लागलं.' असं म्हणून चंद्रसेननं त्या जाड्या गृहस्थांकडे नजर उडवली.

आमच्याकडे पहात कपाळाला आठ्या घालून ते गृहस्थ पुटपुटले, 'एकतर या मंडळींना मराठी नीट येत नाही. नि निघालेत जागतिक मराठी परिषद घ्यायला...' आम्ही काही बोललो नाही. मुकाट्यानं गाडीत बसलो. तसं ते पुन्हा तणतणले, 'आता आणखी कुठे

जायचंय?'

'हॉटेल मनीषामध्ये. राजाराम शिंदे नि त्यांच्या मिसेसना सोबत घ्यायचं आहे.' चंद्रसेन इंग्रजीतून म्हणाला. त्याबरोबर ते गृहस्थ जाम उखडले. म्हणाले, 'हे बघा, माझी इथे, तिथे अशी पालखी हिंडवू नका... अहो, माझ्या पोटाची दोन दोन आपरेशन्स झाली आहेत. आय अम टू टाईम्स आपरेटेड मॅन...' ते ठासून, आपल्या आपरेशनची जोखीम सांगू लागले नि त्या टू टाईम्स आपरेटेड मॅनवर आम्ही दोघी हसू लागलो. तसं ते परत म्हणाले, 'रिअली, रिअली आय अस टू टाईम्स' नि तोंडावर हात ठेवून हसता हसता आमची पुरेवाट झाली.

राजाराम शिंदे खूप दूरच्या 'इकोप्लास' नावाच्या समुद्रकिनाऱ्यावर राहिले होते. शक्य तितक्या वेगाने आम्ही तिकडे निघालो वाटेतली झाडं-झुडपं-शेतं गोलाकार फिरतायत असं वाटत होतं आजूबाजूच्या हिरव्यागार धरित्रीवर अधुनमधून लाल भडक अन्थेरियमच्या फुलांचे नि पिवळ्या धम्मक 'फ्लेअर मद्रास' आणि 'गेंदा' फुलाचे खास लागवड केलेले चौकोनी मळे रंगीबेरंगी ध्वज फडकल्यासारखे नजरेसमोरून सरकत होते.

संपूर्ण प्रकाशात सोबतीला होते ते काळ्या पेराच्या दणकट उसाचे मळे. मेंढ्याच्या कळपांसारखे अगदी नि:शंक आणि निर्धोक मनाने ते सतत आमच्या सोबत होते. त्या ऐन भरता आलेल्या उसाच्या फडात एकही गुऱ्हाळ आम्हाला दिसलं नाही. इतकंच काय, पण चालता चालता सहज उसाचं कांडं उपसून कुणी दाताखाली घातलेलही आम्ही पाहिलं नाही. मात्र पाणी फवारणारी, उंच काठीवर फिरणारी चक्रं मात्र ठिकठिकाणी गरगरत होती नि त्या चक्राभोवती सुरेख इंद्रधनुष्यं उमटत होती.

माझी नजर मात्र एखाद्या निवांतपणे चरणाऱ्या म्हशीच्या पाठीवर तितक्याच निवांतपणे बसलेला गाय-बगळा किंवा जमिनीशी समांतर सूर मारत शांत वातावरण भंगवीत क्षणात नाहीशी होणारी टिटवी दिसेल म्हणून इकडे तिकडे भिरभिरत होती. पण असलं दृश्य दिसत नव्हतं. सारखं मनात येत होत की या हिरव्यागार मातलेल्या गवतावर गाई-गुरांचे कळप पोसले जातील, तर मॉरिशिअनांना परदेशी दुधाची भुकटी नि दह्यातुपाचे बंद डबे बाहेरून मागवावे लागणार नाहीत. पोलंड आस्ट्रेलियाहून चीज, पनीर आणावं लागणार नाही. पण मग हे असं का होत नाही? अशा प्रकारचे बरेच प्रश्न आम्हाला मॉरिशसबद्दल वारंवार पडत होते नि पुढे काहींची यथावकाश उत्तरेही सापडली होती.

बराच वेळ प्रवास करून आम्ही समुद्रकिनारी आलो तरी उसाच्या रांगा पार वाळूपर्यंत आमच्या सोबत आलेल्या दिसत होत्या. समुद्रतीराशी समांतर अशा रस्त्यावरून प्रवास करून आम्ही हॉटेल मनीषाच्या दारासमोर आलो. तिथला समुद्रकिनारा आणि नारळाच्या

नि सुरूच्या झाडांच्या गर्दीत लपलेली हॉटेल्स पाहून अगदी गोव्यातल्या एखाद्या बीचवर आल्यासारखं वाटलं.

गाडी थांबताच शिंदे दांपत्य लगबगीनं पुढे आलं. गाडीची वाट पाहून ती दोघंही वैतागली होती. 'काय हे, किती उशीर...?' असं कपाळाला आठ्या चढवत शिंदे म्हणाले नि ती दोघं गाडीत बसताच गाडी निघाली.

'आता आम्ही प्रथम काय पहाणार आहोत?' आशानं विचारल...

'गांब्रासे येथील गंगा तलाव.'

'म्हणजे इथेही गंगा आहे?' मी विचारलं.

'हो! अर्थात भारतातल्या गंगेचं पाणी आणून इथल्या तळ्यात ओतलय. त्या तळ्याला गंगासागर किंवा परितलाव असंही म्हणतात.'

'आणि, आणि काय आहे तिथं?' ते जाडे गृहस्थ आता उत्सुकतेनं विचारू लागले.

'तिथे तळ्याच्या काठावर एक शंकराचं देऊळ आहे. महा-शिवरात्रीला तिथे मोठी जत्रा भरते. खूप लोक तिथले पाणी आपपल्या गावी कावडीनं नेतात. गावातल्या शंकराच्या मूर्तीला स्नान घालतात.'

चंद्रसेन सांगत होता नि बोल बोल म्हणता आकाश काळ्याकुट्ट ढगांनी घेरून आलं होतं. मुसळधार पाऊस कोसळेल असं वाटत होतं.

मूळ रस्ता सोडून घाटातल्या आडमार्गानं बरीचशी चढण चढून आमची गाडी वर आली आणि एका तलावाच्या काठाशी थांबली. तिथे एक दगडी घाट बांधलेला होता नि घाटावर देऊळ होतं. पाठीमागे टेकडीवजा डोंगर होता.

तळ्याकडे बोट दाखवत मी विचारलं, 'हा गंगातलाव?'

'अहं, तो डोंगर आहे ना त्याच्या डोक्यावर तलाव आहे. जा, दर्शन घेऊन या.' चंद्रसेन भक्तिभावानं म्हणाला.

आम्ही गाडीतून उतरून चालू लागलो. पाठोपाठ परिषदवाल्या इतर मंडळींच्या गाड्याही येऊन थडकल्या. माणसं बाहेर पडून चालू लागली. तेवढ्यात ओथंबून आलेला पाऊस आमच्यावर चाल करून आला. शिंदे दापत्य गाडीतच थांबलं. आम्ही दोघी देवळाच्या आश्रयाला धावलो. काही मंडळी त्या पावसातूनही डोंगर चढू लागली. आमच्या बरोबरचे ते 'टू टाईम्स आपरेटेड मॅन' त्या मंडळीत केव्हा जाऊन मिसळले ते कळलंही नाही.

आता देवळात आरती सुरू झाली होती. प्रार्थनेचे सुर कानावर येत होते म्हणून मी जरा आत सरकून गाभाऱ्यात पाहिलं. चुन्याची सफेदी दिलेल्या साधारण पंधरा बाय वीसच्या खोलीत स्वयंपाकाच्या ओट्यावर भांडी रचून ठेवावी तशा चक्रधारी विष्णुपासून जटाधारी शंकरापर्यंत देवाच्या बऱ्याचशा मूर्ती हारीनं मांडून ठेवल्या होत्या. गदाधारी हनुमानाशेजारी वाघावर बसलेली, रुंडमाला घातलेली कालीमाताही तलवार उपसून भक्तांना अभय देत होती.

मूर्त्यांसमोर आडव्या बांबूला पाचसहा पितळी घंटा टांगलेल्या होत्या नि काळयासावळ्या रंगाचे दोन पुजारी धोतर नेसून डाव्या हातात घड्याळ वगैरे बांधलेले नी आपल्याकडील वेशभूषा केलेले स्त्रीपुरूष भक्तगण टाळया वाजवत डुलत होते. सुखकर्ता दुःखहर्ता टाईप आरतीचा आवाज टिपेला पोहोचला होता नि बाहेर पाऊसही जोरदार कोसळत होता. गणपतीच्या दिवसात कोकणातल्या एखाद्या खेड्यात आल्यासारखं वाटत होतं.

थोड्यावेळाने पाऊस थांबला. गंगातलाव पाहून माणसं परतली आणि मग आम्ही काळया घाटीच्या दिशेने निघालो.

एकोणीसाव्या शतकात भारतातून मॉरिशसला गेलेले मजूर तिथल्या वसाहतवाद्यांच्या अनन्वित छळाला भिऊन त्या काळयानदीच्या काठावरील घनदाट जंगलात नि दऱ्याखोऱ्यांत लपून-छपून रहात असत. आपल्याकडील खंडाळा - लोणावळयाच्या परिसरात जशी झाडाझुडपांची दाटी झालेली आपल्याला दिसते तसाच हा प्रदेश अनेक तऱ्हांच्या झाडांनी आणि वनस्पतींनी वेढलेला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आमच्या नित्य परिचयाचे ऐन, किंजळ, खैर, साग इत्यादी वृक्ष नुकत्याच पडून गेलेल्या पावसाचं पाणी निथळत, अंग झटकत उभे होते. त्याखाली रूई, कुडा, घाणेरी आणि असलीच कसली कसली तेजेलदार झडपं पसरली होती.

त्या झुडुपांमध्ये पुढे पुढे अधिकच गर्दी केली होती ती फ्रेंच पेरूच्या झाडांनी, पांढऱ्याधोप बारीक चणीच्या फांद्यांवर पान दिसणार नाही इतके हिरव्या पिवळ्या लहान लहान पेरूंचे घोसच्या घोस लागलेले होते. साध्या बोरांपासून अहमदाबादी बोरांएवढ्या आकाराचे पिवळे रसरशीत पेरू दृष्टीस पडताच आमच्या गाड्या तिथेच थांबल्या नि वानरसेनेसारखी आम्ही सर्वजण त्या पेरूंवर तुटून पडलो. टणक बिया असलेले, बाहेरून पिवळया रंगाचे नि आतून पिकल्या तोंडल्यासारखे ते लालभडक आंबट गोड पेरू तोंडाला एक वेगळीच चव आणत होते.

आणि ते तोडतांना शाळेचे दिवस आठवत होते. रुमाल, खिसे, पदर, पिशवी काय सापडेल त्यात पेरू वेचत माणसं इकडे तिकडे हिंडू लागली. मातलेल्या गवतात पाऊल

टाकताना थोडी भितीही वाटत होती. तेवढ्यात कुणीतरी काळजीनं ओथंबलेल्या स्वरात म्हणालंही,

'एऽऽ जपून ऽऽ सांभाळा ऽऽऽ पायाखाली बघा ऽऽऽ' त्यावर तितक्याच बेफिकीरपणानं आणखी कुणीतरी सांगितलं -

'छे: इथे विंचू सापाला मुळीच घाबरायला नको. कारण ते इथे नाहीतच.'

'असं, ते कसं काय?'

'अहो इथे म्हणे कसलीतरी वनस्पती आहे. तिच्या विशिष्ठ वासामुळे साप, विंचू असले विषारी प्राणी जिवंत राहू शकत नाहीत.' हे ऐकून आम्हा सर्वांचाच जीव भांड्यात पडला नि अधिकच जोमाने त्यातल्या त्यात मोठे पेरू तोडू लागलो.

पेरू खात, गाणी म्हणत आम्ही काळ्या नदीच्या घाटीशी पोहोचलो. माथेरान - महाबळेश्वराला खाली दरीत वाकून पहाण्यासाठी सुरक्षा कठडे बांधलेले आहेत ना, तशा एका बांधावरून आम्ही खाली पाहिलं तर झाडाझुडपांनी झाकळलेल्या खोल दरीत नदीचं बारीकसं पात्र गांडुळासारखं वळवळताना दिसत होतं. कठड्याच्या दुसऱ्या बाजूकडे उभी असलेली काही माणसं 'तो पहा.. तो पहा...' असं म्हणत समोरच्या डोंगराकडे बोट दाखवत बारीक नजरेनं काहीतरी पहात होती. त्या दिशेनं आम्हीही पाहू लागलो, तर तिकडे घारीसारखा एक पक्षी तरंगताना दिसला.

मॉरिशसमध्ये आल्या दिवसापासून त्या एकुलत्या एका पक्ष्याचा दर्शनानं जणू काहीतरी अद्भुत पाहिल्यासारखे सर्वांचे चेहरे झाले. काहींच्या मते तो गरूड होता तर काहींच्या मते गिधाड. पण असे मोठे पक्षी मॉरिशसमध्ये नाहीतच. घारही नाही.

'कमाल आहे. हा इतका समृद्ध देश, इथे भरपूर पक्षी कसे दिसत नाहीत?' मी बडबडले.

यावर बाजूला उभ्या असलेल्या सुनीता देशपांडे म्हणाल्या 'अहो, कसे दिसतील? हा ज्वालामुखीपासून तयार झालेला प्रदेश आहे. इथल्या मातीतून एक विशिष्ट गंध सुटतो तो पक्ष्यांना चालत नाही.'

'आणि हिंस्त्र प्राण्यांनाही चालत नाही. म्हणून इथे वाघ, सिंह असे मोठे प्राणीही नाहीत.' कुणीतरी पुष्टी जोडली.

याबाबतीत चंद्रसेन किसनला विचारलं तर ते म्हणाले, 'आम्हाला हे काही माहीत नाही. पण आमच्या देशातही चिमणी, कबूतर, पोपट वगैरे पक्षी आहेत की!' काहीही

असेल, पण याबाबतीत एक गोष्ट लक्षात आली की मॉरिशसला तुफान वादळवाऱ्याला, पावसाला वारंवार तोंड द्यावं लागत असल्याने इथं फार उंच वाढलेले वृक्ष नाहीत आणि त्यांच्यावर घरटी बांधून निवांत रहाणारे पक्षीही फार नाहीत. शिवाय ऊसाच्या शेतात पक्षी खाणार काय? पण निदान इथे कावला असायला हरकत नव्हती कारण काहीही खाऊन कुठेही रहाणारा चिवट आणि जिवट पक्षी म्हणजे कावळा आणि तो इथे नसेल तर मग इथले पिंड कोण खात असेल? मला प्रश्न पडला.

'पण काय ग आशा, दक्षिण आफ्रिकेतून आशियाकडे नि अशाच उलट दिशेला स्थलांतर करणाऱ्या पक्षांच्या संक्रमणमार्गातच मॉरिशस येतं ना? मग तसे पक्षी तरी इथे असतीलच ना?' मी आशाला विचारलं.

आशा माझ्यावर जाम वैतागली. म्हणाली, 'उर्मिला, आता पुरे. काय सारख पक्षी पक्षी करतेस? शिकार बिकार करणार आहेस की काय पक्ष्यांची? की पुस्तक लिहिणारायस? चल, आपली माणसं बघ अलेक्झांड्रा फॉलकडे गेली सुद्धा.'

आम्हीही लगबगीनं निघालो. आमच्या पुढे काही अंतरावरून पु. ल. देशपांडे, वसंत बापट, कानिटकर, लक्ष्मणशास्त्री जोशी वगैरे मंडळी अगदी हळू हळू तोल सांभाळत चालली होती. धबधबा पहायला निघालेल्या त्या मंडळींनी मधल्या निसरड्या उतारावरून धबाधबा पडू नये अशी इच्छा करत, त्यांना वळसा घालून आम्ही पुढे गेलो.

मध्ये आडवा आलेला एक ओढा तुडवून आम्ही एका टेकडीच्या डोक्यावर पाय ठेवला नि तिथून दिसणाऱ्या दऱ्याखोऱ्यात नजर फिरवली. समोरच्या डोंगरावरून पावसाच्या धारा रुपेरी बटेसारख्या खाली येत होत्या. त्यातल्या जराशा जाडसर ओघाकडे बोट दाखवून कुणीतरी म्हणालं, 'तो पहा अलेक्झांड्रा फॉल ! पुढे हे असेच सात फॉल्स आहेत.'

'ईऽऽऽ हा धबधबा होय? मग मघाशी ओलांडली ती नदी की काय?'

'यस अर्थात.' किसन अभिमानाने म्हणाला नि कितीतरी वेळ त्या कोसळणाऱ्या इवलाशा प्रवाहाकडे पहात परिषदेतल गाणं गुणगुणत राहिला -

'सुंदर डोंगरदऱ्या शोभती, इवल्या इवल्या नद्या वाहती, देश आमुचा स्वर्गसमान, स्वर्गसमान, स्वर्गसमान.'

मला मात्र तो घनदाट परिसर पहाताना सुप्रसिद्ध मॉरिशअन लेखक आनंद मल्लू यांची 'वॉच, देम गो डाउन' ही कांदबरी आठवत होती. याच परिसराच्या पार्श्वभूमीवर ती लिहिलेली आहे. गोऱ्या जमीनदारांनी भांडवलदार आणि सरंजामदारांनी केलेल्या अन्याय

अत्याचाराविरुद्ध प्राणपणानं झुंज देणारा आणि अखेर विजयी होणारा सोशॅलिस्ट पार्टीचा नायक हरी पिंगळे त्या दाट अरण्यात अनंत मुखांनी गर्जना करत फिरतो आहे असं वाटत होतं.


या खोऱ्यातल्या 'आरयेंता' आणि आजूबाजूच्या गावात आपली मराराष्ट्रीयन मंडळी फार मोठ्या संख्येने रहातात. परिषदेच्या कार्यक्रमात दशावतार करणारी मंडळी इथलीच. इथल्या प्रत्येक घरात ज्ञानेश्वर - तुकारामांच्या जुन्या पोथ्या सापडतात....' वगैरे माहिती ऐकत ऐकत आम्ही मघाचा तो ओढा - नव्हे नदी... ओलांडून मोटारी गाठल्या. त्या डोंगराळ प्रदेशातून बाहेर पडून हिरवी कुरणं. चहा, तंबाखू आणि उसाचे हिरवेगार मळे मागे टाकत परत समुद्रकिनाऱ्याला येऊन पोहोचलो मॉरिशस भोवती समुद्राचा वेढा पडलेला असल्यामुळे आमचा समुद्राकडून समुद्राकडे असा प्रवास चालला होता.

थोड्या वेळानं दुसऱ्या एका समुद्रकिनाऱ्यावर येऊन पोहोचलो. तिथे किनाऱ्यावर लहान लहान दुकान नि किरकोळ जिन्नस विकणारे स्टॉल्स होते. तिथल्या एका पाव-भजीच्या स्टॉलसमोर आमची गाडी थांबली. स्टॉलवर पाव, भजी, केळी, थंड पेये वगैरे घेऊन आम्ही दुपारचं जेवण उरकलं नि 'आता इथून कुठे जायचं आहे?' असा विचार करत असतानाच दुकानाच्या पाठीमागच्या बाजूनं आमची काही परिषदवाली मंडळी बाहेर आली. म्हणाली,

'इथे अशाच काय उभ्या राहिलात? पाठीमागे देवळात जा. तिथे बघा काय सॉलीड म्हाताऱ्या आहेत !! जा बघा.'

'आँ? म्हाताऱ्या? कोण? कुठल्या?' असं विचारत आम्ही पाठीमागच्या गल्लीत शिरलो.





दुकानाच्या पाठीमागच्या गल्लीत आतल्या बाजूला शंकर-पार्वतीचं एक जुनं दगडी देऊळ होतं. देवळालाच लागून बाहेरच्या बाजूला एक उंच दगडी चबुतरा, तिथे सात आठ म्हाताऱ्या बसल्या होत्या. त्यांच्या नऊवारी साड्या, सुती पोलकी, केसांचा अंबाडा, हाता तोंडावर गोंदणं... आपल्या खेड्यावरच्या स्त्रियांसारख्याच त्या दिसत होत्या. त्यातल्या दोघी तिघी तांदूळ निवडत बसल्या होत्या. काही जणी शेवग्याच्या शेंगा कापत होत्या, तर आणखी एकदोघी विळीवर अळू न सोलताच चराचरा चिरत होत्या.

आम्ही तिथे जाताच आमच्याकडे पाहून अगदी खूप जुनी ओळख असल्यासारख्या त्या हसल्या. तशी आम्हीही हसलो. तशी त्या हातातलं काम ठेवून पदराला हात पुसत आमच्या जवळ आल्या नि आमच्या हाताची, गालाची चुंबनं घेऊ लागल्या. त्यावेळी त्यांच्या अंगाला येणारा चुलखंडातील राखेचा, धुराचा, भाजीचा न कसला कसला जुना चिरपरिचित वास नि हाताचा अळवार स्पर्श आम्हाला पार आमच्या खेड्यात घेऊन गेला. तिथल्या आमच्या काकी, मामी, आज्या भेटल्यासारखं वाटलं.

त्यांचे हात हातात घेऊन आम्ही त्यांची तशाच जवळीकीनं चवकशी करू लागलो आशा म्हणाली, 'तुम्ही हे अळू सोलत नाही?'

'नाय, सोलायचा नाय.' त्या चक्क मराठीतच बोलत होत्या.

'तुम्ही मूळच्या कुठल्या?' मी विचारलं, तशी पाठीमागच्या कौलारू घरांकडे बोट दाखवत त्या म्हणाल्या, 'आमी हितंच न्हाताव.'

पण तुमच्या आजोबा पणजोबांचा मूळ गाव कुठे, भारतात की इथे?' मला काय हवंय हे ओळखून आशानं विचारलं.

एकजण म्हणालो, 'इंडियातला गाव... पन नाव... म्हायती नाय...'

'बरं, हे तुम्ही काय करताय? हे अळू वगैरे कशाला?' माझ्या या प्रश्नावर आमच्या परिषदेपैकीच एकजण म्हणाला, 'अहो, इथे शाहीर साबळे आणि पार्टीचा रात्री कार्यक्रम व्हायचा आहे. त्यांच्या जेवणाची ही तयारी चालली आहे.'

'अग, पण हे न सोलता चिरलेलं अळू कसं काय लागत असेल?' आशाला त्या अळूचंच कुतूहल वाटत होतं. मी म्हटलं, 'अग, चांगलं लागतं. माझी आई, सासू, मामी, काकी असंच न सोलता अळू करायच्या.' खरं तर त्यामुळेच की काय त्या स्त्रियांशी माझं कुठेतरी जवळचं नातं आहे असं वाटलं आणि त्या स्त्रियाना बरेच प्रश्नही विचारावेसे वाटले. त्यांचे इथले रीतिरिवाज, धार्मिक सण, त्यांची भाषा, नाती गोती, त्यांचे उद्योग - व्यवसाय... पण हे सर्व विचारत बसायला आम्हाला वेळ नव्हता. मी मॉरिशसमध्ये आणखी सात-आठ दिवस रहाणार होते. मला हवी असलेली सर्व माहिती नंतर मिळणारच होती. त्यामुळे त्या स्त्रियांबरोबरचं बोलणं आम्ही आटोपतं घेतलं.

समोर पसरलेली पांढरी शुभ्र वाळू, अथांग निळया समुद्राचं काचेसारखं निवळशंख पाणी नि शंख- शिंपल्यांची आपली श्रीमंती दाखवत जणू हात उंचावून आम्हाला जवळ बोलावणाऱ्या लवलवत्या लाटा पाहून आमचे पाय तिकडे वळले नसते तरच नवल. त्यात आमच्या सहकाऱ्यांनी धडाधड उड्या टाकून शंख-शिंपले वेचायलाही सुरुवात केली होती. पाण्यात भिजत, धडपडत, ठेचाळत इकडे तिकडे विखुरलेले शंख-शिंपले नि पांढऱ्याशुभ्र कोरल्सचे नानाविध आकार अगदी अधाशासारखे वेचत मंडळी विखुरली होती. ओल्या वाळूत रुतलेल्या कितीतरी भुऱ्या, ढाण्या, बिबळ्या कवड्या, खुबे, शिंपले नखांनी उकरून रूमाल, खिसे पिशव्या काय हाताशी होतं त्यात घेत सकाळी पेरू वेचताना मी फिरत होती तशीच आताही फिरू लागली.

ओचे पदर सरसावून मी नि आशाही पाण्यात उतरलो. खडकाला चिकटलेली कोरलची पांढरी शुभ्र दांडी, काटेरी चकलीच्या उभ्या काडीसारखी दिसत होती. अशा असंख्य दांड्या एकत्र येऊन पांढरी शुभ्र फुलंच फुलं सर्वत्र पसरली होती. मात्र ती तशीच्या तशी खडकापासून काढून घेता येत नव्हती. तसा प्रयत्न केल्यास त्यांचे तुकडेच हाती लागत होते. या पांढऱ्या शुभ्र कोरल्सची संपूर्ण मॉरिशसभोवती एक तटबंदीच तयार झालेली आहे. त्याच्या काटेरी टोकात सूक्ष्म जीव रहातात. त्यांच्यापासून लाल भडक पोवळी तयार होतात वगैरे माहितीही शंख शिंपले वेचता वेचता मिळत होती.

कोरल्सच्या पुंजक्याबरोबरच गोकर्णाच्या फुलासारखी निळी पांढरी शेड असलेले तर काही पिवळ्या पाठीचे बदामाएवढे शंखही लक्ष वेधून घेत होते. टोमॅटोच्या आकाराची, तशाच खापा असलेली, गोल, पिवळी, किरमिजी, पांढरी कवचंही आम्ही प्रथमच पहात होतो. त्या प्रत्येक खापेवर वरून खाली जाळीदार रेघा होत्या. त्यात कोणते प्राणी रहात होते कुणास ठाऊक. पण संन्याशाचा उघडा पडलेला संसार वाऱ्या-पावसात फडफडत रहावा तशी ती पोरकी कवचं लाटांच्या थपडा खात काठावर इकडे तिकडे थडथडत होती. ती सर्व सागरी संपत्ती किती घेऊ नि किती नको अस झालं होतं. शिवाय तिथल्या विविधरंगी खडकाच्या तुकड्यांतूनही मन निघता निघत नव्हतं. अगदी हावरेपणानं छातीशी कवटाळून आणलेली ती सागरी संपत्ती परस्परांना दाखवताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचं उडून गेलेलं बालपण परत खुलून आलं होतं.

आमच्या हातातले शंख शिंपले बघून मिसेस शिंदेनाही गाडीतून खाली उतरण्याचा मोह अनावर झाला, पण मिस्टर शिंदेनी त्यांना आवरलं नि तेवढ्यात गाड्याही हलल्या.

'असे आणखी किती बीचेस आहेत इथं?' आशानं चंद्रसेनला विचारलं. तो म्हणाला, 'खूप आहेत. म्हणजे हे तसं बेटच आहे, नाही का? पण गांब्रासे नावाच्या समुद्रकिनाऱ्यावर लोक नौकाविहारासाठी जातात, तर रियांबेलवर पोहायला. कारण तिथला समुद्र उथळ आणि शांत आहे. ब्लॅक रिव्हर, बिज्यू दी कॅप, पोत ओ पिनेल या किनाऱ्यांवर मोठी मासेमारी चालते. ट्रिओ बिशचा समुद्रकिनारा खाजगी मालकीचा आहे. तिथे लोकांना रहायला गवताच्या झोपड्यांसारखे बंगले बांधलेले आहेत. उद्या आपण त्या समुद्रावर जाणारच आहोत. पण आता आपण पहाणार आहोत 'शामारेल' म्हणजे सरड्यासारखे रंग बदलणारी रंगीत मातीची टेकडी.' त्या मातीबद्दल खूप ऐकलं होतं. ज्वालामुखीचा स्फोट होऊन निघालेल्या विशिष्ट रसापासून ती रंगीत माती तयार झाली आहे. तिच्या पोटात हिऱ्यांचा साठा असावा असाही वैज्ञानिकांचा कयास आहे. अशा तऱ्हेची माती असणारं मॉरिशस हे जगात एकमेव ठिकाण आहे वगैरे. त्या टेकड्या प्रत्यक्षच पहायला आम्ही उत्सुकतेनं निघालो.

आता समुद्रकाठ सोडून आम्ही पुन्हा मॉरिशसच्या पोटात शिरत होतो आजुबाजूला उसाची शेतं, चहाचे मळे नि अधूनमधून हरणं, डुक्करं अशा पाळीव प्राण्यांची राखीव कुरणं पसरली होती. त्या कुरणांमध्ये आम्हाला एकही हरीण किंवा डुक्कर मात्र दिसला नाही. चंद्रसेन सांगत होता की या पाळीव प्राण्यांचं रक्षण करण्यासाठी इथे खास रक्षक नेमलेले आहेत. ते या प्राण्यांबरोबरच इथल्या झाडांचं, पाना-फुलांचंही रक्षण करतात. काही कुरणं मात्र खास शिकारीसाठी राखून ठेवलेली आहेत. सुट्टीच्या दिवशी येथील लोक हरीण, रानडुक्कर अशा प्राण्यांची शिकार करतात. त्यांची कातडी, डोकी भुसा-पेंढा

भरून शोभेसाठी घरात ठेवतात...

ती माहिती ऐकता ऐकता कुरणं, शेतं मागे पडली आणि आमची गाडी चढउतार नि वेडीवाकडी वळणं असलेल्या सह्याद्रीच्या घाटासारख्या डोंगराळ प्रदेशात आली. इथेही खैर, किंजळ, पिंपळ, अंजन वगैरे वृक्ष होतेच, पण वृक्षाची एक विशिष्ट जात सर्वांचं लक्ष विशेष वेधून घेत होती.

केळीसारखीच पसरट हिरवी पानं, त्यांचे पोपटी देठ मधल्या सोपात एकात एक गच्च बसलेले होते नि मोराचा पिसारा उलगडावा तसा पानांचा पंखा उलगडला होता. त्या पंख्यामधून दुमडलेल्या पानांचा लहानसा पंखा असलेला कोवळा पोपटी कोंब हळूच डोकावून बघत होता. दुतर्फा अधून-मधून उभ्या असलेल्या त्या झाडांकडे पाहून डोंगरकपारीतल्या आदिवासी स्त्रियाच जणू आपापली बाळं छातीशी धरून आमच्याकडे कुतूहलानं पहात आहेत असं वाटत होतं त्यांच्याकडे पाहून हसण्याचा किंवा हात उंचावून त्यांना टाटा करण्याचा मोह व्हावा इतकी ती झाडं मानवीय दिसत होती.

अशीच आणखीही काही झाडं, वेली, झुडपं आपापसात कुजबुजत, आमच्याकडे पाहून डोळे मिचकावत होती. मधूनच एखादी पावसाची सर सरसरून जात होती नि परत लखलखीत ऊन हसत होतं. त्या उन्हात गवतावरचे थेंब हिऱ्यासारखे चमकत होते. इंद्रधनुष्याचे गोफ तर वारंवार उमलत होते, मिटत होते नि सृष्टीचे ते गोड विक्रम पहात आम्ही पुढे सरकत होतो.

आता उन्हं बरीच उतरली होती. अधूनमधून ढगही येत होते. 'शामारेल लख्ख उन्हात चमकताना पहाण्यात खरी गंमत असते- असं काही मंडळी सांगत होती नि ती लखलखती माती पहायला आम्ही अधीर झालो होतो.

अखेर एका दगडी टोलनाक्याशी आमच्या गाड्या थांबल्या तसं 'हा कसला नाका बुवा? असं म्हणत शिंदेनी डोकं बाहेर काढलं. 'इथे पंचवीस रुपये टॅक्स भरावा लागतो.' चंद्रसेन म्हणाला. 'पंचवीस रुपये? माती पहायला?'

'हो, सर्वांसाठी,' 'हां, मग ठीक आहे, मला वाटलं...' असा वार्तालाप होतोय तेवढ्यात कुणीतरी ओरडलं, 'अहो, उतरा खाली. माती बघा.'

साधारण हजार दीड हजार चौरस फुटांच्या परिसरात चॉकलेटी रंगाच्या तुळतुळीत टेकड्या पसरलेल्या होत्या. डोंगरावरील जमिनीची धूप होऊन मातीचे थर साचावे तशा त्या टेकड्या पण धूप झाल्यामुळे नाही तर भूकंपामुळे तयार झालेल्या. माती चिकण मातीसारखी घट्ट होती. तिला अधून मधून लाल, निळ्या, पिवळ्या, हिरव्या रंगाची झाक मारत होती. हिऱ्याच्या चुऱ्यासारखे मातीचे काही कणही चमकत होते नि नक्कीच त्या

खाली हिरे असावे असं वाटत होतं. गंमत म्हणजे आजूबाजूला गच्च झाडं झुडपं उभी होती, छान गवत मातलं होतं, पण त्या टेकड्यांवर मात्र गवताचं एकही रोप उगवलेलं दिसत नव्हतं. हिरव्या वस्त्रात नाचणीची रास असावी ना तशी ती माती दिसत होती. त्या टेकड्यांवरून आम्ही हिंडत होतो, फिरत होतो, तिथली माती नखांनी उकरून पहात होतो. पण त्या मातीचं नातं अन्य कोणत्या मातीशी आहे असं मात्र वाटत नव्हतं.

आमच्यापुढे चाललेली एक बाई दुसरीला सांगत होती, 'अग, सूर्याच्या सात घोड्यांच्या सप्तखुरांनी ही जमीन सप्तरंगी झाली आहे, अशी इथे आख्यायिका सांगतात' त्यावर मी जरा मोठ्यानच म्हटल, सात घोड्यांच्या सप्तखुरांनी कसं काय अठ्ठावीस खुरांनी असेल. आणि जरा काहीतरी वेगळ, अनाकलनीय दिसलं की त्या भोवती अद्भुततेचं वलय निर्माण करण्याची सवय इथल्या लोकांनाही आहेच का? मी असं म्हणताच 'काय तरी विचित्र बाई आहे!' अशा नजरेन माझ्याकड वळून वळून पहात त्या दोघी पुढे सरकल्या.

घरच्या मंडळींसाठी देवळातून अबीर गुलाल बांधून आणावा तशी ती वेगवेगळी झाक असलेली माती बांधून घ्यावीशी वाटली. पण इथे येणाऱ्या प्रत्येकानं असं केलं तर ही माती इथे राहील का? या विचारानं तो मोह आवरून आम्ही तिथून निघालो.

आता सूर्यप्रकाश विरळ होत जाऊन सर्वत्र संधिप्रकाश भरू लागला होता. आजूबाजूला निःशब्द शांतता पसरली होती नि वाटेवरची ती लेकुरवाळी झाडंही आम्हाला मूकपणे निरोप देत होती. त्या झाडांकडे पाहून का कोण जाणे, पण मुला-बाळांची, घरादाराची, आमच्या मातीची आठवण होऊन मनाला हुरहुर वाटत होती. घराची ओढ लागली होती.

प्रेक्षणीय स्थळांचा त्या दिवशीचा प्रवास संपवून हॉटेलकडे परत येताना वाटेत क्यूपिप येथील गणपतीचं देऊळ पहायचं होतं. खरं तर प्रवासानं शरीर आणि मनही थकलं होतं. कधी एकदा हॉटेलवर परततो नि बिछान्यावर अंग टाकतो असं झालं होतं. पण तिथली मंडळी देऊळ दाखवण्याच्या निमित्तानं आम्हाला चहा फराळ देऊन आमचा पाहुणचार करणार होती. नाईलाजानं आमच्या गाड्या तिकडे वळल्या नि मराठी भाषा कशी लवचिक आहे, ती हवी तशी कशी वाकवता येते याचा अनुभव चाबकाच्या फटक्यासारखा आमच्यातला काही मंडळींनी पाहुणचार करणाऱ्या मॉरिशीयनांना दिला.

गणपतीचं देऊळ रस्त्याला लागूनच टेकड्या टेकड्यांच्या प्रदेशात होतं. देवळासमोरून जाणारा रस्ताच वरच्या टेकडीवरून आमच्या मुक्कामाकडे जात होता. सर्वात पुढे असलेल्या दोन गाड्या देवळाजवळ न थांबताच तशाच वरच्या मार्गाने पुढे गेल्या. त्या का थांबल्या नाहीत ते आम्हाला कळलं नाही. आम्ही मात्र देवळाच्या आवारात शिरलो. गाड्या पार्क करून देवळात गेलो. गणपतीची मूर्ती पाहिली नि चहा फराळाचा समाचार घेणार तेवढ्यात पुढे गेलेल्या त्या दोन गाड्या वळून परत आल्या. आतली माणसं खाली उतरली ती

भांडतच. दोन्ही गाड्यातली माणसं त्यांच्या ड्रायव्हरशी भांडत होती. त्यांच्यावर ओरडत होती. एक प्रौढशी महिला डोळे गरगरवत ड्रायव्हरवर खेकसली, 'अरे, आम्ही तुम्हा दोघांना काय सांगितलं? गाडी देवळावरून घ्या, होय ना? मग तुमचे कान फुटले होते का?' देवळाच्या वरच्या मार्गाकडे बोट दाखवत ड्रायव्हर मोडक्या तोडक्या मराठीत म्हणाला, 'होय मॅडम, आमी तो वरच्या बाजूनंच गाडी नेलो होतो ना?'

'हो. आमी देवलाच्या वरना गाडी नेलो...' दुसराही म्हणाला. तशी प्रत्येक शब्दावर जोर देत दुसरी बाई कडाडली, 'अरे बावळटांनो, देवळावरून म्हणजे देवळाकडे, देवळात, देवळाजवळ. कळलं? इडियट!!'

'नाहीतर काय? मूर्खच आहेत मेले. यांच्याशी कसं बोलायचं तेच कळत नाही.' आणखी एकजण बडबडली आणि देवळावरून म्हणजे देवळाकडे, देवळाजवळ, देवळात हे व्याकरण न समजून ते दोघे अपमानित आणि दुःखी झाले. आपल म्हणणं ते पटवून देऊ शकत नव्हते नि त्यांचं कुणी ऐकूनही घेत नव्हतं. आमचा पाहुणचार करणारी तिथली मंडळी पाहुण्यांचा क्षोभ भेदरलेल्या डोळ्यांनी पहात होती नि लाकडाचा तुकडा खुंटी, खुंट, खुंटा नि वेळप्रसंगी बडगाही कसा होतो त्याची झलक पाहून चांगलीच हबकली होती.

त्या प्रकारानं आधीच हळवं बनलेलं मन आभाळ भरून यावं तसं खिन्नतेनं भरून आलं. काही खावं - प्यावं, कुणाशी बोलावं असं वाटेना. विचित्र ताण जाणवू लागला. कसाबसा त्या मंडळींचा निरोप घेऊन आम्ही हॉटेलवर परतलो.

पुढच्याच हॉलमध्ये आमचे सर्व सहकारी आमची वाट पहात बसले होते.

'काय, कुठे कुठे हिंडलात?' 'काय काय पाहिलंत? आमच्यासाठी काय काय आणलंत, बघू बघू ...' सगळीकडून प्रश्न आले आणि कुठली कोण माणसं चार दिवस एकत्र आलो काय, राहिलो काय नि अगदी एकमेकांच्या घरचेच असल्यासारखे झालो काय. फ्लोरा, अलका, मंत्री, सुधाताई साऱ्या साऱ्यांना पहाताच, त्यांच्यात मिसळताच मनावरचा ताण एकदम हलका हलका झाल्यासारखं वाटलं नि त्यांच्यासाठी बांधून आणलेली फ्रेंच पेरूची आंबट गोड शिदोरी आम्ही त्यांच्या समोर ठेवली...

थोडी विश्रांती घेऊन कपडे बदलून आम्ही पार्टीच्या ठिकाणी हजर झालो. आता पार्टी कोणत्या हॉटेलमध्ये आहे ती कोण देतय, याची आम्ही फारशी दखल घेत नव्हतो. खरं तर मोठ्या हॉटेलातल्या पार्टीचं तसं कौतुकही वाटत नव्हतं. काहीही कष्ट न करता आयतं जेवायला मिळतय यावरच सर्व भगिनी मात्र खूश होत्या. इथे तिथे फिरत एकमेकींची चौकशी करत विशेषतः साड्या वगैरे कुठे मिळतात ती ठिकाणं विचारत हिंडत होत्या.

त्या पार्टीत देविका दिलजोर नावाची एक बाई भेटली. ती मूळची पंजाबमधली. पतीच्या नोकरीमुळे ती तिथे गेली होती. तिथल्या स्त्रियांमध्ये मिसळलली होती. बोलता बोलता तिने तिथल्या 'मराठी स्त्री मंडळी' या संस्थेची माहिती दिली. देविका स्वतः त्या मंडळाच्या कार्यकारीणीची सभासद होती.

मला त्या संस्थेबद्दल उत्सुकता वाटली. तिथल्या स्त्रियांबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल समजून घ्यावसं वाटलं. मी म्हटलं, 'तुमच्या मंडळाबद्दल, त्याच्या कार्याबद्दल सविस्तर ऐकायला आवडेल आम्हाला.' मी असं म्हणताच तिने आपल्या नावाचं कार्ड माझ्यासमोर धरलं. म्हणाली, 'घरी या मग बोलू' आणि मग मॉरिशसमध्ये कुठे कुठे काय काय मिळतं हे सांगण्यात ती रंगून गेली.

'रोझहिल' या शहरात कपबशा, सरबताचे, डिनरचे सेट तर 'कात्रबोन'ला लोकरीचे कपडे, खाऊ, खेळणी, सूट, शर्टचं कापड नि साड्या घ्यायच्या तर मात्र 'पोर्ट लुईस' या राजधानीच्या शहरातच घ्याव्या. ते एक प्रमुख बंदर आहे. तिथे बाहेरच्या देशांतून येणारा माल उतरवला जातो. तिथे चिनी, इंग्रज, फ्रेंच व्यापाऱ्यांची मोठमोठी दुकानं

आहेत. अशी बरीचशी माहिती ती सांगत राहिली.

गप्पागोष्टी करत आम्ही जेवण उरकलं तेवढ्यात आशाला कुणाची तरी आठवण झाली. इकडे-तिकडे पहात ती म्हणाली, 'मघापासून मी बघतेय पण हिमालय ट्रॅव्हल्समधून आलेले लोक कुठे दिसले नाहीत ग, मला त्या हिला भेटायचं होतं. असं म्हणत ती पलीकडच्या हॉलमध्ये गेली. तिथेही टेबलक्लॉथ अंथरलेली नि प्लेटस् काटे-चमचे ग्लासेस वगैरे मांडलेली टेबलं जेवणासाठी सज्ज होती, त्या बाजूला विरजानंद मल्लू सचिंत उभे होते. त्यांच्याजवळ जात आशानं विचारलं, 'काय हो हिमालय ट्रॅव्हल्समधली माणसं जेवण करून गेली?'

यावर होय किंवा नाही एवढंच उत्तर अपेक्षीत होतं; पण मराठी भाषेचा एक दणका आम्हाला देत विरजानंद मल्लू म्हणाले, 'जेवण करून गेली? व्हाट डू यू मी ऽ ऽ न ? त्यांना आम्ही जेवण करायला बोलावलं होतं का? जेवण आमच्या कूकनी केलं तरीसुद्धा ते लोक जेवायला आले नाय, हे हे बगा' त्या रिकाम्या टेबलांकडे बोट दाखवत, 'या जेवणाचे आमचे पैसे फुकट गेले त्याचं काय?' वीर मल्लू आशावर ओरडले नि तिला अगदी तोंडात मारल्यासारखं झालं. ती आपलं म्हणणं त्यांना समजावून सांगू लागली, पण ते ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हते. ते आणखीनच काहीतरी बडबडू लागले. तशी तिथे माणसं गोळा होऊ लागली. काय झालं? काय झालं? जो तो विचारू लागला. विरमल्लू का चिडले ते आम्हाला थोड्या वेळानं कळलं.

हिमालय ट्रॅव्हल्सने परिषदेच्या निमंत्रितांसोबत आपले काही प्रवासी मॉरिशस बघायला नेले होते. त्यांच्या रहाण्या जेवणावरून त्यांच्या एजंटचं नी परिषदेच्या मॉरिशियन कार्यकर्त्यांचं भांडण झालं होतं, त्यामुळे हिमालय ट्रॅव्हल्सची माणस जेवायला आली नव्हती. आता तो विषय निघाल्यावर इथेही थोडी वादावादी झालीच.

मोठ्या समारंभात असं होतंच. कुणाचा राग कुणावर तरी काढला जातो, पण ते लक्षात घ्यायचं नसतं. सडकून झालेली गारपीट लगेच वितळून जावी तशी ही सणकासणकीसुद्धा ताबडतोब निवळते आणि नंतर झालंही तसंच.

जेवण होताच सर्वमंडळी हॉटेलच्या पुढच्या अंगणात जमा झाली नि थोड्या वेळाने डफ हातात घेतलेल्या नि पायात चाळ बांधलेल्या चारपाच निग्रो स्त्रीपुरुषांनी अंगणात नाचायला सुरुवात केली. त्यात दोनतीन पुरुष होते नि तीन स्त्रिया. पुरुषांनी जीनची पँटशर्ट घातलं होतं नि ते खालून दुमडलं होतं. त्यांच्या गळयात सोन्याची चेन नि एका कानात रिंग होती. स्त्रियांन बलुची बलुची बायकासारखे पोटरीपर्यंत घेरदार घागरे नि उघड्या मोठ्या गळयाची फॅशनची पोलकी घातली होती. कानात लोंबते डूल होते नि गळेमात्र मोकळे होते.

त्या ताफ्यातले दोन पुरुष डफ वाजवत होते, तर तिसरा तीनचार लोखंडी कड्या खुळखुळवत होता नि त्या नर्तिका घागऱ्याची दोन्ही टोकं दोन हातांनी उंचावून कमरेच्या वरचा भाग हेलकावत नाचत होत्या. गिरक्या घेत होत्या. पंख फडफडवत पाखरानं फुलावर बसावं तसं घागरे पाठीमागे उंचावून झेपावत होत्या.

कोच्या ओकोच्या ऽ ऽ ऽ हे ऽ ऽ ऽ कोच्या ऽ ऽ अरिब्बा टुमडक टुमडक टुमडक अशी निग्रोच्या गाण्याची सुरावट असलेलं क्रिओल लोकगीत ती मंडळी गात होती. गाण्याऐवजी त्या डफावर उमटणारे टणत्कार नि त्या टणत्कारावर हलणारे नर्तिकांचे खांदे, उरोज लोकांच्या नजरा खेचत होते. सुरवातीला डफावर उमटणाऱ्या या ठेक्यांचा वेग पुढे पुढे वाढत गेला नि नर्तिकांच सर्वांग जोमानं थिरकू लागलं, खांदे उडू लागले आणि त्या अधिकच आवेगानं अंगणभर घुमू लागल्या.

आता प्रेक्षकांचं भानही हरपलं. अंगणभर पसरलेल्या त्या नर्तिकाच्या आवर्तात प्रथम पुढे झेपावल्या त्या शिलाबाय बापू, नंतर त्यांनी वर्षा उजगावकर नि नितीश भारद्वाजलाही आत ओढलं. मग एकएक करत बरेचजण त्या नाचात सामिल झाले. नुसता कमरेच्यावरचा भाग हलवत नाचणं सोपं नव्हतं. शिलाबाय तिथल्याच त्यामुळे त्यांना ती कला थोडीशी साधली होती; पण आमची वर्षा खरी नर्तिका-आणि अभिनेत्रीसुद्धा! तिने मात्र त्या नाचाची सहीसही नक्कल केली.

आमच्यातून अलका फ्लोरा नि आशाही थोडा वेळ नाचल्या मघाशी वीर मल्लूनी आशाला दुखावलं होतं; पण आता ते आशाशी बोलत होते, तिला हसवत होते. आशाच्या मनातला राग मावळत होता. तिचाच कशाला, सर्वांच्याच मनातला राग, द्वेष, काळज्या मिटल्या होत्या नि सारे बेभान होऊन नाचत होते. सर्वांच्या तनामनावर त्या नृत्याची एक नशा चढली होती.

त्या नृत्याला मध्यरात्री आलेला बहर उत्तर रात्री हळूहळू ओसरू लागला. सर्वांची शरीरं जडावू लागली, पावलं अडखळू लागली. डफांचा, कड्यांचा आवाजही मंदावला नि मग हळू हळू आम्ही त्या रिंगणातून त्या नृत्याच्या नशेतून बाहेर पडलो. पुढे ते नृत्य, ते धुंद वातावरण कितीतरी दिवस आमच्या आठवणीत घुमत राहिलं.

रात्री नाचल्यामुळे सकाळी उठताना आमच्या काही नाचलेल्या सहकाऱ्यांना लवकर उठता येणार नाही, त्यांचं अंग दुखेल नि फिरायला जाण्याचा विशेष उत्साह कुणी दाखवणार नाही असं वाटलं होतं, पण तसं झालं नाही. उलट चहा घेऊन उत्साहाने सगळे चंद्रसेनची वाट पहात बसले.

'आता आधी प्रथम काय पाहू या?' गोखल्यांनी सर्वांना विचारलं, तशी फ्लोरा

म्हणाली, हे पहा, रात्रीच्या प्लेननं मी आणि अलका इंडियात परतणार आहोत, त्या बेतानं आताचा प्रोग्रॅम ठरवा.

'प्रथम एखादं छानसं देऊळ पाहू' सुधा गोखले म्हणाल्या आणि मग आमची गाडी त्या दिशेनें निघाली. आज पाऊस अजिबात नव्हता आकाश मोकळं होत. सकाळची कोवळी उन्हंही बरीच उष्ण होती.

शहरातले सिमेंट काँक्रिटचे दुपदरी-चौपदरी रस्ते ओलांडून आम्ही खेड्यातल्या एकमार्गी रस्त्याने निघालो. खेड्यातले रस्तेही चांगले डांबरी होते. एका ठिकाणी रस्ता सोडून कसल्यातरी वायर टाकण्याचं काम चालू होतं. तेवढ्या भागापुरतेच प्लास्टिकचे उभे खांब लावून रहदारी अडवली होती. तिथ काम करणाऱ्या मजुरांना मी लक्षपूर्वक पहात होते... व्यवस्थित खाकी फूल ड्रेस, पायात गमबूट, हँडग्लोव्हज, डोक्याला क्रिकेट कॅप असा पेहराव असलेले मजूर अंगपिंडानंही व्यवस्थित होते. पुढे अशीच आणखी काही मजुर मंडळी दिसली, त्यात स्त्रिया मात्र दिसत नव्हत्या. रस्त्यावरू फिरणारे अगदी खेड्यातले लोकही खाऊनपिऊन कपडालत्ता लेऊन सुखी वाटत होते.

खेड्यातली घरंसुद्धा सिमेंटची, तर काही कौलारू, क्वचित एखादी पत्र्याची शेड होती. घराभोवती चांगलं कुंपण असलेले परडं. त्यात आंब्या-फणसाची, नारळीची झाड नि चाफा, कन्हेरी, गुलाब, शेवंतीची रोपं झुलत होती. समुद्रकिनाऱ्याचे गाव असूनही घराभोवती नारळीपोफळीची खास तयार केलेली बनं नव्हती. मात्र समुद्रकिनाऱ्यावर हमखास उगवणारी पिवळ्या घंटाकृती फुलांची रानभेंडी नि तशाच आकाराची लाल तांबूस फुलं असलेली उंडीणीची झाडं खाजणात सर्वत्र उभी होती.

ती झाडं, घरं पहात एका समुद्रकिनाऱ्यावरून दुसऱ्या समुद्रकिनाऱ्याकडे प्रवास चालला होता. ते पाहून मी म्हटलं, 'आपण सर्व मॉरिशस पादाक्रांत करत निघालोयसं वाटतं? 'अर्थातच!' अलका म्हणाली. 'म्हणजे हा देश आहे तरी केवढा?' माझ्या या प्रश्नावर मिस्किलपणे हसत अलका म्हणाली, 'थांब, तुला इथला एक विनोद, सांगते, तो ऐक नि ठरव हा देश केवढा ते,' आणि ती सांगू लागली. सर्वांनी कान टवकारले -

'एकदा युरोपमध्ये सर्व देशातल्या खेळाडूंची चारशे मिटर धावण्याची शर्यत लागली. त्यात मॉरिशसचा खेळाडू होता. तो दोनशे मिटर धावल्याबरोबर थांबला. पुढे धावलाच नाही. त्याला विचारलं, तू मध्येच का थांबलास? तशी तो म्हणाला आणखी धावलो असतो तर मी पाण्यात पडलो असतो ना...'

यातला विनोदाचा भाग सोडला तरी, खरोखरच मॉरिशसमधून कुठल्याही ठिकाणाहून बाहेर पडलं की आपण थेट पोहोचतो ते समुद्रावरच. आताही दोनचार गावं मागे टाकून

ट्रोंओबीशच्या समुद्रात गेलेल्या रस्त्यावर आमची गाडी उभी राहिली. रस्त्याच्या पार टोकाला समुद्रातील खडकावर एक पांढरंशुभ्र देऊळ उभं होतं. कमळाकृती घुमटाचं ते सुबक देऊळ लांबून एखाद्या सर्वसंग परित्याग केलेल्या योगिनीसारखं दिसत होतं.

पायउतार होऊन आम्ही बंधाऱ्यावरून देवळाच्या पायऱ्याशी आलो. वीस पंचवीस पायऱ्यांच्या चबुतऱ्यावर साधारण तीस बाय चाळीसच्या प्राकारात सिमेंटचे पांढरे खांब, त्यावर देवादिकांच्या तसबिरी लावलेल्या, आत गर्भागारात शंकरपार्वतीची धातूची मूर्ती, बाजूला गणपती, समोर पिंडी प्राकारात नंदी, सारं आपल्याकडील देवळात असावं तसं चित्र नि वातावरणसुद्धा.

देवळाच्या घुमटाकडे जायला बाहेरून पायऱ्या होत्या, त्या चढून आम्ही वर गेलो. समोर अथांग समुद्र पसरलेला. गर्भागारात निळाभोर होत गेलेला, आकाशाशी अंतर राखून असलेल्या त्या समुद्राचं पाणी काठावर बरच उथळ होतं. पांढऱ्याशुभ्र वाळूवर पसरलेल्या त्याच्या लवलवत्या लाटा शेल्यासारख्या अंगाभोवती लपेटून त्या ट्रीओबीश समुद्रात मनसोक्त डुंबावं असं वाटत होतं.

उजवीकडे एका लहानशा बेटावर काही युरोपियन स्त्री-पुरुष गोल छत्र्यांखाली खारा वारा अंगावर घेत मस्त पहुडले होते. काहीजण पाण्यात डुंबत होते, तर काही स्त्री-पुरुष आणि लहान मुलंसुद्धा होड्यांमधून फिरत होती. त्यांच्या मागच्या बाजूला गवताचं छप्पर असलेले कितीतरी बंगले होते. त्यांच्याकडे बोट दाखवत चंद्रसेन म्हणाला, 'तो समुद्रकिनारा आणि ते बेट खाजगी आहे. तिथे इतरांना जाता येत नाही.'

'म्हणजे इथला सागरकिनाराही गरीब - श्रीमंत असा भेद करतो तर... मी हसत हसत म्हटलं यावर तसंच हसत चंद्रसेन म्हणाला, 'हो इथे गरीब-श्रीमंत असे वर्ग नक्कीच आहेत पण तुमच्यासारख्या जाती वगैरे नाहीत.'

चंद्रसेनच्या बोलण्यावर कुणीच काही बोललं नाही आणि बोलण्यासारखं तरी काय होतं?

त्या गवताची छपरं असलेल्या श्रीमंत बंगल्यांची, त्या श्रीमंत जगाची आठवण म्हणून आम्ही काही फोटो काढले, नि परतलो तेव्हा इवल्याशा होडीतून बंधाऱ्याशी आलेली त्या श्रीमंत जगातली दोन गुलाबी पोरं आमच्याकडे पाहून हसत होती. हात उंचावून आम्हाला टाटा करत होती.

आता सूर्य बराच वर आला अजून गांब्रेबीच, बोटॅनिकल गार्डन, कासेला बर्ड पार्क बघून दोन वाजेपर्यंत हॉटेलवर परतणं शक्य नव्हतं. म्हणून मात्र जगातल्या आश्चर्यकारक अशा दोन वनस्पती असलेली बोटॅनिकल गार्डन पाहून परत जायचं ठरलं.

गार्डनकडे जातना रस्त्याच्या दुतर्फा ॲन्थेरियमच्या फुलांची खास लागवड केलेले बरेच मळे दिसले. डेलियासारखी उंच चिवट दांडी नि तिच्यावर पिंपळाच्या पानासारखं लालभडक पण चिवट पान, त्याला जोडून करंगळी एवढा पिवळा धम्मक खडबडीत कोबासारखा पराग. असे हे कोंब असलेलें लाल पान म्हणजे ॲन्थेरियमचं फूल. हे फूल चांगलं दहा पंधरा दिवस टिकतं. या फुलाला इंग्लंड - अमेरिकेहून फार मोठी मागणी असते. प्रत्येक फुलाचे पंधरा वीस रुपये सहज मिळतात. त्यामुळे या फुलांची मॉरिशसमधून फार मोठी निर्यात होते असं कळलं.

या फुलांच्या रंगाबरोबरच आणखी अशाच लाल फुलांच्या झाडांकडे लक्ष जात होतं. ती झाडं होती गुलमोहराची. गुलमोहर हा खरा जवळच्याच मादागास्कर बेटातला. एकोणिसाव्या शतकात तो मॉरिशसमध्ये नेण्यात आला आणि तिथे तो इतका बहरला की, मूळ तिथलाच रहिवाशी असल्यासारखा वाटू लागला.

गुलमोहराच्या झाडाखाली काही जगत नाही म्हणतात, म्हणून असेल पण त्या झाडाखालची हिरवळ विरळ झाली होती हे नक्कीच याच कारणासाठी गुलमोहर बागेत लावत नसतील कदाचित. तर गुलमोहराची झाडं असलेल्या मार्गावरून प्रवास करत आम्ही एका झाडाझुडपांनी वेढलेल्या लोखंडी फेंशींग असलेल्या प्रवेशद्वाराशी आलो. तिथून आतपर्यंत सर्वत्र हिरवीकंच दुर्वा मातली होती. ब्रह्मी आणि माक्याची अमाप रोपं मोठमोठ्या वृक्षांच्या पायाशी निवांत लोळत होती त्या वृक्षात आपली नेहमीची वड पिंपळ, पांगारा कडू निंब, साग, खैर वगैरे झाडं होतीच शिवाय होडीच्या आकाराच्या बिया असलेले वीस बावीस सेंटीमिटर व्यासाचे फुगीर पामवृक्ष आणि लांब गोंड्यासारखे बियांचे घोस असलेले पन्नास ते सत्तर सेंटीमिटर व्यासाचे दांडगे ताडवृक्षही जागोजाग राखणदारासारखे पहारा देत होते.

त्या वृक्षवल्लीतून हिंडतफिरत आम्ही साथारण साठ बाय शंभर सौरस फुटाच्या आयताकृती तळ्याशी आलो. त्यातल्या स्वच्छ नितल पाण्यात मोठ्या परातीएवढ्या आकाराची हिरवी गार पानं तरंगत होती. कमळाच्या पानासारख्याच मऊ गुळगुळीत पानांबरोबरच काही ताटाच्या किंवा ताटलीच्या आकाराची कोवळी पानंही होती आणि त्यांचा रंग तांबूस गुलाबी होता. त्या सर्व पानांना हात लावण्याचा मोह होत होता, पण त्या वनस्पतीकडे आत्मसंरक्षणासाठी निसर्गानेच सूईसारख्या तीष्ण काट्यांचं शस्त्र दिलं होतं. पानांच्या मागील भागावर अणुकूचीदार काट्यांची जाळीच पसरलेली होती, त्यामुळे स्पर्शासाठी पुढे झालेले आमचे हात आपोआपच मागे सरले. पाण्यात वाकून पाहिलं तेव्हा लक्षात आलं की त्या पानांचे देठ वेलींचे नव्हते, तर त्या चक्क फांद्या होत्या. खोल खाली तळाशी त्या फांद्याची बरीचशी झाडं पाण्यातून स्पष्ट दिसत होती.

त्या वनस्पतीचं नाव होतं 'वॉटर लिली.' आफ्रिकेत विशुववृत्तीय प्रदेशात अशी पानं सापडतात असं भूगोलाच्या पुस्तकात वाचलं होतं.

त्या पानांचे फोटो वगैरे काढून वेगवेगळी झाडं पहात, निरीक्षण करत आम्ही मॉरिशचे माजी पंतप्रधान सर शिवूसागर रामगुलाम यांच्या समाधीशी आलो. तिथे समाधीला लागूनच लोखंडी फेन्शींगच्या आत मोठेमोठे पंधरावीस काळत्रयी पाषाण दिसले. थोड्यावेळाने ते पाषाण सरकू लागले नि लक्ष्यात आलं की ती मोठी काळ्या पाठीची कासवं आहेत. इतक्या संख्येने मोठी कासवं मी प्रथमच पहात होते. झाडांच्या पानांमधून थेट अंगावर येणारे सूर्यकिरण चुकवीत ती सरकत होती. काहीजणं एकमेकांना लाडालाडानं दुशा देत होती.

घाईघाईनं त्या कासवांचेही फोटो घेऊन आम्ही त्या दुसऱ्या महत्त्वाच्या वनस्पतीकडे वळलो. ती वनस्पती म्हणजे 'टालिपो' या नावाचा शंभर वर्षांची आयुर्मर्यादा असलेला वृक्ष होय. त्या वृक्षाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, शंभर वर्षांनी त्या वृक्षाला फुलं येतात आणि फुलं येताच तो वृक्ष मरतो. निसर्गाचा तो चमत्कार पहायला आम्ही सर्वच आता विशेष उत्सुक होतो.

त्या बागेच्या एका टोकाला ताडामाडाच्या नि अनेक तऱ्हेच्या झाडांच्या गर्दीत ताडासारखाच मोठ्या खोडाचा टालिपो वृक्ष उभा होता. त्याच्या दोन्ही अंगाला खालून वरपर्यंत माडासारखा झावळ्या पसरल्या होत्या. साधारण चाळीस-पन्नास फूट उंचीच्या त्या वृक्षाला शिरोभागी पांढऱ्या शुभ्र काड्या नी पांढऱ्या शेवंती सारखी फुलं असलेला दोन अडीच फूट व्यासाचा मोठा तुरा फुटला होता. एखाद्या सम्राटाच्या मस्तकावर त्याच्या कर्तुत्वाचा मानबिंदू म्हणून राज्याभिषेकाचा मुकुट ठेवावा, तसा तो फुलारलेला पांढरा फेक तुरा त्या वृक्षाच्या शिरोभागी खोवल्यासारखा दिसत होता.

निळ्या भोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर सर्व जगाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेणारा तो तुरा कितीही आकर्षक दिसला तरी, आईबापाच्या मुळावर आलेला अवलक्षणी कारटा अशा तिरस्कृत नजरेनं आम्ही त्याच्याकडे पहात होतो. त्या वृक्षाच्या खालच्या बाजूकडील फांद्या कुणीतरी चूड लावून जाळून टाकाव्या तशा काळ्या झाल्या होत्या.

त्याकडे बोट दाखवून चंद्रसेन सांगत होता. 'या वृक्षाचे आता वय आहे सत्तर वर्ष आता आणखी काही वर्षात या फांद्या अशाच जळत जळत जातील आणि उरले फक्त कोळसा. पण त्या फुलांमधून तयार झालेली बारीक फळे जमिनीवर पडतील त्यातली काही जगतील नि परत असाच दिर्घायुषी वृक्ष पुन्हा याच ठिकाणी तरारून उभा राहील त्यालाही फूलं येतील आणि मग यांच्याचसारखा तोही ...

आम्ही त्या वृक्षाकडे मान उंचावून परत परत पहात होतो. आपल्या लांब केसाळ मुळांनी जमिनीला घट्ट पकडून सत्तर वर्ष वाऱ्यावादळाशी झुंज देत ताठ मानेनं जगलेल्या त्या वृक्षाच्या देहातून दुसरा देह निर्माण होताच त्याचं आयुष्य संपावं, संसार बहराला येतो आहे तेवढ्यात जगाचा निरोप घ्यावा, या निसर्गाच्या लिलेने आम्ही अवाक् झालो नि त्या वृक्षाकडे वळून वळून पहात जडावलेल्या पावलांनी त्या बागेतून बाहेर पडलो.





हॉटेलवर परतलो तर काऊंटवर नेरूरकरसरांचा माझ्यासाठी निरोप होता - दुपारी दयानंद पदू त्याची पुस्तकं न्यायला येणार आहे. त्याच्याबरोबर त्याच्या गावी जायचं आहे. तयार रहा.

तो निरोप ऐकून आशाच ताड एवढंसं झालं. नाही म्हटलं तरी परिषदेच्या त्या पाचसहा दिवसांत आम्ही दोघी अगदी गट्टीच्या मैत्रीणी झालो होतो त्यात आशाचा मुक्काम आणखी दोन दिवस तिथे होता त्यामुळे ते दोन दिवस माझ्या सोबतच रहायचं अशी तिची इच्छा होती आणि माझीही. अजून कासेला बर्ड पार्क क्युपिप येथील ज्वालामुखीचं विवर पहायचं होतं, ग्लास बॉटम बोटीतून हिंडायचं होतं. मोका येथे साजरा होणाऱ्या एक मेच्या कार्यक्रमाला हजर रहायचं होतं.

आशा म्हणाली, उर्मिला तुझी बॅग अडवून बसलेली त्या मुलाची पुस्तकं फक्त देऊन टाक तो आला तर, मात्र तू जाऊ नको. मी सांगते नेरूरकरसरांना चल. मलाही तेच म्हणायचं होतं. मी मान डोलावली.

रूमवर जाऊन आम्ही दोघी फ्रेश होऊन आलो. फिरफिरून भूकही सपाटून लागली होती. सगळेजण टेबलाभोवती बसून जेवणाची वाट पाहू लागलो. बराच वेळ झाला तरी वेटर टेबलाकडे फिरकेना. शेवटी गोखले उठले. आतल्या बाजूला जाऊन एका वेटरला घेऊन बाहेर आले. त्याच्या पाठोपाठ दुसरा वेटर आला तोही रिकामाच. आम्ही कोरसमध्ये ओरडलो 'अहो, जेवण, जेवण कुठाय?

त्यातला एकजण अर्धवट बडबडला, 'तुम्हाला आजचं जेवण द्यायचं की नाही याबद्दल

आम्हाला अजून सूचना मिळाल्या नाहीत. दुसरा म्हणाला, 'आम्ही फोन करून विचारतो आहोत.'

'अहो मग हे तुम्ही आधी का नाही सांगितलं?' गोखले रागावर नियंत्रण ठेवत म्हणाले, 'हे पहा, तुम्हाला सूचना मिळाल्या असोत किंवा नसोत. आम्ही पैसे भरायला तयार आहोत. कृपया जेवण लवकर आणा. या मंडळींना लगेच विमानतळावर जायचं आहे.' यावरही वेटर खुन्टासारखे उभेच.

तेवढ्यात आमच्यापैकी कुणीतरी बाहेर जाऊन काऊंटरवरील मालकाला तिथे आणलं. तोही आपल्याला अद्याप सूचना मिळाल्या नाहीत असंच संथपणे सांगू लागला. आता मात्र आम्ही सर्वजण भडकलो. ही वागण्याची रीत नव्हे. इथे आल्या दिवसापासून आम्ही बघतोय सगळं कसं सुस्त काम आहे तुमचं. आम्ही खपवून घेतलं, काही बोललो नाही म्हणून अशी वागणूक देता का? असं भुकेपोटी जे काही बोलता येईल तेवढं बोलून उठणार तेवढ्यात आशा पुढे होत म्हणाली, 'हे पहा, तुम्ही असं समजू नका की याची आम्ही कुठे तक्रार करणार नाही... जरूर तक्रार करणार आहोत आणि तुमच्या हॉटेलात काय काय चालतं तेही सांगणार आहोत.'

आशाचा या वाक्यावर मालक थोडा चमकला. सावरून बसत विचारू लागला. व्हॉट, व्हॉट डू यू मीन? आमचे सहकारीही आशाकडे पाहू लागले, तशी आशा म्हणाली, 'परवा रात्री तुमचा एक माणूस आमच्याकडे दारूची बाटली मागत होता. त्याला शोभतं का हे?'

हे ऐकल्याबरोबर सगळे ओरडले, 'कोण कोण, होता तो?'

'मला त्याचं नाव माहीत नाही, पण तो इथलाच आहे. हो की नाही ग उर्मिला?' आशानं माझी साक्ष घेतली.

मी मान हलवतेय तेवढ्यात तो गोऱ्या रंगाचा शिडशिडीत तरुण तिथून पास होऊ लागला. त्याच्याकडे बोट दाखवून आशा म्हणाली 'तो पहा.' 'तोच तो.' ते ऐकून त्या तरुणाचा चेहरा कावराबावरा झाला आणि मालकाचा चेहरा बघण्यासारखा झाला. त्यानं त्याला जवळ बोलावलं नी क्रिओल भाषेत रागावून बोलू लागला. काय बोलला कुणास ठाऊक पण त्याला चांगला झाडत होता एवढं कळलं.

त्यानंतर मालकही चांगलाच नरमला. नी आमची क्षमायाचना करत आम्हाला जेवण देण्याची सूचना देऊन तो निघून गेला. अलका म्हणाली, 'हर्रहर्र चला आता आवरा बोचकं, पाहुणा जास्त दिवस राहिला की असं होतं.' यावर आम्ही सगळे हसलो. पण आता तिथल्या जेवणात नी रहाण्यात चव मात्र राहिली नव्हती.

अलका आणि फ्लोरा निघाल्या. त्या दोघींना निरोप देताना नाही म्हटलं तरी जड वाटलंच. अलका मूळची भारतीय. दक्षिण कोरियातून शिष्यवृत्ती मिळवून तिने पी. एच. डी. केलं. तिथे ती प्राध्यापिका असून जर्मन रेडिओवरही काम व लेखन करते. तिचा प्रत्येक शब्द सुटा, स्वच्छ आणि खणखणीत. मिस्किलतेची डूब असलेला. आवाजात गोडवा आणि रुपही तसंच. फ्लोराही तशीच. अलका तीस - पस्तिशीची तर फ्लोरा तिच्याहून दुप्पट. पण दोघींच्या वागण्यातली चपळता, खेळकरवृत्ती सारखीच त्यामुळे त्या दोघी गेल्या नि एकदम सुन्न, एकाकी वाटायला लागलं. त्याचा परिणाम म्हणून की काय थोड्या वेळानं नेरूरकर सर मला न्यायला आले तेव्हा काहीशा तक्रारखोर अन् चिडक्या आवाजात आशा म्हणाली, 'नाही नाही, उर्मिला आता येणार नाही तुमच्या बरोबर ... मी नाही जाऊ देणार तिला.'

सर म्हणाले, 'हे बघ उर्मिला, आम्ही कात्रबोनमध्येच मि. भुगन यांच्या घरी उतरलो आहोत. पण आता हा पदू आपल्याला त्याच्या गाडीने त्याच्या घरी नेणार आहे नी काही प्रेक्षणीय स्थळंही दाखवणार आहे. तू येतेस तर चल. नंतर तुला इथून नेणं शक्य होणार नाही.''

यावर आशा म्हणाली,' हे पहा, तुम्ही कुठे उतरला आहात तो पत्ता मला सांगा. मी हिला तिथे पोहोचवीन मग तर झालं?'

आशाचं हे निकराचं बोलणं ऐकून सर हसत म्हणाले, ''वा ऽऽ उर्मिलावर फारच प्रेम बसलेलनं दिसतंय तुम्हा मंडळींचं.'' आम्ही एवढं बोलतोय तेवढ्या वेळात त्या मुलाची माझ्या बॅगेतली ती लठ्ठ पुस्तकं काढून मी त्याच्या स्वाधीन केली. ती घेऊन ओठातल्या ओठात अस्पष्टसं नुसतं थॅन्कस् म्हणून तो मुलगा निघून गेला.

मला त्या मुलाचं नवल वाटलं. मी त्याची ती जडशीळ पुस्तकं इतके कष्ट सोसत इथवर आणली त्याबद्दल आभाराचे घसघशीत शब्द काही त्याला बोलता आले नाहीत. आशाच्याही ते लक्षात आलं. ती म्हणाली, 'इथली माणसं थोडी लहरी दिसतात नै ग उर्मिला?' मी म्हटलं, हो हा पदू नी मघाचा तो 'हॉटेल मालक यांच्यावरून मलाही असंच वाटायला लागलंय. कदाचित इथल्या वादळवाऱ्याला या लोकांना वारंवार तोंड द्यावं लागतं त्याचा परिणाम असावा.

ते दोघे निघून गेले आणि मग आम्ही थोडी विश्रांती घेऊन क्यूपिप या ठिकाणी असलेलं ज्वालामुखीचं विवर बघायला निघालो. सत्तर लक्ष वर्षापूर्वी हिंदी महासागरात भूकंप होऊन ज्या ठिकाणी लाव्हा रस उफाळून आला आणि तो थंड होऊन कासवाच्या (ऑयस्टर) आकाराचं मॉरिशस बेट तयार झालं. ते ज्वालामुखीचे ठिकाण मॉरिशसमध्ये आज प्रेक्षणीय स्थळ गणलं जातं. टेकड्या टेकड्यांच्या या प्रदेशातील हवा अतिशय थंड

असल्याने याला मॉरिशसचं काश्मीर असही म्हणतात. या प्रदेशातील गणपतीचं देऊळ आम्ही पाहिलच होतं, त्याच वाटेनं आम्ही विवराकडे निघालो.

या ठिकाणाला क्यूपिप हे नाव पडण्यामागेही एक आख्यायिका आहे. इथल्या झाडाझुडपांनी नी दाट गवतानं गच्च भरलेल्या प्रदेशात ब्रिटीशांच्या मळ्यावर रात्रंदिवस राबणारे थकले भागलेले कष्टकरी रहात. रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्ती या ठिकाणी सुरेख बासरी वाजवत असे. ती बासरी कोण वाजवतं, ते सूर कुठून येतात ते समजत नसे. पण ते सूर इतके सुखद आनंददायक वाटत की तिथल्या त्या कष्टकऱ्यांचे कष्ट त्या सुरांनी क्षणात नाहीसे होत. आजाऱ्याचा आजार पळे नी तो खडखडीत बरा होई. म्हणून 'क्युअर पाईप', म्हणजे बरं करणारी बासरी असं त्या ठिकाणाला नाव पडलं. पुढं त्याचं क्युपिप हे लघुरूप झालं.

आता या प्रदेशातली झाडी बरीच विरळ झाली आहे आणि तिथे टुमदार बंगले उभे राहिले आहेत. त्या बंगल्यांना वळसे घालत आम्ही थेट विवराशी पोहोचलो. साधारणत: दोन अडीजशे फूट व्यासाचं विहीरीसारखं पूर्ण गोलाकृती असं ते विवर होतं. बारीक गवतानं त्याच्या आतील भिंती झाकलेल्या होत्या नी खूप खोल कुठेतरी ते विवर संपत होतं. पुढे होऊन ओणवून बघायलाही धीर होत नव्हता इतकं ते घनगंभीर वाटत होतं. समुद्रातून सरपटत आलेल्या एखाद्या अजस्त्र प्राण्याने जांभईसाठी तोंड उघडावं तसं ते विवर दिसत होतं त्या ठिकाणी उभं असताना या विवरात जर उडी टाकली तर आपण नक्की कुठे पोहोचू भारतात की अमेरिकेत...?'' असा प्रश्न उगाचच डोक्यात फिरत होता.

ज्वालामुखीचं विवर पाहून परतताना थोडीशी खरेदी करावी अशी आशानं टूम काढली नी इथे मसाल्याचे पदार्थ खूप स्वस्त मिळतात असं येताना कुणीतरी सांगितलेलं आठवलं. आम्ही मग रस्त्याच्या दुतर्फा किराणा भुसार मालाचं दुकान शोधू लागलो. पण इथे लोकवस्ती विरळ असल्यामुळे मुख्य शहरं सोडली तर एखाद दुसऱ्या घराच्या बगलेत बारकंसं दुकान दिसायचं तेही एखादी बेकरी किंवा एखादं थंडपेयाचं दुकान निघायचं. त्यामुळे मसाल्याचे पदार्थ घ्यायला आम्हाला कात्रबोनलाच यावं लागलं.

एका दुकानासमोर दहा - पंधरा किलो वजनाच्या तांदळाची बारकीशी पोती नी लालभडक काश्मिरी मिरचीचे छोटेसे खोके बघून आम्ही तिकडे मोर्चा वळवळा. आत डाळी आणि कडधान्याचीही बारीक बारीक पोती होती. मात्र बाकी जिनसाची पाकीटं कपाटात मांडलेली होती. बदाम, बेदाणा, लवंग, दालचिनी वगैरे पदार्थ तिथं पोत्यानी असतील अशी माझी कल्पना. पण तेही काचेच्या लहानशा बरण्यांमध्ये पाय आखडूनच बसलेले दिसले. त्यात त्यांचा रुपया आपल्या रुपयाहून चौदा पैशानं मोठा. त्यामुळे तिथले

पदार्थ स्वस्त की महाग तेच कळत नव्हत. आता आलोच तर घ्यावं काहीतरी एवढ्या शहाणपणानंच आशानं बेदाणा खरेदी केला आणि मी तिथल्या पदार्थांच्या किंमती आणि भारतातल्या किंमती यातल्या तफावतीच्या घोळातच गुरफटत नुसती इकडून तिकडे फिरत राहिले. दुकानातून बाहेर पडतांना माझ्या डोक्यातला घोळ इतका वाढला की मॉरिशसला काही न घेणं हेच शहाणपणाचं वाटू लागलं.

बेदाणे तोंडात टाकत आम्ही दुकानांतून उतरलो नी हॉटेलच्या दिशेने निघालो तेवढ्यात रस्त्याच्या एका कोपऱ्यावर वळता वळता नरेश मंत्री म्हणाले, 'या पुढच्या गल्लीत एक बुद्धीस्ट सोसायटी आहे. गौतम मोथा नावाचा एक बौद्ध गृहस्थ ती चालवतो.'

मी चालता चालता कान टवकारले. मॉरिशसमध्ये बुद्धीस्ट सोसायटी एक तर चीनी लोकांची असेल किंवा मग आंबेडकरवादी भारतीयांची, खरच पाहिलं पाहिजेच कोण लोक आहेत ते असं मनात म्हणून मी मंत्रींना चटकन् म्हटलं, मला ती इन्स्टीटयूट पहायची आहे नी गौतमना भेटायचंय... अचानक मला विश्वास वाटू लागला की गौतमच्या इन्स्टीट्यूटमध्ये आंबेडकरवादी बुद्धीस्ट मंडळी नक्कीच भेटतील किंवा त्या मंडळीकडून तिथे गेलेल्या महार समाजाबद्दल काही समजू शकेल.

मंत्री म्हणाले, 'इन्स्टीट्यूट आता बंद असेल पण आपण गौतमला भेटू शकतो. चला तो तिथेच जवळच रहातो.' आमच्या बाकीच्या सोबत्यांना सोडून आम्ही दोघं त्या रस्त्याच्या कोपऱ्यावर वळलो. चालता चालता मी मंत्रींना विचारलं, गौतम कुठल्या भाषेत बोलतात इंग्रजी, क्रिओल की हिंदी - मराठीसुद्धा?

'अहो तो भारतातून गेलेल्यापैकीच एक मॉरिशियन आहे. तो इंग्रजीतच बोलेल. तो चिनी किंवा जपानी असता तर मात्र इंग्रजीत बोलेल की नाही हा प्रश्न होता.' मंत्री हसत म्हणाले.

का, चिनी आणि जपानी लोकांना इंग्रजीचं इतकं वावडं आहे? माझ्या या प्रश्नावर मंत्री म्हणाले, 'तुम्हाला याबाबतचा एक किस्सा सांगतो. एकदा मद्रासमध्ये एक इंटरनॅशनल कॉन्फरन्स भरली होती. त्या कॉन्फरन्सला जपानी संत हिरोजी उदयान यांचा एक शिष्य हजर होता. त्यानं आपलं भाषण जपानी भाषेतच केलं म्हणून त्याला दुभाष्याच्या मदतीनं विचारण्यात आलं की तुम्हाला इंग्रजी बोलता येत नाही का? त्यावर तो शिष्य म्हणाला, 'आमच्याकडे इंग्रजी फक्त हॉटेलमधले बटलर लोकच बोलतात...'

बघा, जपान्यांना आपल्या मातृभाषेबद्दल केवढा अभिमान! ... खरं तर हा किस्सा तुम्ही जागतिक मराठी परिषदेतच सांगायला हवा होता - मी म्हटलं. मंत्री नुसतं हसले.

बोलत बोलत आम्ही एका सिमेंटच्या पत्र्याच छप्पर असलेल्या लहानशा आडव्या

बांध्याच्या घरासमोर आलो. त्या घरावर 'द बुद्धीस्ट सोसायटी' असा इंग्रजीत लहानसा बोर्ड होता नी दाराला कुलूप. 'ही गौतमची संस्था. इथे मेडिटेशनचे क्लासेस चालतात....' मंत्री म्हणाले नी आम्ही पुढच्या गल्लीत शिरलो.

एका मोठ्या लोखंडी फाटकापलिकडे एक सिमेंट क्रॉंक्रीटचं टुमदार बैठं घर होतं. पुढच्या बाजूला गॅरेजमध्ये पांढरी मर्सीडिज कार उभी होती. घरादाराचा एकूण चेहरामोहरा काही बुद्धीस्ट फिलॉसॉफीत बसणारा दिसत नव्हता.

आमचा पायरव ऐकताच दारात बांधलेल्या उंच दांगड्या अल्सेशियन कुत्र्याने जोरदार भुंकून आमचं स्वागत केलं. तेवढ्यात आतून उंच तगडे पण प्रसन्न व्यक्तीमत्त्वातले घराचे यज़मान बाहेर आले. हाताशी तीन चार वर्षाची दोन मुलं नी खांद्यावरून डोकावणारा बायकोचा चेहरा असे सहकुटूंब दारात ठाकले. मंत्रींना बघताच तोंडभर हसून इंग्रजीतच म्हणाले, ''या.. या तुमचे स्वागत असो.' ते गौतम होते.

मंत्र्यांनी माझी ओळख करून दिली आणि आम्ही आत गेलो. आत दारंखिडक्यांना चिकनचे झुळझुळीत पडदे लावलेले होते. हॉलमध्ये मऊ मऊ लालभडक रंगाचे सोफ्याचे दोन जोड होते त्यावर गुलाबी कव्हरं होती, पण मुलांनी ती विस्कटून टाकली होती. ती सारखी करत गौतम आमच्याशी बोलत होते. ते आपल्या संस्थेबद्दल सांगत होते - आम्ही एक चॅरिटी स्कीम राबवतो. म्हणजे आमच्या संस्थेचे बरेच कार्यकर्ते आहेत ते सर्वत्र फिरतात आणि अपंग, विधवा आणि मदतीची गरज असणाऱ्या सर्वापर्यंत पोहोचून त्यांची माहिती आणतात. मग संस्थेतर्फे त्यांना तांदूळ, पीठ, साखर, तेल, चहा, साबण, कपडे, औषध वगैरे पुरवलं जातं. याखेरीज लोकांना आम्ही मानसिक भावनिक सहकार्य करतो. काही धंदा उपलब्ध करून देतो.

गौतम एकीकडे हे सांगत होते आणि दुसरीकडे त्यांच्या संस्थेला आम्ही किती मदत देऊन शकतो हेही चाचपून पहात होते. त्यासाठी त्यांनी आमच्या हातात सरबताबरोबर 'चॅरिटी स्कीम कॉन्ट्रीब्यूशनचे फॉर्मही' ठेवले होते. अर्थात नंतर आम्ही ते बोलता बोलता सरबताच्या ग्लासाबरोबरच बाजूला ठेवले ही गोष्ट वेगळी.

मध्येच मी गौतमचा अंदाज घेत म्हटलं, मीही बुद्धीस्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला १९५६ साली बौद्ध धम्म दिला. तुम्ही बुद्धीस्ट कधीपासून झालात? आंबेडकरांचं नाव ऐकताच कपाळाला किंचीत आठ्या घालून गौतम म्हणाले, 'यसयस आय नो दॅट...' नी मग ते जरा उंच आवाजात गौतमबुद्धाचा निरीश्वरवाद, अहिंसा, आर्य अष्टांगिक मार्ग यावर बोलत राहिले.


त्या उंच आवाजातील बोलण्याने त्यांनी माझ्या प्रश्नाला बगल दिली असं वाटून मध्ये

बोलण्याची संधी मिळताच मी सरळच विचारलं की, बुद्ध धम्मात दोन पंथ आहेत हीनयांन नी महायान. मग तुमचा पंथ कोणता, हीनयान की महायान?

यावर गौतम एकाएकी गंभीर झाले आणि मग आपण गंभीर झालो आहोत हे लक्षात येऊन एकदम हसल्यासारखं करत रिलॅक्स होत म्हणाले मला पंथबिंथ मान्य नाहीत. मी फक्त बुद्धाला मानतो. ही इज ग्रेट. माझ्या घरात बुद्धाचा एक आकर्षक पुतळा आहे. चला दाखवतो. आत या, असं म्हणून ते उठले त्याच्यापाठोपाठ आम्हीही उठून आत गेलो.

ती खोली देवघर या सदरात मोडावी अशी लहानशीच होती दिव्याचा प्रकाशही समईच्या उजेडाइतकाच मंद होता नी त्या मंद प्रकाशात मी पहात होते. फूट दीडफूट उंचीची बुद्धाची पितळी मूर्ती एका टेबलावर ठेवलेली होती. मूर्तीच्या आजूबाजूला कृष्ण गणपती, लक्ष्मी अशा देवी देवतांच्याही लहान लहान सुबक मूर्त्या आणि पाठीमागे त्यांचेच लहान मोठे फोटो मांडलेले होते. त्यांना छानपैकी हळदकुंकू, गंध आणि फुलं वाहिलेली होती. अगदी बुद्धालासुद्धा, निरांजन, उदबत्तीस्टँड, धूपदान, चंदन उगाळायची सहाण वगैरे साहित्यही होतंच.

गौतमांचा तो भरगच्च देव्हारापाहून आमच्या हिंदुत्ववादी नवबौद्धांच्या घराची मला अगदी तीव्रतेने आठवण झाली क्षणभर मी भारतातच असल्यासारखं वाटलं. अखेर 'चला निघूया' या मंत्रीच्या शब्दांनी मी भानावर आले आणि एवढ्या बाबतीत तरी गौतमच्यात आणि आम्हा नवबौद्धांच्यात साम्य आहे, याबद्दल नेमकी कोणती भावना मनात येऊन परतावं हा संभ्रम घेऊनच मी तिथून परतले.



सकाळी उठल्यापासून एखाद्या गाण्यासारखं आशाचं चाललं होतं ''आज मे डे आहे, मे डे आहे.'' मे डे म्हणजे मे महिन्याची पहिली तारीख, त्या निमित्ताने गांधी मेमोरियलमध्ये मोठा समारंभ साजरा होणार होता. तिथेच नव्हे तर तो दिवस संपूर्ण जगभर अतिशय महत्त्वपूर्ण दिवस म्हणून साजरा केला जात होता.

'महाराष्ट्र दिन' म्हणून आम्ही हा दिवस महाराष्ट्रात साजरा करतो या दिवशी सुट्टीही असते. भल्या पहाटेपासून जाग येते ती लाऊडस्पीकरवरच्या तुताऱ्या - कुकाऱ्यांनी, पोवाड्यांच्या गगनभेदी सुरांनी. नी मग दिवसभर कुठेकुठे सामुदायिक, सांस्कृतिक कार्यक्रम व्याख्याने, प्रदर्शने असं काही ना काही चाललेलं असतं. पण हा 'महाराष्ट्र डे' मॉरिशसमध्येच नव्हे तर संपुर्ण जगभर साजरा केला जातो हे ऐकून माझ्या मनात महाराष्ट्राविषयीचा आदर दुणावला. मला जाणून घ्यायचं होतं की, या दिवशी संपूर्ण जगात तुताऱ्या कोण फुंकतात, पोवाडे वगैरे कोण, कसे गातात... पण त्या दिवशी नेहमीपेक्षा झटपट आवरून आम्हाला निघायच होतं त्यामुळे बोलत बसायला वेळ नव्हता.

तयार होऊन आम्ही खाली आलो तर चंद्रसेन बापूची दहाबारा वर्षांची दोन मुलं योगेश नी अंजली गाडीत बसून आमच्याकडे टुकूटुकू पहात होती. चंद्रसेन म्हणाला, 'आज मे डे आहे ना, सुट्टीचा दिवस. सुट्टीच्या दिवशी मॉरिशियन माणसं घरात दिसणार नाहीत तुम्हाला.''

''अच्छा, म्हणून ही मंडळी आली आहेत होय! मग यांची आई कुठाय?'' मी विचारलं.

"तिची तब्येत जरा ठीक नाही, नाही तर ती राहिली नसती" असं म्हणत चंद्रसेननं गाडी सुरू केली. आणखी काही अंतरावर गेल्यावर आणखी दोन व्यक्ती आमच्या गाडीत आल्या त्यापैकी एक होते मिठीबाई कॉलेजचे प्राध्यापक पाटील नी दुसरे क्रिकेटपटू विजय हजारे. आता आमचा चांगला दहाबारा जणांचा गोतावळा झाला होता नी तो घेऊन आमची गाडी 'थ्रूबीच'कडे होडीसारखी सरसर निघाली. तिथे ग्लास बॉटम बोटीतून समुद्रतळ पहायचा होता.

आमच्याबरोबर विजय हजारेंना पाहून त्यांना खेळांबाबत काही प्रश्न विचारण्याची उर्मी सहाजिकच मला स्वस्थ बसू देत नव्हती. इथल्या क्रिकेटविषयी विचारण्यात अर्थ नव्हता. इथे ठोकलेला चौकार थेट समुद्रातच जाणार असं काहीतरी अलकानं सांगितलेलं धावपट्टूच्या विनोदासारखं उत्तर मिळालं असतं. पण तेवढ्यात एका फूटबॉलच्या मैदानाजवळूनच आमची गाडी पास झाली अन् मैदानात खेळणाऱ्या मुलांकडे पहात हजारे म्हणाले, "फूटबॉल हा खेळ इथे फार लोकप्रिय आहे. हा इथला राष्ट्रीय खेळ आहे असं म्हटलं तरी चालेल! काय चंद्रसेन?..."

चंद्रसेननं होकारार्थी मान हलवली. चंद्रसेननी मुलं मग आपण लंगडी, लगोरी, गोट्या असले खेळही कसे खेळतो ते उत्साहानं सांगत होती. मात्र क्रिकेटविषयी कुणी बोललं नाही. बोलत बोलत आम्ही थ्रूबीचवर येऊन पोहोचलो. तिथल्या समुद्राच्या काठावरची लालभडक पोवळ्यासारखी माती, तिला लागून पांढऱ्याशुभ्र वाळूचा पट्टा नी तो संपताच तिथून क्षितीजापर्यंत पसरलेलं समुद्राचं निळं हिरवं पाणी... धरित्रीनं आपला भिजलेला रंगीबेरंगी पदरच उन्हात सुकायला टाकल्यासारखं दिसत होतं नी त्या पदरावर मधूनच एखाद दुसरी होडी लहानशा कीटकासारखी इकडून तिकडे मजेने फिरत होती.

काठावर डुबक्या घेत असलेल्या एका लहानशा बोटीशी फेल्ट हॅट घातलेले दोनतीन गृहस्थ उभे होते. त्यांच्याशी बोलून चंद्रसेननं प्रत्येकी तीस रुपये प्रमाणे आमची तिकीट काढली. ओचे पदर सावरून आम्ही त्या बोटीत चढलो नि बघता बघता काठावर डुबक्या घेणारी ती बोट पाण्यावर सरसर धावू लागली. लाटांवरनं उशा घेत आंत शिरू लागली.

बोटीच्या काठानं बसायला सीट्स होत्या नी मध्यभागी साधारण अडीच बाय सहाचा चौकोन होता. त्या चौकोनाच्या तळाशी पारदर्शक काच लावलेली होती. त्या काचेतून भरभर सरकणारी पांढरीशुभ्र वाळू नी निवळशंख पाणी आम्ही वाकून टक लावून पाहू लागलो. हळूहळू समुद्राचं स्वच्छ पाणी गढूळ होऊ लागलं नी त्यात शेवाळ दिसू लागलं. त्या शेवाळात मधूनच दोडक्यासारखे, पडवळासारखे हिरवट पोपटी प्राणी वळवळताना दिसत होते. ते प्राणी की शेवाळाचा गुंता यावर थोडासा वाद झाला. गोखलेंनी सांगितलं की ते शेवाळावर जगणारे प्राणीच आहेत.

सुमारे फर्लांगभराचा गढूळ पाण्याचा तो पट्टा ओलांडून बोट जसजशी आत गेली तसतसं पाणी निवळलं नी ते अधिकाधिक स्वच्छ आणि खोल होत गेलं. आत कोरल्सचे (प्रवाळाचे) पांढरेशुभ्र पुंजके दसू लागले. आता समुद्रात मोठमोठे मासे, त्यांच्या झुंडी आपल्याला दिसतील असं वाटलं होतं. पण प्रत्यक्षात मात्र एखाद दुसरा मोठा रंगीत मासा त्या पुंजक्याच्या टोकांमध्ये रहाणाऱ्या प्राण्यांची शिकार करत इकडे तिकडे भटकतांना दिसे. निळया पिवळया किंवा गुलाबी रंगाच्या बारीक माशांची मात्र लहानशी झुंड मधूनच लखलखून जायची, अल्पसंख्यांकांसारखे ते मासे गटागटानंच दिसायचे. मात्र आपल्याकडचे बांगडे, मांदेली, तारली किंवा सरंगा, पापलेट, सुरमय असले मासे औषधालाही दिसले नाहीत. लाव्हारसापासून निघणाऱ्या विशिष्ट वासाची त्यांनाही ॲलर्जी असावी.

''इकोप्लास'च्या समुद्र किनाऱ्यावर गोळा केलेल्या कवड्या, खुब्या, शंख आणि कवचांचे अनेक रहिवाशी इथे आपलं बिऱ्हाड पाठीवर घेऊन समुद्राच्या तळाशी सुखेनैव फिरताना दिसले, बराचवेळ आमची बोट समुद्रात ठराविक अंतरावर गोलाकार फिरत होती नी अनेक तऱ्हेचे शोभेचे बॉटर टँकच पहात आहोत असं वाटत होतं.

समुद्राचा तळ पाहून आम्ही परत फिरलो. पुळणीत पाऊल ठेवताच प्लॅस्टिकच्या लहान लहान डब्यात विविध आकारांची लालभडक पोवळी घेऊन दोन-तीन स्त्री-पुरूष पुढे आले. पैलू न पाडलेल्या किंवा न तासलेल्या वाकड्या तिकड्या कशाही आकाराच्या त्या पोवळय़ांचा रंगच तेवढा आकर्षक होता. त्यामुळे दुरूनच त्या मंडळींना टाळून आम्ही काठावरच्या सुरूच्या बनात शिरलो. आता भूकही सपाटून लागली होती. चंद्रसेननं सोबत आणलेली शिदोरी सोडून ब्रेड आणि अंड्याची भाजी कागदी प्लेटस् मधून खाऊ लागलो.

उघड्यावर जेवताना आपल्याकडे कावळयांना हाकलायला वारंवार हात पाखडावा लागतो तसं इथे करावं लागत नव्हतं, कारण मॉरिशसमध्ये कावळे नाहीत. खाऊन झाल्यावर हातातल्या प्लेडस् कागदाचे बोळे तिथेच फेकायला हात शिवशिवले. पण तेव्हाच लक्षात आलं की असा कचरा तिथे कुणीच इथे-तिथे फेकत नाही. त्यासाठी जवळच एका झाडाखाली प्लॅस्टिकच्या कुंड्या ठेवलेल्या होत्या. तिथपर्यंत जाणं भागच होतं.

जेवण उरकून आम्ही कासेला बर्ड पार्क पहायला मोर्चा वळवला. मी म्हटलं, 'मी असं ऐकलं होतं की इथले पक्षी उडत नाहीत ते चालतात. हे खरं काय? यावर पांढरीपांडे म्हणाले, ''अहो, तो काळ इथे मनुष्यवस्ती नव्हती तेव्हाचा. पण माणूस इथे आला नी त्यांनी इथला डोडो नावाचा बदकापेक्षा मोठ्या आकाराचा नी पांढऱ्याशुभ्र रंगाचा पक्षी खाऊन संपवला. विशेषत: डचांनी तो नष्ट केला. तो पक्षी आजही मॉरिससचा राष्ट्रीय पक्षी म्हणून ओळखला जातो. तोच इथला एकमेव पक्षी होय.''

प्रा. पाटील म्हणाले, ''म्हणजे या पार्कमध्ये बाहेरच्या देशातून आणलेले विशेषत:

भारतातले पक्षी असणार, मग ते कशाला पहायचे, तेही प्रत्येकी चाळीस रुपये खर्चून?'' यावर सुधा गोखले म्हणाल्या, ''आमच्या मस्कतला शाम तुमटकर नावाच्या महाराष्ट्रीयन इंजीनियरने तिथला वालुकामय प्रदेशात समुद्राचं पाणी खेचून कारंजी तयार केली आहेत, प्लॅस्टीकची झाडं लावली आहेत. फायबर ग्लासचे वाघ, सिंह, जिराफ वगैरे प्राणी अगदी हुबेहुब तयार करून ते सर्वत्र ठेवले आहेत. तसे इथे फायबर ग्लासचेच पक्षी असतील बहुतेक.''

''मग ते काय पहायचे?'' आणखी कुणीतरी नाक उडवत म्हणालं, ''त्यापेक्षा आपण ग्रांबे येथील समुद्रावर जाऊ, तिथल्या नौकांच्या स्पर्धा पाहू किंवा 'बेलमार' व 'पालमार' नावाच्या आवळया जावळया समुद्र किनाऱ्यावर जाऊ. तिथलं पाणी गंगेच्या पाण्यासारखं पवित्र मानतात. बेलमारच्या किनाऱ्यावर गंगापूजनही होतं वगैरे ऐकलंय, तिथं जाऊ या.''

त्या बोलण्यातले 'बेलमार' आणि 'पालमार' हे शब्द माझ्या मनात फार ठसले. कारण आमच्या कोकणात बेलमहार आणि पानमहार अशा महारांच्या दोन जाती आहेत. कोकणातून मॉरिशसमध्ये आलेल्या जातींमध्ये महार मोठ्या संख्येने होते. त्यांच्या 'बेल' आणि 'पान' अशा जातींवरून तर या बीचेसना ही नावं पडली नसतील?

मॉरिशसची व्युत्पत्ती सांगताना अशी एक कथा सांगितली जाते की, सोन्याचा मृग होऊन सीतेचं हरण करायला रावणाला मदत करणाऱ्या मारीच राक्षसाचा वध रामाने केला आणि नंतर मारीचाला रामाचा हस्तस्पर्श होताच त्याचा मोती झाला. तो मोती रामानं दक्षिण दिशेला 'सागरात' भिरकावला. सागरात त्या मोत्याने आपले मूळ राक्षसी रूप धारण केलं. हे राक्षसीरूप म्हणजेच आजचं मॉरिशस होय. असं जर असू शकतं तर महारांच्या जाती वरूनच किनाऱ्यांना बेलमार, पालमार अशी नावं पडायला काहीच हरकत नव्हती.

अशा संशोधनात्मक विचारांच्या गुंत्यात मी गुरफटले असतानाच आमची गाडी 'कासेला बडपार्क'च्या दिशेनं निघाली. कारण ते ठिकाण इतर ठिकाणाहून जवळच होतं. कदाचित आमच्याकडचा कावळा इथे पिंजऱ्यात कसा दिसत असेल हे बघण्याची उत्सुकता मंडळींना वाटली असावी.

प्रत्येकी चाळीस रुपये तिकीट काढून चक्राकार दरवाजातून आम्ही आत गेलो. आतल्या बाजूला लहानशा पिंजऱ्यामध्ये कावळा नाही पण आमच्याकडच्या खूपशा चिमण्या मात्र चिवचिवाट करताना दिसल्या. सकाळी टेलिफोनच्या तारेवर रांगेत बसून 'व्हीकी' 'व्हीकी' असा गोड साद देत ऊन खात बसणारे कोतवाल पक्षी पिंजऱ्याच्या लहानशा दांडीवर शेपटीच्या टोकाची पिसं थरकवत कसेबसे तोल सांभाळत होते. त्यांच्याच जोडीला टीटिरी...टिटिरी... अशा स्वरांच्या तोन पट्ट्यात गाणारे, तुरूतुरू चालणारे, काळ्या

कांतीवर दही सांडल्यासारखे ठिपके असलेले दयाळ पक्षी, निळ्या कंठाचे राघू, काळ्या पाठीचे पांढऱ्या पोटाचे नी डोक्यावर दबलेली टोपी घातलेले, मान वेळावत, गिरक्या घेत, प्रणयाराधन करणारे बुलबुल असे कितीतरी पक्षी आपलं गाणं नी लडिवाळ चाळे सारं इतिहासजमा करून खुडुक होऊन बसले होते, तर लवकरच आपला पिसारा झडून लांडोरीत जमा होणार हे दुःख उरात घेऊन की काय मोठ्या पिंजऱ्याच्या कोपऱ्यात दोन मोर परस्परांचं सात्वन करत होते.

बदकं आणि कबुतरं मात्र तेजीत होती. ठुमकत ठुमकत आपल्याच नादात हिंडत होती. खरंतर मातकट रंगाचे लहान पक्षी छान गातात नी रंगीत पक्षी रंगानंच सर्वांच लक्ष वेधून घेतात. पण पक्ष्यांचं हे वैशिष्ट्य बराचवेळ फिरूनही तिथे जाणवत नव्हतं. तिथले चाळीस रुपये म्हणेज आमच्याकडचे किती कुणास ठाऊक पण फुकट गेल्याच दुःख मात्र प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

बर्ड पार्कमधून परतता परतता एका बाजूला नरेश मंत्री वर मान करून कॅमेरा नाकाला भिडवून फोटो काढण्यात गर्क असलेले दिसले आणि मी तिकडे मोर्चा वळवला, त्या बाजूला उंचावर झाडाच्या आडव्या फांदीसारख्या दांडीवर चांगले दोन अडीच फूट उंचीचे पोपटाच्या आकाराचे काकाकुवे बसले होते. काहींची पोट पिवळी नी पाठीमागे कोट घातल्यासारखे लाल पंख, काहींची निळी पोटं नी पिवळे कोट, तर काहींची अशीच रंगसंगती असलेले ते काकाकुवे आफ्रिकेतून आणलेले होते. आपली मोठी पांढरी, काळी चोच मागे ओढून 'या नश्वर जगाला क्षमा असो' असा भाव एकूण दर्शनात ठेवून शांत निश्चल दिसत होते. त्या पक्ष्यांचे आकर्षक रंग त्यांच्या निर्विकार वृत्तीशी विसंगत होते नी त्यामुळे की काय ते पक्षी कधीच विसरता येणार नाहीत असं वाटतं होतं. पिंजऱ्याभोवती फिरणाऱ्या मंत्र्यांना मी म्हटलं - "या पक्ष्यांचा एखादा फोटो मलाही द्याल? आठवण म्हणून."

"हो हो, नक्कीच. पण तो जपानहून पाठवीन तुम्हाला. चालेल?" मंत्री वळून पहात म्हणाले.

'हो चालेल' अस म्हणत मी त्यांना विचारलं, 'तुम्हाला पक्षांच्या विषयात बराच रस आहे की, फोटोग्राफीचा छंद?"

"छे ... तसा छंद बिंद काही नाही. हे फोटो माझ्या मैत्रिणीला दाखवायला हवे आहेत. ती येऊ शकली नाही म्हणून मी जे पाहिलं ते या फोटोतून ती बघेल," मंत्रींचा आवाज जडावल्यासारखा वाटला. 'मैत्रिण म्हणजे... परिषदेत जिचा उल्लेख झाला तीच का?' मी विचारलं. "हो तीच. ती नेहमी आजारीच असते-कंप्लीट बेडवर ... तिचं सारं करावं लागतं" असं म्हणून नरेश मंत्री वेगळ्या दिशेने फोटो काढायला वळले. ते

ऐकून माझं मन कळवळलं ... अरेरे परिषदेत मात्र किती 'वेगळ्या अँगलने त्यांच्या संबंधाकडे पाहिलं आम्ही सर्वांनी... मी तो विषय तिथेच सोडला. पण दांडीवर स्थिर निश्चल बसलेले ते पक्षी आणि आजारी प्रेयसीवर उत्कट प्रेम करणारे, तिची सेवा करणारे मंत्री या दोघांमधली एकतानता सारखीच वाटली मला.

बर्डपार्कमधून आम्ही बाहेर पडलो ते थेट महात्मा गांधी मेमोरियल वर येऊन थडकलो. मेमोरियलचा हॉल माणसांनी नुसता ओसंडत होता. हॉलमध्ये पाऊल ठेवायला जागा नव्हतीच, शिवाय बाहेरचा पॅसेज नी वरच्या गॅलऱ्याही माणसांनी फुलून गेल्या होत्या त्या गर्दीत आम्ही परिषदवाले म्हणून आमचे लाड करणारं कुणीच नव्हतं. म्हणजे तिथले स्वयंसेवकही आमच्याकडे ढुंकून पहात नव्हते अर्थात आम्हाला त्याचं काही वाटलं नाही.' महाराष्ट्रडे महाराष्ट्रबाहेर इतक्या उत्साहाने साजरा होतोय याचाच आनंद मोठा होता. माझ्या मनात महाराष्ट्राविषयीच्या आदराला भरतीच आली.

गर्दीतून वाट काढत आम्ही आत गेलो. आत स्टेजवर वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा नुसता दणका उडाला होता. आमच्या शाहीर साबळे आणि "पार्टीच्या" गाडी आणा बुरख्याची, बुरख्याची दोन चाकी..." या लावणीवर तर आत प्रेक्षकांनी नी बाहेर श्रोत्यांनी टाळ्या वाजवत छान ठेका धरला होता. तेवढ्यात परिषदेपैकी कुणीतरी म्हणाल, "आज मे डे आहे ना, कामगार दिन ... म्हणून मॉरिशसमधले झाडून सारे कामगार इथे जमले आहेत. इथे आपलं काय काम? चला आपण बाहेरच थांबू."

अरेंच्या, खरंच की, आज 'कामगार दिन,' 'मे डे.' नुसताच महाराष्ट्र डे नव्हे. जागतिक कामगार दिन ... पण भारतात विशेषतः महाराष्ट्रात रहात असल्याने आपल्याला महाराष्ट्रीयन म्हणूनच या दिवसाचं महत्व वाटत होतं नी कामगार म्हणून या दिवसाची किंवा असं एकत्र येण्याची, एकजुटीची कधी आठवणच झाली नव्हती. चला, परिषदेच्या निमित्तानं का होईना, आपण सर्व कामगारांमध्ये उभे आहोत हे फार चांगलं झालं. फारच छान. अचानक माझ्या अंगातलं लाल रक्त सळसळायला लागलं नी मला खच्चून ओरडावंसं वाटलं - कामगारांचा विजय असो !!!

त्या दिवशीच परिषदेतील आम्हा सर्व मंडळींना रामधन नावाच्या एका बड्या व्यापाऱ्याकडे डिनर होता. आतापर्यंत बड्या हॉटेलमध्येच जेवलो होतो. पण कुणाच्या घरी पाहुणचार झाला नव्हता तो होणार होता. त्यातून रामधन हे भारतीय, त्यामुळे ते कसे राहतात, काय खातात, काय पितात, काय करतात असे घरगुती प्रश्न मनात घेऊन रात्री आठच्या सुमारास रामधनांच्या बंगल्यावर पोहचलो.

बंगला तसा मिनीच होता आणि तोही माणसांनी भरून गेला होता. परिषदेची बरीचशी माणसं जेवायला होती नी अपेक्षेहून जास्त माणसं आल्यामुळे यजमान गांगरले असावेत. मला वाटतं ते स्वयंपाकगृहातच पाहुण्यांच्या पोटापाण्याची काळजी घेत होते. जो तो आल्या आल्या पहिला प्रश्न विचारत होता- रामधन कोण?

जेवायला भात, वरण, भाजी नी कोंबडीचा रस्सा असा आपल्याकडचा रविवारचा मेनू होता. अधिक म्हणून जेवणानंतर आईस्क्रीम होतं इतकंच ते जेवण आम्हाला खूप आवडलं. अगदी घरच्या सारखं वाटलं.

आमच्या शेजारी वर्षा उसगावकर, नितीश भारद्वाज नी शाहीर साबळ्यांचा नातू केदार होता. खाता, खाता केदारच्या अंगावर आईस्क्रीमची प्लेट उपडी झाली नि तो दादा कोंडके टाईप चेहरा करून इकडे तिकडे पाहू लागला. ते पाहून वर्षाची हसून हसून मुरकुंडी वळली. आईस्क्रीम पुसायला मी केदारला मदत केली नी त्याला बाथरूमपर्यंत पोहोचवलं.

जेवण आटोपून तिथे जमलेल्यांचे निरोप घेऊन आम्ही निघालो. रस्त्यावर आलो नि

चर्चा सुरू झाली. रामधन कोण? अमुक की तमुक? तिथून निघालो तरी आम्हाला घरमालकाचा पत्ता लागला नाही.

मला त्या बोलण्यात रस वाटत नव्हता. दिवसभराच्या थकव्याने पेंग आली होती. तरीही विषय बदलत मी म्हटलं, ते जाऊ दे, पण त्याचं बाथरूम काय छान आहे. बाथरूमभर मोठ्ठे आरसे आहेत ...! यावर सुधा गोखले नाक मुरडत म्हणाल्या, "ऊं नुसते आरसेच होते ना... त्याचं काय एवढं कौतुक करतेस? अगं आमच्या मस्कतच्या तेल व्यापाऱ्यांच्या घराच्या भिंती सोन्याचा चुरा रंगात मिसळून रंगवलेल्या आहेत."

"काय, सोन्याचा चुरा?"

"हो हो... इतकंच नव्हे तर तिथल्या सुलतानाच्या बाथरूममध्ये सोन्याचं वाशबेसीन नी कमोड सुद्धा सोन्याचा आहे..."

ते ऐकून माझ्या डोळ्यावरची झोप खाडकन उडाली " हेहे म्हणजे फार झालं हं ...." माझ्या सारखच कुणी तरी जागं होत म्हणाल. एक मात्र झालं बोलण्याचा ट्रॅक रामधन कडून सुलतानाकडे वळवला, त्यावर बोलत बोलत हॉटेल आलं तरी सोन्याचा धूर डोळ्यांवरून उतरला नाही.

सकाळी नेरूरकर दांपत्य मला न्यायला येणार होते त्यामुळे आल्या आल्या मी माझे कपडे गोळा करून बॅगेत ठेवले. टेबलावर ठेवलेली शंख शिंपल्यांची पिशवी त्यातले कोरल्सचे तुकडे, कवचं फुटू नयेत म्हणून काळजीपूर्वक साडीत गुंडाळून ठेवली. उद्या मी जणू सासरीच जाणार होते अशा नजरेने आशा माझ्याकडे पाहात होती. ती पटकन उठली नि कपाटातून दागिन्यांची पेटी काढून दाखवावी तशी आपली पिशवी उचलून तिच्यातले शंखशिंपले दाखवत म्हणाली, "तुला यातलं हवंय का काही?" मी मानेनेच नको म्हटलं, वाटलं ह्या कवचं नि कवड्यां इतकंतरी मोल त्या वॉशबेसीन नी कमोडच्या सोन्याला होतं का?

सकाळी चहासाठी आम्ही खाली आलो तर पाठीमागच्या इमारतीत खाली हॉलमध्ये शाहीर साबळे आणि पार्टीची मंडळी दाटीवाटीत उभी होती नि जिन्याशी उभे राहून शीलाबाय बापू त्या मंडळीसमोर मराठीत बोलत होत्या. पार्टीने खेड्यापाड्यात फिरून मराठी भाषेचे सांस्कृतिक दर्शन तिथल्या माणसांनाही देण्याचे फार मोठे कार्य केले होते, त्याबद्दल त्यांनी त्या कलावंताचे आभार मानले. त्यांना प्रत्येकी पाचशे रुपयांच्या भेटवस्तू दिल्या नी त्यांच्यासह आमचा सर्वांचा निरोप घेऊन गेल्या.

थोड्या वेळानं एका काळया सावळया मध्यम वयीन माणसासह नेरूरकर सर हॉटेलात आले. त्यांच्या बरोबरच्या गृहस्थाचे नाव होते पंडीत धर्मवीर धुरा नि ते मॉरिशस रेडियोवर

काम करत होते. त्यांना साहित्यिकांच्या मुलाखती हव्या होत्या. माझे सर्व सहकारी त्यांच्याशी गप्पा मारत बसले. मी रुमवर जाऊन माझी बॅग खाली आणली नि मग सर्वांचा निरोप घेऊन निघाले त्यावेळी परदेशात थोड्याशा सहवासानेही स्नेहाचे धागे किती चिवट होऊ शकतात. त्यांची प्रचीती आली. नाही म्हटलं तरी डोळ्यात पाणीही आलंच.

मी सरांना विचारलं, आता कुणाच्या घरी जाणार आहोत आपण? सर म्हणाले, 'मिस्टर भूगन यांच्या घरी. ते शाळा मास्तर आहेत.'

माझ्या डोळ्यासमोर आपल्या कडचा शाळामास्तर उभा राहिला. एखाद्या भाड्याच्या खोलीत राहणारा... एखाद्या स्टोव्हच्या आधारानं पोराबाळांच्या लेंढारासह कसाबसा संसाराचा गाडा ओढणारा... मला बरं वाटलं. म्हटलं, चला आता आपल्याला इथला सामान्य माणूस पहायला मिळेल. मी मुलाखतीसाठी पेपर आणि पेन सज्ज ठेवलं,

आम्ही रस्त्यावर आलो. मि. घुरांनी एका पॉश अँबॅसिडर गाडीला हात उंचावला नी ती सरसरत आमच्यासमोर येऊन थांबली. मी विचारलं, ही कुणाची गाडी?

सर म्हणाले, "ही टॅक्सी आहे."

टॅक्सी? अशी प्रायव्हेट गाडीसारखी ? मग ही ओळखायची कशी?

"तिच्या नंबर प्लेटवरून - पांढऱ्यावर काळे आकडे असले की ती टॅक्सी" सर म्हणाले. हे बोलणं संपतय तेवढ्यात आमची टॅक्सी एका सिमेंट काँक्रीटच्या टुमदार दुमजली घरासमोर थांबली. फाटकाचा आवाज होताच आपलं केवळ अस्तित्व दाखवावं इतक्या बेतानेच कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. फाटकाच्या आत गुलाब, सोनटक्का , पिवळ्या-जांभळ्या रंगाची कसली - कसली फुलझाडं आणि चिकू, पेरू, पपई, आंब्याची फळझाडं असलेलं आवार दिसलं. ते ओलांडून आम्ही आकर्षक रंगरंगोटीच्या, बाहेरून दारंखिडक्यांना काचेचं तावदान नी आतून लोखंडी चौकटी लावलेल्या भक्कम घरात शिरलो. हा भक्कमपणा चोरांऐवजी इथे होणाऱ्या वादळाला भिऊन केलेला.

घरातलं दृश्य एखाद्या ऑफिसरच्या घरासारखंच अपटूडेट, समोर मोठा सुबक हॉल, त्यात डबल सोफासेट, उंची टेबल लॅम्प, स्टिरिओ, टी.व्ही. बाजूला मोठं डायनिंग टेबल, खुर्च्या, क्रॉकरीच भलं मोठं काचेचं कपाट, जमिनीवर कोपऱ्यापर्यंत चकचकीत कार्पेट, आतल्या बाजुला दोन-तीन सुसज्ज बेडरूम्स, किचन, वरच्या मजल्यावरही तशाच खोल्या.

वाटलं हे दुसऱ्याच कुणाचं घर असेल. पण तेवढ्यात घराची मालकीण सौ. भगून बाहेर आली. तिचं नाव रूपवती. अंगानं स्थूल, वाटोळा चेहरा, अंगभर अठरा कॅरेट मोत्याचे दागिने, कानात भले मोठे लोंबते डुल. ते डुलवत, डुलवत ती जवळ आली. माझ्या दोन्ही गालांची फ्रेंच पद्धतीनं चुंबन घेऊन म्हणजे गालाला गाल लाऊन ती हेल

काढून हिंदीत बोलू लागली. तिचं हिंदी ऐकून नवल वाटलं. पंडीत धर्मवीर घूरांनी मग सरांना व मलाही काही साहित्यिक प्रश्न विचारले, टेप केले नी मग टेपरेकॉर्डर गळ्यांत अडकवून जाता जाता ते हिंदीत म्हणाले, "कल सुबह सुनिये रेडिओपर, अच्छा."

घूरा निघून गेले. मी रूपवती भूगनकडे वळले. ती सांगू लागली ...

"हम बिहारी हैं. बिहारसे आये हैं बस्स इतनाही जानते हैं हमारे वो इस्कूल गयें है. शामको देरीसे आते हैं. ट्यूशन करते है ना. हमारे तीन बच्चे है. उनकी पढाई लिखाई ..."

"बस्स तीनही बच्चे है, आपके?" माझा प्रश्न.

"हाँ, नही तो हमे गव्हर्नमेंटको टॅक्स भरना पडेगा ना." असं म्हणून रुपवती तिथल्या फॅमिली प्लॅनिंग विषयी सांगत राहिली. लोकसंख्या फार वाढू नये म्हणून मॉरिशस सरकार फार कटाक्षानं लक्ष देतं. तीन मुलांपर्यंत प्रत्येक मुलाचा भत्ता मिळतो. चवथ्याचा कर भरावा लागतो. जास्त मुलं इथं परवडत नाहीत. "यहा महेंगाई बहुत है, खर्चा भी बहुत ..." रुपवती बोलत होती. तिथली महागाई आम्हालाही जाणवली होतीच. टॅक्सीचं कमीत कमी भाडं पंचवीस रुपये होतं. मनात येत होतं एक प्राथमिक शाळेचा शिक्षक एकट्याच्या पगारात ... फार तर ट्यूशन करून हे एवढ मोठं घर कसं काय चालवतोय; प्राथमिक पोरांच्या ट्यूशनचं असं काय मिळत असेल?

नुकत्याच झालेल्या ओळखीत हे विचारणं बरं नव्हे, बंधू कळेल ओघा-ओघानं, मनात म्हटलं. पण तळागाळाचा शोध घ्यायला निघालेलं माझं मन थोडंसं ख़ट्ट मात्र झालंच.

भूगन यांच्या घरी रात्रीच्या जेवणात टिनपॅक माशाची चटणी ब्रेड, बटर, कोका कोला, चीज असा साहेबी आहार काट्या चमच्याला हात न लावता हातानंच घेतला. जेवताना श्री. भूगन सांगत होते की, त्यांचे वाडवडील बिहार मधून व्यापारासाठी आले. ते इथे डाळ, चहा मसाले असं किरकोळ विकायचे. त्यांची थोडीशी शेतीही होती. आता ती भूगन यांचा भाऊ करतो. ऊसाचं पीक काढतो. श्री. भूगन मग बराच वेळ तिथल्या शाळा, तिथे शिकवले जाणारे विषय यावरच बोलत राहिले. भारतातून तिकडे गेलेल्या लोकांमध्ये आता बरेचसे लोक शिक्षक आहेत. ते इतर विषयांबरोबरच आपापल्या मातृभाषाही शिकवतात, वगैरे.

तिथला मराठी विषय घेऊन शिकणाऱ्या मुलांच्या सिलॅबसवर चर्चा करण्यासाठी नेरूरकर सरांना गांधी मेमोरियलमध्ये बोलावले होते. सर म्हणाले, उर्मिला तूही चल. आम्ही बसस्टॉपवर आलो. तिथले बसस्टॉप पॅगोडा पद्धतीनं बांधलेले आणि मोठे आकर्षक आहेत. बसमध्ये रांगेने चढण्या उतरण्याची त्यांची शिस्तही वाखाणण्यासारखी

आहे. आम्ही बसने निघालो. तिकडे बऱ्याचजणांचं स्वतःचे वाहन असल्यानं बसमध्ये गर्दी नव्हती. तिकीट कंडक्टरच्या हातात गोल पंचींग मशीन होतं नी त्याचं हॅन्डल फिरवून कागदाची लांब फीत तो प्रत्येकाच्या हातात ठेवत होता. दूरचा प्रवास असेल तर फीतही वाढत होती.

गांधी मेमोरियलच्या एका हॉलमध्ये अभिमन्यू अनथ नावाच्या मॉरिशसमधील मोठ्या लेखकाच्या 'मुडिया पहाड'. या नाटकाचं वाचन चाललं होत. आफ्रिकेतून महात्मा गांधी मॉरिशसमध्ये गेले व गोऱ्या जमीनदारांच्या छळाखाली भरडल्या गेलेल्या जनतेला त्यांनी चळवळीचा मंत्र दिला, त्यावर ते नाटक आधारलेले होते. मॉरिशमध्ये गांधीजींचा खुपच प्रभाव दिसला.

सिलॅबसवरच्या चर्चेसाठी तिथले वरेच शिक्षक उपस्थित होते. त्यात दयाबाय बाबाजी, धर्मा गोविंद, देवजी पडिया वगैरे मंडळींनी तिथला सिलॅबस बोजड आहे, असा प्रस्ताव मांडला आणि तो बरोबरही वाटला. तिथल्या दहावीच्या अभ्यासक्रमात विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' ही कादंबरी होती. ही कादंबरी मुंबई विद्यापीठात मात्र एम. ए. च्या अभ्यासक्रमात होती. अशाच तऱ्हेने संतसाहित्यही तिथल्या मुलांच्या डोक्यावरून जातं असा एकूण तक्रारीचा सूर होता. याबाबत काही बदल करणं आवश्यक आहे या मुद्यावर ती चर्चा थांबली. जागतिक मराठी परिषदेतर्फे भारतातून पाठवण्यात आलेली मराठी पुस्तकंही तिथल्या लायब्ररीत अद्याप जमा झालेली नाहीत हेही त्या मंडळींनी नजरेला आणून दिलं. माझी प्रकाशित पुस्तकं मी तिथल्या लायब्ररीला भेट दिली नी आम्ही उठलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी पंडीत घूरांनी दिलेल्या वेळेनुसार रेडिओ ऑन केला तर त्यावर आमच्या मुलाखतीऐवजी कोणत्या घरात कुणाचा मृत्यु झाला, त्याचा दहन किंवा दफन विधी कुठे, किती वाजता आहे, वगैरे बातम्या देणे चालू होतं.

आम्हाला दिलेली वेळ उलटून गेली तरी त्या बातम्या संपल्या नाहीत. अशी मरणोत्तर प्रसिद्धी तिथल्या सामान्य माणसालाही मिळालेली पाहून त्यांच्याही जगण्याला तिथे काहीतरी मोल आहे हे लक्षात आलं.

नंतर पंडीत घुरांनी कळवलं 'टेपरेकॉर्डर मधली बॅटरी डाऊन झाली होती त्यामुळे तुमचं बोलणं नीट टेप झालं नाही, सॉरी.' घूरांशी बोलून सरांनी फोन खाली ठेवला तेवढ्यात अगदी बाजूच्या घरातून सहज यावा तसा एक माणूस आला. कुठून आलात किती दिवस रहाणार वगैरे विचारू लागला नी मग त्याने हातातल्या पिशवीतून काही गोळ्या काढून आमच्या हातावर ठेवल्या नी म्हणाला घ्या; मिसेस भूगननी तत्परतेने पाणी आणून दिलं. तो तिथल्या हेल्थ सेंटरचा माणूस होता. आपल्याकडच्या देवी डॉक्टरसारखा दिसत होता. परदेशी पाहूण्यांपासून संसर्गजन्य किटाणू फैलाव नयेत याची

खबरदारी तिथे घेतली जाते.

त्या दिवशीच वाकवा इथे हिराबाई बाळू नावाच्या बाईकडे आम्ही म्हणजे नेरूरकर सर, त्यांची पत्नी आणि मी रात्रीच्या जेवणासाठी जाणार होतो. श्रीमती नेरूरकर म्हणाल्या "अग, ही बाई मराठी छान बोलते. इथे आठवड्याच्या बाजारात ती रस्त्याच्या कडेला कपडे विकते. फार मेहनती बाई आहे. तू हिला भेटच. हिचा नवरा ऊसाच्या मळयात कामाला होता, आता रिटायर झालाय. हिला एक सव्वीस सत्तावीस वर्षाची मुलगी आहे. जन्मापासून मुकी आहे, बुद्धीनेही कमीच. तिच्या लग्नाची हिराबायला खुप काळजी वाटते."

अरेरे, बिचारी खूप गांजलेली फेरीवाली दिसतेय़, मी म्हटलं, मनातून मात्र मला हवी तशी बाई मिळणार याचा आनंद वाटला. अर्थात तो फार काळ टिकला नाही. सर म्हणाले, संध्याकाळी तिचा मुलगा गाडी घेऊन आपल्याला न्यायला येईल.

कुणाची गाडी?

अर्थात हिराबाईची. तिचा मुलगा एका कंपनीत हिशोब तपासनीस आहे. सकाळी कामावर जाताना तो आईला बाजारात पोहोचवतो, संध्याकाळी परत घेऊन जातो. आता तो तिला घरी पोहोचवून आपल्याला न्यायला येईल.

अमेरिकेत घरकामवाल्या बायासुद्धा स्वतःच्या गाडीतून कामाला जातात त्यातलाच हा प्रकार... माझा चेहरा थोडा पडलाच. हिराबायचा मुलगा आपल्या पॉश गाडीतून आम्हाला आपल्या घरी घेऊन गेला. वीस पंचवीस वर्षाच्या अपटूडेट पोशाखातल्या त्या तरुणाचं नाव होतं शंकर, मराठी माणसांत असलेली आजोबा पणजोबांची नावं नातवापणतवांना ठेवायची पद्धत इथेही आहेच.

हिराबायचं घरही भूगन याच्या घरासारखंच. पक्क्या बांधणीचं सुसज्ज. आम्ही दारात येताच हिराबाय लगबगीनं बाहेर आली. गोरीशी, ठेंगणी, आडव्या बांध्याची हिराबाय गोल साडी नेसली होती. गळयात तीनचार पदरी मंगळसूत्र, कपाळाला मोठी लालभडक टिकली, हातात काचेच्या बांगड्या, पसरट चेहरा नि तोंडभर हसू.

पातळावर बांधलेल्या एप्रनला पिठाचे की कसले तरी हात पुसत ती म्हणाली, यवा, कसा काय बेस हायना? पुढे होऊन तिने आमचे दोघींचे मुके घेतले आणि मग आम्हाला पुढच्या हॉलमध्ये बसवून आमच्या समोर बिस्किटं, कोकाकोलाची भली थोरली बाटली ठेवून तिने कोपऱ्यातला टी. व्ही. ऑन केला. तेवढ्यात आतल्या खोलीतून संध्याकाळची प्रार्थना, देवपूजा आटोपून हिराबायचे पती लक्ष्मण बाळू बाहेर आले. उंच, शिडशिडीत, ठणठणीत तब्बेत, कपाळाला गंध ... हिराबाय कौतुकानं म्हणाली, हे देवाचं लय करतात. गणपती सुद्धा बसवतात. पयला आमी धा दिवसाचा गणपती बसवत हुतो,

नंतर पाच दिवसाचा, आता दिडच दिवसाचा ठेवताव. वेल नाऽऽऽय्.... असं म्हणून हिराबाय आम्हाला तिच्या पतीवर सोपवून घाईघाईनं आत जाऊ लागली. वही पेन संभाळत तिच्या पाठोपाठ आत जात मी म्हटलं, चला मीही आत येते.

"तुमी बसा. ह्यांच्याशी बोला. तौसर मी जेवनाचं बगतो" हिराबायच्या बोलण्यातल्या बेस, तौसर सारख्या कोकणातल्या शब्दांची मी मनातल्या मनात गाठ मारत होते. हिराबाय आमच्या पुढेच कपडे विकून घरी आली होती. जराही विश्रांती न घेता कामाला लागली होती.

मी मुद्दामच खोचक प्रश्न विचारला, तुमचे पती घरी असतात ते काय काय काम करतात?

"छ्या काय सुदा करीत नायत. हिकडची काडी तिकडं नाय. झाडूपन नाय, मारत. समदं मीच करतो. लय तरास व्हतो."

मग कामाला माणूस का ठेवत नाही?

"मिलत नाय, पगार मॉप घेतात. धुनं भांडं हजार रुपये."

तुमची मुलगी काय करते?

"मनात आला तर करते. हेरशी काय नाय. हां पन जमनीवर ब्रोशो फिरवते." ब्रोशो म्हणजे नारळ मधोमध कापून केलेला अर्ध्या नारळाचा ब्रश. तो पायात धरून त्याने लादी चकचकीत करतात. प्रत्येक मॉरिशीयनाच्या घरात ब्रोशो असतोच.

कुठाय ती, तुमची मुलगी? मी विचारलं.

"शेजारी पाचवीला गेल्याय, शेजारणीला मुलगी झाली."

तुम्ही पाचवी करता? आणि काय काय करता?

"बारसा पन करतो. मुलाला पालण्यात घालतो. नाव ठेवतो.

लग्नातलं पन सगलं करतो. नवरीला हळद मुंडावळ्या बांधनं, कन्यादान, पाचपरतावन, लग्नाचा मांडव घालतो, गाणी म्हणतो, " स्वयंपाक करता करता हिराबाय बोलत होती. काही गाणी म्हणा ना, त्याही परिस्थितीत मी आग्रह केला.

हिराबाय गद्यातच गाणी सांगू लागली.

"घाना जो भरीला इडा ज्यो ठेवीला गनपती देवाला, हे गानं आमी म्हणतो, काम करता करता मला हिराबाय गाणी सांगत होती. तेवढ्यात तिची मुलगी पचिवीच्या घुगऱ्या


खोबरं घेऊन आली. मराठी बोलण्याच्या ओघात हिराबाय तिला म्हणाली, ''अगं दार ढाप'' तो ढाप शब्दही अस्सल कोकणी. वाटलं, ही आपल्या शेजारचीच कुणीतरी. नक्कीच. खोदून विचारलं, तुम्ही कुठचे कोण?

हिराबाय म्हणाली ''ह्यांचे वाडवडील पुन्यातनं आले त्याला मॉप वर्षा झाली. माजी आय सांगायची, तिचा आजा कोकनातला. गाव कोन काय म्हायती नाय.'' आणखी काय काय सांगायची. मी मुद्दामच विचारलं, जातीविषयी वगैरे...

''काय हे उर्मिला, हे कसले प्रश्न विचारतेस?'' सर म्हणाले नि त्यांच्या या प्रश्नातच आमचा जुळत आलेला संवाद संपला.

वाकवात हिराबायच्या शेजारीच आणखी काही महाराष्ट्रीयन मंडळी रहातात. तिथे एखादी झोपडी, पत्र्याची शेड दिसेल म्हणून मी मोठ्या आशेने इकडे तिकडे पहात होते. पण तीही घरं तशीच. हिराबायच्या घरासमोर किराणा मालाचं किंवा तसलंच कसलं तरी दुकान. कुणाच्या घरासमोर नुसतंच मोकळं अंगण, त्यात तुळशीवृंदावन किंवा देवळाची लहानशी घुमटी. यामुळे एकाचा चेहरा मोहरा दुसऱ्यापेक्षा वेगळा होता इतकंच.





पुष्पाजी नारू हे मॉरिशसमधील कार्यकर्ते आणि नाट्यकलावंत, त्यांच्या भावाचं घर हिराबायच्या घराजवळच होतं. त्या घरात थंड पेयाचं दुकान आहे. ते दुकान पुष्पाजींची भावजय चालवते. वर्षभरापूर्वीच तिला वैधव्य आलं. ती दुकानात बसली होती. पुष्पाजींची वृद्ध आई येसुबाय नारू तिथंच होती.

येसुबायला विचारलं, तुमच वय काय. तर म्हणाल्या, चार कोडी चार, म्हणजे ८४ वर्षे. एक कोडी म्हणजे वीस. आपल्याकडे गोदीत सामानाची मोजणी अशीच कोडीच्या प्रमाणात करतात. हां तर येसूबायची गोल साडी बघून म्हटलं, तुम्ही असंच नेसता? त्या म्हणाल्या, "आदी कास्टी नेसत हुतो आता जड होते. तोलत नाय. पोरं म्हनतात झगा घाल पन सोबनार नाय."

स्वतःची माहिती देताना येसूबाय म्हणाली, माझ्या वडलाचं नाव भिवाजी राणे, ते कोकणातले. सासरा तुळजापुरचा. आमी खरे कदम आणि पूर्वापार भवानीची पूजा करतो, गोंधळ घालतो. माजा मालक त्याचा बाप कुनाकुनाच्या लग्नात गोंधळ घालायचे. म्हणजे तुम्ही गोंधळी, मी म्हटलं. "नाय, आमी मराटी" येसूबाय ठासून म्हणाली. मी मग पूर्वापार तुम्ही कामं काय करता असं धोरणा धोरणान काहीबाही विचारू लागले. येसूबाय म्हणाली, आमची खूप गुरं ढोरं होती. त्यांचं दूध काढायचो. विकायचो. मग त्या दुधाच्या धंद्याचं काय झालं? मी विचारलं "आता गुरांमागं कोन धावनार? आता मुलगे मोठे झाले. ते मोट्या धंद्याला लागले. त्याचा बाप पॉवरमदी (इलेक्ट्रीकल डिपार्टमेंट) कामाला होता. त्याच्या अंगात पन पावर होती लय चमकायचा, चिढायचा. येसूबाई विनोदानं हसत हसत म्हणाली.

चिडायचे ? मग तुम्हाला खूप त्रास द्यायचे की काय? माझ्या प्रश्नावर कपाळाला बचाकभर आठ्या घालत येसूबाय म्हणाली. "मेलेल्याचा काय बोलशील. आता काय बोलून नाय." तुमची मुलं सुना नातवंड तुमच सर्व करतात ना?" बेस हायत. हिकडं तिकडं आनून पोचवतात तेवढाच पायजे. हत्ती घोडं नको. माजीतं आता लेकरूत गनती झाली. "मग विषय बदलून बाजूला बसलेल्या सुनेबद्दल येसूबाय बोलू लागली म्हणाली. "माजी समदी मानसं बेस हायत पन ही विठाबाय बिचारी अंदारामंदी बसली हाय" येसूबायही बेस हा कोकणी शब्द वापरत होती. मी विठाबायकडे पाहिलं तिचा चेहरा काळवंडला होता. तिच्या उघड्या कपाळाकडे पाहून कसेबसे शब्द रेटीत मी विचारलं, तुम्ही धार्मिक कार्यात वगैरे भाग घेता की नाही?

"घरात देवपूजा करतो, पन कुणाच्या स्वयंवरात जात नाय." विठाबाई म्हणाली.

स्वयंवर? मी चमकून विचारलं. 'स्वयंवर म्हणजे लग्न' तिने खुलासा केला. त्या शब्दाची मला गंमत वाटली. गोंधळ, स्वयंवर हे शब्द आमच्याच मातीतले.

विठाबायशी बोलताना इथल्या विधवेचं स्थानही गौण आहे हे जाणवत होतं. इथं हळदीकुंकू बटसावित्री करत नाहीत. पण ते इथल्या स्त्रियांनी करावं असं तुम्हाला वाटतं का? या प्रश्नावर विठाबाय म्हणाली, 'जे धर्मात आसल ते करायला पायजे आपण मराठी माणसा.' मराठी बाणा, मराठी संस्कृती जपायची ती देवधर्म उपासतपास पूजाअर्चा यातूनच अशी इथल्या मंडळींची धारणा आहे. त्यातूनच ते आपली आयडेंटीटी दाखवतात. जपतात.

विठाबाय येसूबाय परत परत मला सांगत होत्या - तरणी होताव तवा आमी सोला सोमवार करायचो. आता भवानीचा गोंधळ करतो, पाच नारळानं तिची ओटी भरतो ढोलका वाजवतो. इथल्या बऱ्याचशा महाराष्ट्रीय मंडळींशी बोलसाना मला सारखं वाटत होतं की ... हे लोक भारतीय मातीतल्या जाती घेऊन इथे आले आहेत. अन ते जाती मानत नाहीत. ते स्वतःला केवळ मराठी, कानडी, तेलगू, भोजपूरी समजतात. मग यांची लग्ने वगैरे परस्परांशी होतात की नाही?

भारतात इंजिनीअरच पदवी संपादन करून मॉरिशसमध्ये परतलेला विनिश हा मॉरिशसचा तरुण महाराष्ट्रीयन आहे. तो एका तिथल्याच बिहारी मुलीशी लग्न करतोय. त्याच्या आईला अवंतीबाईला मी याबाबत विचारलं. लग्न कशी काय जमतात? अवंतीबाय म्हणाली, आदी आमी नात्यातच लगीन ठरवतावं. तसा नाय भेटला तर आमचा मराठी हवा. नाय तर मग कोण तरी हिंदू भारतातनं आलेला बगतो. ता पन दोगांची खुशी. पसंत आसंल तरच...

म्हणजे विनिश बिहारी मुलीश लग्न करतोय ते तुम्हाला पसंत आहे ना?

होय, आता बेस आहे म्हणायचा. त्याची खुशी, पन माजा मन दुकताय, मराठी महाराष्ट्रीयन असती तर बरा हुता. म्हणजे इथे बिहारी, महाराष्ट्रीयन, कर्नाटकी, हैद्राबादी असे प्रांतभेद होतेच.

प्रा. आनंद मल्लू यांच्या भावाने अॅग्लो मॉरिशियन (ख्रिश्चन) मुलीशी लग्न केलय म्हणून त्यांची आई सयाबाई जाम उखडली होती. कोणताही प्रश्न विचारला तरी पयल्यासारखं काय ऱ्हालेल नाय असं म्हणून, '' आमी काल परवा पाटीवर हंटरचे फटके सोसले. या पोरांना शाना केला, त्याचा त्यांना काय हाय? ऑ? सांगा.'' असं विचारत होती. नव्या पिढीवरचा जुन्या पिढीचा राग इथेही दिसत होताच. पण इथल्या जुन्या पिढीला एका गोष्टीचं फार समाधान आहे. ते म्हणजे इथे हुंडा पद्धत नाही. त्यामुळे सुनेला जाळणं भाजणं हे प्रकार इथे नाहीत. घटस्फोटाचं प्रमाण कमीच आहे.

इथले लोक तसे शांत, स्वस्थ जीवन जगणारे आहेत. आयत्या, झटपट मिळणाऱ्या वस्तूंवर समाधान मानणारे आहेत. इथे चोऱ्या, दरोडे, खून यांचे प्रमाण अगदीच कमी आहे. मिस्टर भूगन याचा मोठा मुलगा पोलीस आहे. त्याला म्हटलं इथे गुन्हेगारी कमी दिसत आहे. त्याचं कारण काय? माझ्या या प्रश्नावर अलकानं सांगितलेल्या खेळाडूच्या विनोदासारखं हसून तोही म्हणाला, ''हा आमचा एवढासा देश गुन्हेगार पळून जाईल कुठे? त्यापेक्षा गुन्हा न केलेला बरा.''

त्यांचा पोलिसी युनिफार्म मोठा आकर्षक होता. जांभळट, आकाशी रंगाची पॅन्ट शर्ट, त्याला पांढऱ्या रंगाची बक्कलस नी वर डोक्यावर इन्स्पेक्टरसारखी पण गडद निळया रंगाची टोपी. पायात बूट, कमरेला पिस्तूल पोस्टमनचा युनिफार्मही निळाच आहे. इथला माणूस जगा आणि जगू द्या या वृत्तीचा आहे. टी. व्ही. आणि वृत्त पत्रातून देण्यात येणाऱ्या कुणाकुणाच्या मृत्यूच्या बातम्यात क्वचितच येणारी एखादी रेपची बातमी ऐकून ते हादरतात. बोंबासे येथे आठ वर्षाच्या एका अल्पवयीन मुलीवर पन्नास वर्षाच्या माणसाने रेप केली. ती बातमी ऐकून आपण दोन दिवस जेवलो नाही, आपल्या लहान मुलीची काळजी करत राहिलो असं माला मल्लू सांगत होती.

इथेही स्त्रियांच्या काही संघटना आहेत, पण त्यामधून भजन कीर्तन करणं ; शिवण - टिपण करणं, मसाले व इतर पदार्थ तयार करणं, फनफेअरला जाणं, त्यासाठी पदार्थ, वस्तू करून देणं असे कार्यक्रम असतात.

स्त्री-मुक्ती संघटना म्हणून 'मॉरिशस मराठी स्त्री मंडळी संघटना' इथे आहे, त्या संस्थेत रत्नाबाय बापू या प्रमुख आहेत, वगैरे माहिती एका पार्टीत देविका दिलजोरनेही दिली होती. त्याबाबत बोलायला बोलवलं होतं, पण जाणं जमलं नाही. तेथील पुरुषांशी या विषयावर बोललं असता स्त्री - मुक्ती हा त्यांनाही चेष्टेचाच विषय वाटत होता.

धर्मा गोविंद हे मराठी शिक्षक रस्त्यात भेटले. प्राथमिक शिक्षक असूनही त्यांच्याकडे गाडी आहे. त्यांनी 'माहेरी जाते' नावाची कादंबरी मोरस मराठीत लिहीली आहे. ती नेरुरकरसरांना देण्यासाठी आम्हाला आपल्या 'चलती का नाम गाडी' तून घरी घेऊन गेले. त्यांची पत्नी स्वयंपाक घरात काम करत होती. ती बाहेर आली. तीच्या हाताशी दिड दोन वर्षाची मुलगी होती. धर्मा गोविंदांची बायको नऊ महिन्याची गरोदर होती. चेहरा अगदी थकलेला, ओढलेला, घरकामाचा गाडा एकटीच ओढीत होती हे दिसत होतं. तरीही तिला विचारलं - अशावेळी तरी तुमचे मिस्टर घरकामात काही लक्ष देतात की नाही? माझ्या या प्रश्नावर आपण काय काय करतो ते सांगायला धर्मा गोविंद पुढे सरसावले नी मोरस मराठीत सांगू लागले, "मी किती काम केला तरी हिला बसच होत नाय. मी थकलो मांदलो तरी दुकानाला जातो कोकाकोला, पावरोटी आनतो, ही मुलीला दादून बोलली की मुलगी हिला बोचकडते मग मी मुलीला गोदीत घेऊन भिंतीला सटून बसतो तेवा हिला आराम गावतो." धर्मा गोविंदाच्या या बोलण्यावर त्यांच्या बायकोनं 'उजेड!' अशा आविर्भावात त्यांच्याकडे पाहून मान वेळावली.

चूल आणि मूल ही जबाबदारी बाईचीच ही भावना मनात ठेवून आपल्या बायकांना घरात सर्व तऱ्हेने स्वातंत्र्य आपण देतो, घरकामात मदत करतो, अशी स्वातंत्र्य देण्याची नी मदतीची भाषाच सर्वजण बोलत होते. त्यामुळे स्त्रियांच्या संस्थामार्फत फक्त स्त्रियांचे संघटन व सामाजिक विकास याकडे लक्ष दिले जाते. पण मोर्चे काढणे, रस्त्यावर येणे, घोषणा देणे हे प्रकार इथे नाहीत. इथे स्त्रियांना रात्रंदिवस जाळणारा प्रश्न आहे तो महागाईचा.

मॉरिशसमध्ये साखरे व्यतिरिक्त प्रत्येक वस्तू बाहेरच्या देशातून येते. साहजिकच इथे वस्तूंचे भाव चढे आहेत. त्या विरोधात लोक उभे रहातात. पत्रक काढतात. त्यावर आपण सह्या करतो असं बऱ्याच महिलांनी सांगितलं.

पुरुषांच्या बरोबर इथली स्त्रीसुद्धा घराबाहेर पडते. नोकरी व्यवसाय करते.

इथे विचारात नसला तरी आचारावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आहे. पाश्चाच्य पद्धतीचा आहार, वस्त्रे, आभूषणे वापरणे वाढदिवस साजरे करणे, ख्रिसमस हा तर इथं राष्ट्रीय सण आहे. ख्रिसमसचे झाड नी सरप्राइझ भेटी हिंदू, बौद्ध मूस्लिमांच्या घरातही असतात. जात, प्रांत याबरोबरच सर्वधर्मसमभावही इथे नांदतोय.

हे सगळं मी पहात होते. कुणा ना कुणाच्या बोलण्यातून ऐकत होते. पण तरी माझ्या मनाला तळागाळातल्या माणसांचा शोध घेण्याची लागलेली हुरहूर कमी होत नव्हती रस्त्यावर काम करणारे मजूर, शेतमळ्यातले कष्टकरी मी पहात होते. त्यांना भेटावं, त्यांच्याशी बोलावं असं वाटत होत. पण त्या सर्वांच्या रंगारुपावरून कपड्यालत्यावरून

ती माणसं रंजले गांजलेली भुकेकंगाल वाटत नव्हती. फाटकं धडूत अंगावर असलेली, पोरांचं लेंढार घेऊन दारुड्या नवऱ्याच्या लाथाबुक्क्या खाणारी, केसांच्या झिपऱ्या झालेली बाई मला भेटत नव्हती.

एकदा सर म्हणाले, 'पोर्टलुईसला रामलाल नावाचे माझे एक स्नेही आहेत. मॉरिशस टाइम्स वृत्तपत्राचे ते संपादक आहेत. मॉरिशसमधले लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत ते. गांधी, नेहरूंचेही स्नेही. मॉरिशसमधील आर्यसमाज चळवळीचे खंदे कार्यकर्ते. शीलाबाय बापूंना त्यांनीच पुढे आणलं. त्यांना भेटायला हवं. येतेस तर चल तूही.'' माझ्या डोक्यात तळागाळाचा शोध होताच. रामलाल यांच्याकडून नक्कीच काहीतरी मिळेल त्या खात्रीनं मी टुणकन उडी मारून निघाले. साड्या, कापड वगैरे घ्यायचं तर पोर्टलुईसलाच हे देविकाच वाक्यही आठवत होतं.

बसमधून पोर्टलुईसला आम्ही उतरलो तेव्हा मुंबईतल्या फ्लोरा फाऊन्टनला आल्यासारखं वाटलं. तशाच दगडी मजबूत इमारती एकमेकींना खेटून उभ्या नी त्यांच्यावर ब्रिटीश राजवटीचा ठसा असलेली डिझाईन्स, दगडी खांब, चौकातले पुतळे, चबुतरे, बिल्डींगच्या कोपऱ्यावर काटकोनात जुळणारे रस्ते, फुटपाथ सारं सारं फ्लोरा फाऊन्टनला आहे तसंच. बाजूनी इंदिरा डॉकसारखाच समुद्र खेटलेला...

तिथल्या एका कोपऱ्यावर फ्रॉक घातलेली नी हातात कटोरा घेतलेली एक जाडीजुडी आफ्रिकन बाई भीक मागत उभी होती. तिच्या हातात कटोऱ्याऐवजी पुस्तक असतं तर नक्कीच ती प्राध्यापिका वाटली असती इतकी भारदस्त होती. एखाद्या प्रेक्षणीय वस्तूसारखी तिच्यावरून नजर ओवाळून तिला ओलांडून आम्ही पुढे गेलो.

रामलाल यांची प्रेस तशी रस्त्यावरच होती पण प्रवेशद्वार मात्र पुण्यातल्या पत्र्या मारुतीच्या एखाद्या बोळखंडासारखं मागच्या बाजूला कुठेतरी होतं. ते शोधण्यात चारपाच मिनिटं गेली. अखेर एका जुनाट मोडक्या जिन्याकडे कुणीतरी बोट दाखवलं. त्या जिन्याने अनेक वर्षं कित्येकांना वर चढवलं नी कितीकांना गडगडवलं असल्याची कल्पना आली. त्यावरून तोल सांभाळत आम्ही वर गेलो.

आतील भागात जीर्ण लाकडी पार्टीशनवजा खोलीत रामलाल बसले होते नि त्यांच्यासमोर एक तरुण मुलगी काहीतरी लिहीत बसली होती. आम्ही आत जाताच ती दोघेही उठून उभी राहिली. आम्ही स्थानापन्न झालो. परस्पर परिचय झाला. त्या मुलीच नाव होतं नजिमा. मॉरिशसमधल्या मुस्लिम कुटुंबातली ती मुलगी होती. लंडनहून पत्रकारितेचा कोर्स तिने केला होता नि मॉरिशस टाईम्समध्ये काम करत होती. सर तिला ओळखत होतेच, शिवाय त्या मुलीशी माझीही चटकन गट्टी झाली.

सर आणि रामलाल जुन्यापुराण्या गोष्टी सांगून बोलत होते. सर म्हणाले, अलिकडे इथली इडोमॉरिशियन मंडळी फारच धार्मिक झालेली दिसतात. मी १९६७ साली इथे आलो तेव्हा इथल्या घरासमोर देवळाची घुमटी नि भगवी निशाणं नव्हती.

"अरे बाबा, पूर्वीचं मॉरिशस तरी राहीलंय कुठं? आता आम्ही आर्यसमाजी लोकांनी एवढी सुधारणावादी चळवळ चालवली. फंडामेटॅलिस्टना मोडून काढलं. पण त्याचा काय उपयोग झाला? बुवाजी नि बाबाजी हा फरक राहिलाच ना? नी आता लोक फडके, जोशी, कुलकर्णी होतायतच ना?"

नजिमाशी चाललेलं बोलणं थांबवून मी रामलालना विचारलं, 'हे बुवाजी नी बाबाजी कोण?' रामलालजी म्हणाले, ज्यांच्याकडे संपत्ती आहे, सुरक्षितता आहे ऐहिक सुख आहे ते बाबाजी, आणि ज्यांच्याकडे नाही ते बुवाजी. म्हणजे हा झाला वर्गभेद पण इथे जातीही असणारच. ब्राम्हण मराठा वगैरे.' मी म्हटलं.

तशी सरांनी रामलालशी चाललेलं संभाषण थांबवलं नी ते उठत म्हणाले, "उर्मिला, तुला साड्या, कापड वगैरे काही शॉपिंग करायचं असेल तर ते तू इथेच कर. ही नजमा मदत करील तुला." आता मात्र माझ्या कपाळावरची शीर तटतटली. हे काय चालवलंय सरांनी? मला हवी ती माहिती मिळण्याची शक्यता दिसली की हे असं का करतात? 'बराय रामलालजी निघतो आम्ही." सर म्हणाले, "उर्मिला, चल उठ आता. निघूया. आणि हे बघा रामलालाजी, आम्ही नजमाला घेऊन जातो आमच्याबरोबर. तिच्या वडिलांनाही भेटायचं आहे" आणि सर जिना उतरू लागले.

मला वाटलं, उठावं नी चक्क बस पकडून तडक विमानतळ गाठावा. पण....मनातल्या मनात थोर थोर संशोधकांच्या सहनशीलतेला शतश: नमस्कार करत मी तो मोडका जिना उतरले.

रस्त्याच्या दुतर्फा कपड्यांची मोठमोठी दुकान होती. त्यांच्या शोकेमधल्या सुंदर साड्या मला भुरळ घालण्याचा प्रयत्न करत होत्या. पण मी मात्र नजर ताठ ठेवून चालत होते. चालता चालता एका बिल्डिगच्या कोपऱ्यावर थांबून सर म्हणाले, "उर्मिला तुला म्युझियम पहायचंच?" मी कपाळाला आठ्या पाडून जोरात नकारार्थी मान हलवली नी पुढे चालत राहिले. तशी सरच म्हणाले की 'परिषदेच्या प्रदर्शनात इथल्याच वस्तू मांडल्या होत्या. त्या बघितल्याच असशील तू..."

सर असं म्हणतात तेवढ्यात माझं लक्ष म्युझियममधल्या दगडी बिल्डिंग शेजारी उभ्या असलेल्या मोठ्या वडाच्या झाडाकडे गेलं नी मी पहातच राहिले. वडावर चक्क कावळे बसलेले दिसत होते. एक दोन नव्हे तर चांगले वीस पंचवीस......

हे कावळे कुठून आले?

"हे तुमच्या भारतातले, आफ्रिकेतलेही आहेत. हे जहाजावर बसून इथे येतात नी तसेच परतही जातात बंदरातल्या प्रवाशासारखे. पोर्टलुईसचा हा एवढा भाग सोडल्यास तुम्हाला इतर कुठे दिसणार नाहीत ते" नजमा म्हणाली आणि कसं कोण जाणे पण त्या कावळ्यांना पाहून मात्र माझं मन हलकं हलकं झालं नी मग मी थोडीशी खरेदीही केली.

जवळच असलेल्या नजिमाच्या घरी पोहोचलो तेव्हा तिचे प्राध्यापक वडील मि. हुसेन कॉलेजमधून नुकतेच घरी आले होते. त्यांचा साहेबी पोशाख, घरातल्या वस्तू नी एकूण वातावरण मुस्लिम संस्कृतीशी एकदम विसंगत होतं. मुख्य म्हणजे त्यांची मुलं लहान असतानाच त्यांची पत्नी वारली तरी त्यांनी दुसरं लग्न केलं नव्हतं. मुस्लिम पुरुष चार चार बायका करतात हे आमचं विधान किती भ्रामक आहे हे त्यांच्याकडे पाहून पटत होतं.

हुसेन यांच्या घरी चहापान आटोपताच त्यांनी आपल्या गाडीतून आम्हाला जवळच असलेला साखर कारखाना नि चीनी पॅगोडा दाखवला. निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर दोन हिरव्या डोंगराच्या मध्यभागी आठ पांढरीशूभ्र टोकं अष्टदिशांना उंचावून निश्चल दर्शन देणारा तो अष्टकोनी पॅगोडा पाहून जीवनातील आठ रसांचं आतल्या आत दमन करून नवव्या शांतरसात लीन झालेल्या स्थविरासारखा वाटला मला तो. तो पाहून मग मि. हुसेन यांनी आम्हाला बसस्टॉपवर आणून सोडलं. वाटेत ते आपल्या समाजावर भरपूर बोलले. हा समाज इथे अगदीच अल्प आहे. त्यात अरब लोक जास्त आहेत व ते व्यापारी आहेत. हे मुस्लिम फार कडवे नाहीत वगैरे... हुसेनजींनी स्वत: मॉरिशसचा इतिहास, भारताचं प्रवास वर्णन लिहिलय. ते उत्तम कवी आहेत. ते सरकारवर निर्भयपणे टीकाही करतात. पण भारतीय जाती व्यवस्थेवर त्यांनी मौन पाळलं.

अजूनही मी अस्वस्थच होते. पोर्टलुईस, वाकवा, कात्रबोन, रोझहिल ही सारी शहरी ठिकाणं. इथं आपल्याला हवी ती माणसं भेटणार नाहीत त्यासाठी खेड्यात गेलं पाहिजे. इथलं खेडं पाहिलं पाहिजे. असं वाटू लागलं. सरांच्या काही ओळखीच्या माणसांना भेटायला विनिश बरोबर त्याच्या गाडीतून बेज्यू कँप, तमारीन, लागोलेत या समुद्र किनारी वसलेल्या खेड्यात जायचं ठरलं. आपल्याकडच भारतातलं खेडं नजरेसमोर आलं.

मिसेस नेरूरकर म्हणाल्या, "लागोलेतला गजाबाय रहाते. ती समुद्रातले शंख शिंपले वेचून विकते. नवरा दारुड्या आहे. चार पोरं पदरात आहेत." अरेरे माझ्या तोंडून शब्द निघाले, पण मनाला थोडी उभारी आली. बरं वाटलं. आता हवी तशी माणसं भेटतीलच. नक्कीच पण खेडं खेडं म्हणून ज्याचा घोष चालला होता त्या खेड्यात जाऊनही ते खेडं वाटेना. शहरातल्या मानाने इथे चिंच, आंबा, माड आणि कसल्या कसल्या झाडांची दाटी


होती इतकंच बाकी सिमेंटचे गुळगुळीत रस्ते. रस्त्यावर मर्क्युरी लॅम्पस् नी शहरातल्या सारखीच सिमेंटची सुबक घरं होती.

बेज्यू कँपला विनिशच्या बहिणीचं घर होतं. तिथे आमचं दुपारचं जेवण झालं. 'ऑक्टोपस' हा समुद्रातील लांब अवयवाचा केसाळ प्राणी फक्त पाहिला होता, पण इथे त्याच्या केसाळ अवयवांचे लहानसे तुकडे करून त्याचा लालभडक रस्सा भातावर वाढण्यात आला. तुकडे पाहून माझा चेहरा थोडा वाकडा झालाच. पण बळेबळेच चव घेऊन पाहिली तर ते तळलेल्या कोळंबीसारखे लागत होते, मात्र बरेच चिवट होते.

बेज्यू कँपला आणखी एक गोष्ट मला नव्यानं समजली. तिथल्या समुद्रकाठी असलेल्या खडकावर खायच्या पानाच्या दाट वेली पसरल्या होत्या. तरारलेल्या हिरव्याकंच लुसलुशीत पानांनी ते खडक झाकले होते.

ही पानं तुम्ही कुणी तोडता की नाही? मी विचारलं.

''अर्थातच नाही, कारण इथे कुणीही पान खात नाही.'' विनीश म्हणाला आणि तेव्हाच माझ्या लक्षात आलं की, तिथल्या दुकानांच्या रांगेत वा हॉटेलसमोर कुठेही आम्हाला एकही पानसुपारीचं दुकान वा पानाची गादी दिसली नाही. नी त्यामुळेच रस्त्यावर थुंकीची रांगोळीही दिसत नव्हती.



संध्याकाळी आम्ही लागोलेतला गजाबायच्या गावी गेलो. तिथली घरं समुद्राच्या अगदी कुशीत शिरून हारीनं निवांत पडलेली होती. तिथे लहानमोठ्या होड्या, वल्ही, मासे पकडायची जाळी नी असंच मच्छिमारीचं साहित्य होतं. रत्नागिरीतल्या भाटे राजीवाड्याची आठवण होत होती. त्या घरात एक घर आपल्या वैशिष्ट्यानं सर्वांचं लक्ष वेधून घेत होतं. त्या घराच्या दर्शनी भागाला भलं मोठ्ठ काचेचं तावदान होतं नी त्याच्या आत विविध आकाराच्या शंख शिंपल्याचं भव्य भंडार....

त्या शंखशिंपल्यात नजर इतकी गुंतली की चालताना ठेच लागून अंगठा मुरगळल्याचंही लक्षात आलं नाही. तेवढ्यात हलू हलू चाला, हलू - हलू या ऽऽऽ अस म्हणत एक बाई पटकन बाहेर आली. उंच, शिडशिडीत. निमगोऱ्या रंगाची, कपाळावर ठसठसीत कुंकू, गळयात सोन्याचं मंगळसुत्र, सोन्याच्या बांगड्या, कुडय़ा... ती गजाबाय होती. पदराआड गेलेलं गळ्यातलं मंगळसूत्र पदरावर काढत गजाबाय बोलत होती. उत्सुकतेनं, आपुलकीनं आमची विचारपूस करत होती. शंखशिंपल्याची ती सागरी श्रीमंती कौतुकानं दाखवत होती.

गजाबायच्या दुकानात काचेच्या मोठ्या कपाटांमधून नुसत्या शंखाचेच तीनशे प्रकार होते. चक्री शंख, कळी शंख, जांभुळ खावून दात रंगल्यासारखे फेरे असलेले जांभूळ शंख, लांब पाय पसरलेले कोळी, हळदी, देवळी, गदा, कट्यारी, मुगुटी शंख काही पांढरे शुभ्र पुनव काही झेब्ऱ्यासारखे पट्टे असलेले तर काही गोकर्णीच्या फुलासारखे वगैरे.

शिवाय शिंपल्यांचेही कित्येक प्रकार... कौल, स्वाती (मोती) पायटी, काटेरी, सोनकरंडी असे अगदी नखापासून ते 'ओंजळी' इतके मोठेही होते. त्यातच अधून-मधून ठेवलेली काटेरी कोरल्सची पांढरीशुभ्र फुलं अगदी वेड लावत होती.

कपाटांच्या तळभागात साळींद्रासारख्या माशांची तशीच काटेरी भोपळ्यासारखी गोल कातडी नी शार्क माशाच्या तोंडाची काही हातोड्यासारखी तर काही करवतीसारखी लांब हाडं तलवारीसारखी उभी ठेवलेली होती.

तिथल्या सारखे शंख शिंपले माशाची सुकवलेली तोंड शेपट्या कवचं बाजूच्या काही घरांमधूनही होती. ती सागरी संपत्ती, तिथल्या होड्या, नांगर बघून वाटलं ही माणसं कोळी किंवा भंडारी समाजाची असावी. गजाबाय म्हणाली आम्ही मुळचे चव्हाण. मराठी आहोत. इथं आडनाव लावत नाय, पतीचं नाव आंब्रोजी. तो उसाच्या शेतात काम करतो. त्याचा पैसा त्यालाच (दारूला) लागतो. घर मी चालवतो. पोरं आता मोठी झाली. शिकली ती मला धंद्याला हात देतात. शंख शिंपल्याकडे बोट दाखवून गजाबाय म्हणाली, हे समंद आमी पान्यात जाऊन जमवून आनायचा. आता आमाला नाय गावत. लय आत दर्यात जावं लागतं. म्हणून आत जाऊन आनना-याकडन विकत घेतो. साफसूफ करतो. तासतो. रंग लावतो लय मेहनत आसते. पैसा चांगला मिळतो.

आपल्या मेहनतीबद्दल अभिमानानं सांगत गजाबाय आम्हाला पाठच्या दारी घेऊन गेली. पाठीमागे अथांग समुद्र पसरला होता नी लाटा चंदेरी वाळूतून खळाखळ गजाबायच्या घरापर्यंत झुळझुळत होत्या. त्यावर तांबुस पिवळ्या मावळत्या रंगछटा घेऊन आकाश ओथंबलं होत नी पुर्वेकडे तितक्याच उत्कटतेनं एका निळ्या सावळ्या ढगाआडून इंद्रधनुष्याचा हळूवार गोफ उमटता होता.

ते सारं पहाताना बालकवींच्या इंद्रधनुच्या दुहेरी गोफाची आठवण होत होती. मॉरिशसच्या मंगल गीतातील.

विविध रंग हे जमिनीचे नंदनवन हे अवनीचे

स्वप्न रगले सत्यात इद्रधनुची वरती कमान

देश आमचा स्वर्गसमान....

या वर्णनाची 'प्रचिती येत होती. त्या स्वप्नमय दृश्यात आम्ही रंगलो असतानाच गजाबाय म्हणाली, 'इथं परदेशी लोक मॉप येतात त्यांच्यासाठी लोक हॉटेल बांधतात. लय पैसा मिळतो. 'चार-चार पाच-पाच वर्षात लोकांनी झोपडी मोडून बंगले बांधले माजा पयला काय नव्हता. आता मी नवा घर बांधला. आता मी आनकी वर मजला उठवलाय. तिथं मी हॉटेल करीन... चला दावतो असं म्हणून गजाबाय वळली तेव्हा तिच्या चेहऱ्यावरही

एक सुंदर इंद्रधनुष्य उमटलं होतं.

गजाबायचं बोलणं ऐकून, तिथली ती समृद्ध घरं पाहून ही माणसं श्रमशक्तीला शरण गेली आहेत, एका विलक्षण जिद्दीने अपार कष्ट करून गाळातून वर आली आहेत हे जाणवत होतं, म्हणूनच खेडं आणि शहरातल्या सीमारेषा यांनी पुसून टाकल्या आहेत. जातीपातीच्या प्रादेशिकतेच्या भिंती ओलांडून ही माणसं उर्जितावस्थेला लागली आहेत. आजोबा  पणजोबा पासून तर अगदी आईवडिलांपर्यंत अशिक्षित असलेल्या या माणसांची मुलं खूप शिकत आहेत. उच्च शिक्षणासाठी इंग्लड अमेरिकेला जात आहेत. मोठमोठ्या कारखान्यातून, सरकारी कार्यालयातून मानासन्मानाच्या जागा पटकावत आहेत ... हे सर्व जाणवत असताना एक प्रश्न सतत पुढे येत होता की आपण ज्याला हलकी सलकी काम म्हणतो ती रस्त्यावरची, ड्रेनेजची शेतमजुरांची, मोलकरणींची कामं करणारी मंडळी कोण आहेत?

हा प्रश्न भुंग्यासारखं माझं डोकं पोखरत होता. कारण भारतात झाडूखात्यात झाडून सारे दलित आहेत. मी त्या अनुषंगानं भेटेल त्याला आडून आडून प्रश्न विचारत होते. शाहीर साबळेंना ज्या अर्थाने हा प्रशन कुणीतरी विचारला होता. तो अर्थ माझ्या प्रश्नात नव्हता. मला शोध घ्यायचा होता भारतातून आलेल्या आमच्या माणसांचा, सात समुद्र ओलांडून आल्यानंतर तरी त्यांच्या जातीचा राक्षस मेला की तो अजून जिवंत आहे हे जाणून घेण्याची मला अगदी तहानच लागली होती. पण नेरूरकर सर मला अडवत होते. ते काहीतरी लपवत आहेत असं मला सारखं जाणवत होतं. नी त्यांचा रागही येत होता.

पण त्या प्रश्नाचे उत्तर मला प्रा. आनंद मल्लू यांच्या प्रेसवर काम करणाऱ्या नोकर वर्गातून मिळालं. प्रेसमध्ये कटींग बाइडिंग करणारी मुलं-मुली, मल्लू यांच्या घरच्या मोलकरीणी सुद्धा चांगलाा खात्या पित्या घरातून राहतात. यातल्या बऱ्याच मुलाचं शिक्षण इयत्ता सहावीच्यावर नाही. घरची चांगली परिस्थिती असूनही ही मुलं पुढे का शिकली नाहीत? याला कारण इथली शिक्षण पद्धती. इथे सहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या मुलांना त्यांच्या आंधळी कोशींबीर खेळण्याच्या वयात डोळ्यात तेल घालून अभ्यास करावा लागतो. सहाव्या इयत्तेत नापास होणाऱ्या मुलांना आणखी एक संधी दिली जाते. तिथेही ही मुलं पास होऊ शकली नाहीत तर त्यांना शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद होतात! आपल्या मुलांच्या बाबतीत असं होऊ नये म्हणून पालक महागड्या शिकवण्या ठेवतात. इथे मला इथल्या प्राथमिक शिक्षकांच्या टुमदार घरांची आठवण झाली.

शिक्षणापासून वंचित झालेल्या या मुलांना कुवतीनुसार तांत्रिक शिक्षण दिलं जातं. ज्यांच्याकडे अशीही कुवत नाही किंवा कुटुंब प्रमुखाची व्यसनं, बेपर्वाई अकाली निधन अशा सारख्या व्यक्तिगत कारणामुळे जी मुलं मागे रहातात त्यांना मोलमजुरीची कामं

करावी लागतात. त्यातून एक तळातला वर्ग निर्माण होतो. त्याला ना जातीचा संबंध ना धर्मांचा म्हणूनच इथे तळ दिसत होतो पण गाळ दिसत नव्हता.

हे सारं ठिक होतं. पण परिषदेला आलेल्या नऊवारी साड्या नी धोतरवाल्या मंडळींच्या 'आरयेंता' वगैरे भागात आपण गेलो असतो तर तिथे जुन्या रूढी परंपरा जपणाऱ्या त्या मंडळींकडून जातीपातीविषयी नक्कीच काहीतरी कळलं असतं निदान भारतीय जातीवादी शक्तींनी सुरू केलेल्या धार्मिक चळवळीचे तिथे उमटलेले पडसाद तरी जाणून घेता आले असते. असंही सारखं वाटत होतं. पण आता तिथला मुक्कामही संपला होता नी परतीचे वेध लागले होते. घरच्या मंडळींचीही तीव्रतेने आठवण व्हायला लागली होती. मुला - माणसांना भेटायला मन अधीर झालं होतं.

मॉरिशसमधून रात्री आठ वाजता सुटणारं विमान भारतीय वेळेनुसार रात्री अडीच वाजता पोहोचणार होतं. विमानतळावर मला न्यायला माझ्या मिस्टरांबरोबरच त्यांचे मित्र बंडू सुखटणकर नी रवी जिजकरही येणार होते. रात्रभर तिथे जागणार होते. खरं तर त्याची गरज नव्हती, पण परदेशात जाऊन आलेली, विमान प्रवास केलेली, तळागाळातली एक महिला म्हणून माझ्याबद्दल सर्वांना अप्रुप वाटत होतं.

आम्ही निघालो तो दिवस होता सात मे. माझा वाढदिवस . खरं तर इतरांच्या तो लक्षात येण्याचं कारण नव्हतं. मीच दिवसभर मनातल्या मनात वागवत होते. प्लेझांस विमानतळावर आले. सरांनी तिथल्या काऊंटरवर बसलेल्या माणसाला तिकिटं दाखवली तर तो रजिस्टर मिटत म्हणाला, "आजच्या विमानात मिसेस पवार यांचं नाव नाही. त्या केव्हाच भारतात गेल्या."

आँ, अहो असं कसं काय होईल? मी एकदम धसकून म्हटल. सर शांतपणे म्हणाले, 'उर्मिला थांब, तू काळजी करू नको. मी बघतो काय आहे ते, असं म्हणून त्यांनी दोन तीन ठिकाणी फोन केले. फोनवर ते म्हणत होते, "अहो, शरद पवारांच्या बरोबर गेल्या त्या मिसेस पवार गेल्या हे माहित आहे आम्हाला, पण त्यांच्याबरोबर गेल्या त्या प्रतिभा पवार. त्या ह्या नव्हेत. या उर्मिला पवार. यांचं नाव कसं काय खोडलंत तुम्ही?" एकंदर पवार आडनावावरून घोटाळा झाला होता.

तेवढ्यात विमानात बसण्याची अनाउन्समेंट झाली. माणसं तिकडे निघाली. एक सावळी शिडसिडीत गोड चेहऱ्याची एअर होस्टेस माझ्याजवळ आली. म्हणाली, 'प्लीज कम.' सर म्हणाले, 'उर्मिला तू जा तिच्याबरोबर. तिकिट मिळेत तुला. तोपर्यंत आम्ही विमानात जातो असं म्हणून नेरूरकर दांपत्य विमानाकडे गेलं. माझी बॅग वगैरे आधीच विमानात त्यांच्या सामानाबरोबर गेली होती. आता मी खूपच गोंधळले. तिकीट मिळेल की नाही? जीव अगदी टांगणीला लागला. परदेशात एकट्या माणसाला किती असुरक्षित वाटतं त्याची

कल्पना आली. एअर होस्टेस पाठोपाठ इथे तिथे धावाधाव झाली: काही ठिकाणी सह्याबिह्या झाल्या नी एकदाचं तिकीट मिळालं.

घाईघाईनं ती गोड एअर होस्टेस माझ्याजवळ आली. हसत हसत माझा पासपोर्ट माझ्या हातात ठेवत म्हणाली, हॅपी बर्थ डे मॅडम !' मी तिच्याकडे क्षणभर पहातच राहिले... ती मुलगी ना नात्याची ना पात्याची, पण त्या घाई गडबडीतही पासपोर्टवरची माझी जन्मतारीख पहाते काय... मला शुभेच्छा देते काय..... व्वा! त्या मुलीच्या शब्दांनी मी भारावले. हसून तिचे आभार मानून विमानाकडे धावले.

विमानाच्या दाराशी उभे असलेले पर्सर, एअर होस्टेस उत्सुकतेनं माझीच वाट पहात होते. बी क्विक, बी क्विक म्हणत हात हालवत होते. मी खरोखरच व्ही. आय. पी. झाले होते. विमानात मी पाय ठेवताच दरवाजा बंद झाला. नी सर्वांनीच सुटकेचा निश्वास टाकला.

सर म्हणाले, "उर्मिला, मिळालं ना तिकिट? झालं ना सर्व ठीक? चल ये इकडे— नीरा, तू उर्मिलाच्या सीटवर बस मला उर्मिलाशी बोलायचय."

नको, मी आहे इथेच ठीक आहे. मी अजून घुश्श्यातच होते. 'माझं ऐक, बस इथे' सर म्हणाले. तेवढ्यात पट्टे बांधण्याची अनाउन्समेंट झाली. स्वत:भोवती पट्टा बांधून मी खिडकीबाहेर पाहू लागले.

सर म्हणाले, तू मॉरिशसला येताना मनात एक भूमिका घेऊन आली होतीस होय ना? की, भारतीय समाज हा जातीनिरपेक्ष नसतो, तो जाती सापेक्ष असतो, तसा तो मॉरिशसमध्ये असणारच. आणि म्हणून तुझा इथे जात शोधायचा प्रयत्न चालला होता. बरोबर?" आता मी खरोखरच ऐकू लागले. तेवढ्यात दिवे बंद झाले नि विमान हललं.

सर म्हणाले, "हे तुझं शोध घेणं म्हणजे अंधाऱ्या खोलीत काळं मांजर शोधणं होतं. जे नाहीच ते शोधणं, ही भूमिकाच चुकीची होती." असं म्हणून सर मॉरिशसविषयी बोलत होते. नी मी खिडकीतून खाली मॉरिशस पहात होते. येताना मुंबई पाहून कुणा राजकन्येने हिऱ्यामाणकांची ताटं उधळल्यासारखं वाटलं होतं तर मॉरिशस पहाताना मात्र एखाद्या कर्तव्यदक्ष गृहिणीने आपल्या साध्याच पण व्यवस्थित मांडून ठेवलेल्या अलंकारांची पेटी आपल्या समोर उघडली आहे असं वाटत होतं आणि सरही तसंच काहीसं बोलत होते.

सर म्हणाले, "ब्रिटीशांनी मजूर म्हणून मॉरिशसमध्ये आणलेले लोक जरी ते विविध जातींचे होते तरी इथे ते समूहानंच रहात होते., समूह हीच त्यांची जात होती. त्याच्या पुढच्या पिढ्यांमध्ये जातीची जाणीव पुसट पुसट होत गेली नी धर्माची जाणीव मात्र

स्थूलमानानं राहिली. दैवतांची पूजा करणं, पोथ्या वाचणं, सण साजरे करणं यातून त्यांनी धर्म जपला आणि यातूनच जो 'नाहीरे' असा तळातला वर्ण होता तो सुटून गेला''

मग इथे बाबासाहेबांची जयंती साजरी करणारे लोक कोण आहेत? मुंबईहून आंबेडकरांच्या साहित्याचे खंड आणणाऱ्या व्यक्ती कोण होत्या? मी काहीसं तक्रारखोर स्वरात म्हटलं.

''ते इथल्या 'मराठा मंदिर' संस्थेचे लोक होते. महाराष्ट्रातून आलेला प्रत्येक माणूस या संस्थेचा सभासद असतो. भारतातील राजकीय सामाजिक नेत्यांची जयंती - पुण्यतिथी वगैरे कार्यक्रम ते करतात. डॉ. आंबेडकर हे घटनाकार नी भारतातल्या दलितांचे पुढारी एवढच त्यांना माहीत आहे. तेव्हा मला काय म्हणायचं आहे की, डॉ. आंबेडकरांनी जो जातींचा चार मजली मनोरा म्हटला आहे तो इथे उभाच राहू शकला नाही. तेव्हा ज्यांना जातींची जाणीव नाही, जे या चक्रातून सुटून बाहेर पडले आहेत त्यांच्यात पुन्हा जातीवादाचं बीज का पेरावं? किंवा जे नाहीच त्याचा शोध तरी कशाला?''

मग रामलालजी म्हणत होते, नी आपणही रेमाजीकडे वगैरे पाहिलं की, काही लोकांनी आता आपली ब्राम्हण जात केली आहे नी आडनावही जोशी, फडके, कुलकर्णी अशी ठेवली आहेत. सोमवार, मंगळवार असे उपासही ती मंडळी करत आहेत. मांसाहार सोडला आहे. देवळाच्या घुमट्या नी 'भगवे झेंडे' इथे वाढलेत असं तुम्हीही म्हणत होता, त्याचं काय मग? माझा स्वर अजूनही भांडखोर होता.

या प्रश्नावर सर एवढंच म्हणाले की, त्याचा तरुण पिढीवर तसा कोणताही परिणाम होणार नाही. कारण नवी पिढी नव्या गतीमान जगाबरोबर गतीमान आणि पुरोगामीच राहील. सर असं बरच काहीसं बोलत होते नी माझं मन मलाच विचारत होतं की, मॉरिशियन समाज रचना जातीनिहाय नाही. तिथे रामदास फुटाणे किंवा दादुमियांच्या बोलण्यातून व्यक्त झाला तसा जाती संदर्भातला दृष्टीकोण कुणाच्याही बोलण्यातून जरासुद्धा जाणवला नाही मग अगदी आतापर्यंत जाती धर्माचे संस्कार सांभाळत दुखऱ्या बोटासारखी मी माझीच भावना का कुरवाळत होते?

आता विमानानं आवश्यक ती उंची गाठली होती.ते आभाळाला टांगल्यासारखं स्थिर झालं होतं. दिवे प्रकाशले होते नी माझे डोळे हळुहळू मिटू लागले होते. आणि त्या मिटल्या डोळ्यांसमोर दिसत होता... जागतिक मराठी परिषदेसाठी जमलेला जनसमुदाय.... आमचा पाहुणचार करणारी मॉरिशीयन मंडळी... फूलमती, देवयानी, नजिमा, सत्यभिष्टासारख्या मैत्रिणी... विठाबाय, हिराबाय, सयाबाय या गृहीणी... चंद्रसेन, आनंदमल्लू, अभिमन्यू, हुसेनजीसारखे स्नेही इतकंच काय पण देवळाच्या चबुतऱ्यावर आमचे मुके घेणाऱ्या त्या अनामिक म्हाताऱ्या... ट्रिओबीशच्या किनाऱ्यावर होडीतून हात

उंचावून आम्हाला टाटा करणारी गुलाबी पोरं.... विमानतळावर वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारी ती गोड एअर होस्टेस... आणि अशा कितीतरी व्यक्ती. . . ज्यांच्या आठवणीतून जागलेला माणुसकीचा प्रकाश माझं मन आता व्यापत होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0027765
REFBK-0027765

